# माणूस माणूस माणूस माणूस माणूस

शनिवार
१३ मे १९७२
पन्नास पैसे



संपादक माणूस यांसी सप्रेम नमस्कार

माझ्या कामासाठी फिरत असताना (एप्रिल २६ ते २९ तारीख) मी चिमूरला गेलो होतो. तेथूनच जाताना ताडोबाला गेलो असताना ना. वसंतराव नाईकांची शिकार पहाण्याचे 'भाग्य' मला लाभले. आसपासच्या आदिवासींशी व काही हाके घालणाऱ्या लोकांशी संपर्क साधता काही माहिती मिळाली. वसंतरावांचा हा पैलू लोकांसमोर यावा असे वाटले, म्हणून पाठवत आहे आपल्याकडे प्रसिद्धीसाठी. —आपला ???

[पृष्ठ २ पहा]

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | १३ मे १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | पन्नास | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## सप्रेम नमस्कार....

¤ दिनांक २९ एप्रिलच्या माणूसमधील 'मराठवाडा' वाचला. अ. ब. (अनिल बर्वे) सरकारला पंचपक्वान्नाच्या ताटावरून उठव पाहत आहेत. अज्ञान जनतेनं सरकारला मतदान करून सत्तेच्या पंचपक्वान्नाचं ताट पुढं वाढलं आहे, अशा भरल्या ताटावरून अ. ब. सरकारला उठवीत आहेत ते मराठवाड्यातील उपाशी पोटी जनतेला जागृत करून त्यांच्या धमन्यांतील शुष्क झालेल्या रक्ताला प्रवाहित करू पाहत आहेत. अशा वेळी अ. ब. ला सरकार हाकलून देणार का सहभोजनास आमंत्रण देणार ? आणि सहभोजनाला मराठवाड्यातील होयबा भोजनभाऊ पुढारी असल्यावर अ. ब. ची (बर्वेची) गरज काय ? मराठवाड्यातील दीन जनता एखादा तरी घास त्यांना त्यांचे भोजनभाऊ पुढारी आणून देतील या आशेने त्यांच्या तृप्त झालेल्या टर्र् पोटाकडे पाहूनच नुसतं कोरडं समाधान मानीत आहे. ह्या भोजनभाऊ पुढाऱ्यांना सरकारचा सापत्नभाव आणि दुजाभाव ओळखू येत नाही. कारण त्यांच्या डोळ्यापुढे सत्तेची पंचपक्वान्नं खाऊन झापड आलेली आहे. या उलट जनता भुकेकंगाल बनलेली आहे. अशी भुकेकंगाल जनता जागृत झाल्यावर सरकारला तोंडचा घासच काय पण पाणी सुद्धा गिळू देणार नाही. तेव्हा सरकारने अ. ब. ला हद्दपार करू नये तर काय मराठवाड्यात त्यांचा भव्य सत्कार करावा ?

३ मे, १९७२ — हेरंब जोशी, बीड

[ निराकार होऊ पाहणारे आकार या लेखात (माणूस २९ एप्रिल १९७२) पृष्ठ छपन्नवरील 'एक आकृती' नजरचुकीने उलट छापली गेली आहे. डॉ. अवचट यांनी ही चूक निदर्शनास आणून दिली याबद्दल त्यांचे आभार. —संपादक ]

साप्ताहिक माणूस : १०२९ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# शाही शिकार

निळू दामले, अमरावती

आपल्या महाराष्ट्राचे लाडके व आवडते नेते, गरिबी हटावच्या घोषणा देणाऱ्यांचे अग्रणी, विदर्भाचे प्रतिनिधी वसंतराव नाईक चंद्रपूर जिल्ह्यात कोळसा जंगलात शिकारीला जाऊन राहिले आहेत. अपघातात मनगटाचे हाड मोडल्यामुळे त्यांना विश्रांतीची फारच गरज काही दिवस भासून राहिली आहे ! ते १८ एप्रिल ते २७ एप्रिल असे नऊ दिवस सुप्रसिद्ध ताडोबाच्या जंगलाला लागून असलेल्या कोळसा ह्या वनग्रामात येऊन राहिले आहेत.

वसंतरावांचा सर्व मित्रपरिवार तेथे त्यांच्याबरोबर हजर आहे. जंगलाला शोभून दिसावेत असे लांब केसवाले, बेलबॉटम–बिनबाह्यांची कुडती घातलेले युवक किंवा युवती हे न ओळखू यावेत असे प्राणी रेस्ट हाऊसच्या आसपासच्या भागात भटकताहेत. कोका कोला ह्या जंगलातही रंग जमाता है. गो–गो ग्लासेस आहेत. वसंतरावांची कुटुंबीय व त्यापैकी प्रत्येकाचा परिवार, त्यांचे स्वीय सहाय्यक आणि कोणी एक उद्योगपती असा हा सर्व संच. जवळ जवळ ५० माणसे. ह्यांच्या दिमतीला लांबसडक मोटारी आहेत. पण जंगलात नाईलाजाने वर्षा बंगल्याच्या पोर्चसारखे रस्ते नसल्याने गाड्या जंगलाबाहेर आणि त्यांचे ड्रायव्हर्स त्यांच्या बरोबर आहेत.

वसंतराव हे ह्या प्रगतिशील राज्याचे मुख्यमंत्री आहेत, त्यामुळे १०० पोलीस त्यांच्या तैनातीला आहेत. वनविभागाने त्यांची सर्व व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी घेतली असल्याने जंगलाचे चीफ कॉन्झर्वेटर्स, दोन कॉन्झर्वेटर्स, पाच डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, १० एस. ई. एफ, पंचवीस रेंजर्स, पन्नास दफेदार, दीडशे ते दोनशे फॉरेस्ट गार्ड्स हे सर्व अधिकारी कोळशाला ९ दिवस राबत होते. ह्यांच्यापैकी अर्धे अधिक अधिकारी १८ तारखेच्या आधी ५–६ दिवस साधनांची जुळवाजुळवी करण्यासाठी राबत होते. आताही निरवानिरव करण्यासाठी ५–६ दिवस राबणार आहेत. अर्थात हे सर्व ड्यूटीवर नव्हते असे कोणीच म्हणू शकणार नाही.

हाके घालण्यासाठी आणि इतर चिल्लर कामे करण्यासाठी २०० ते ३०० माणसे ह्या शिकारीसाठी मुक्काम ठोकून आहेत.

संग्राम मोठा जोरदार आहे. एकूण २५ जीप्स, ८ ट्रक्स, वसंतरावांच्या बरोबरच्या १० मोटारी, पोलिसांच्या २ मोठ्या व ५ छोट्या व्हॅन्स इथे रणांगणावर फैलावून राहिल्या आहेत. आज ता. २७ पर्यंत ७ बॅरल्स पेट्रोल व ३ बॅरल्स डीझेल संपलेले आहे. (एक बॅरल = २०० लिटर)

वसंतरावांची विदर्भाच्या विकासाची तळमळ विख्यात आहे. ते सारखे विकासासाठी झटत असतात, विश्रांतीच्या काळातसुद्धा. ह्या कोळशाच्या जंगलात पूर्वी काही नव्हते. वसंतरावांना ह्याची खंत वाटायची. म्हणून २ वर्षांपासून त्यांनी येथे शिकारीसाठी यायला सुरुवात केली. एक आलिशान रेस्ट हाऊस बांधले, खर्च केला रु. ३ लाख. जंगलात पाणी नव्हते; पुन्हा ३ लाख रुपये खर्च करून एक तलाव बांधला. आता त्या तलावात एक थेंबही पाणी नसते. ह्याला वसंतरावांची तळमळत जबाबदार नाही. ह्या महाराष्ट्रातील माणसाला सर्व आधुनिक सुखसोयी मिळाव्यात ही वसंतरावांची कळकळीची इच्छा ! त्यांनी ह्या बंगल्यात रेफ्रीजरेटर्स, एअर कूलर्स, पाणी तापवण्यासाठी गिझर्स आदी सर्व व्यवस्था केली. ही साधने वापरली जाण्यासाठी जंगलात वीजही नव्हती. किती दयनीय अवस्था ! वसंतरावांनी जनरेटर आणून बसवला.

अशा ह्या ठिकाणी वसंतरावांचा मुक्काम आहे; इतरांसाठी तंबू आणि राहुट्या उभारलेल्या आहेत.

ह्यांच्या सर्वांसाठी पंखे, गाद्या आणि इतर सर्व आवश्यक गोष्टी चंद्रपूरवरून आणल्या जात आहेत. दररोज दोन टँकर्स पाणी ३० मैलांवरच्या चंद्रपूरहून येत आहे.

वसंतराव रसिकही आहेत, रंगेलही आहेत. शिकारीच्या इतमामात काही कमी पडलेले त्यांना खपत नाही. सर्व ताफ्याच्या जेवणासाठी कोठीत १० पोती तांदूळ, १० पोती गहू व २ पोती साखर आधीच साठवून ठेवण्यात आली आहे.

दररोज २५ बकरे, ५० कोंबड्या आणि अगणित अंडी व मासे लागताहेत. शिकार कशी मजबूत व्हायला पाहिजे ! एक हजारपेक्षा जास्त बाटल्या कोका कोलाही आणून ठेवला आहे, त्याला आवश्यक तेवढा बर्फही आहे ! कुठेही मागासलेपणाचा अंश शिल्लक राहता कामा नये याची वसंतराव कटाक्षाने काळजी घेत आहेत.

शेजारचे ताडोबाचे जंगल संरक्षित जंगल आहे. पण तेथल्या जंगलातल्या वाघांची संख्या दहा वर्षांत २०–२५ वरून ५ वर येऊन ठेपली आहे. ताडोबातले वाघ हाके घालून कोळशाच्या जंगलात आणले जातात (कोळसा संरक्षित-नाही.) व तेथे त्यांची शिकार केली जाते असे जंगलभागातले लोक कुजबुजतात. पण ते सर्व

वसंतरावांचे विरोधक आहेत !

अशी मोठी मस्त शिकार होऊन राहिली आहे. ५० ते ६० हजार रुपये खर्च झाले आहेत. तथापी ह्या वर्षी दुर्दैवाने काही हरणे, चित्तर व सांबरेच मिळाली. शंकरराव चव्हाणांच्या शिव्याशापांमुळे नाट लागली; पुढल्या वर्षी निश्चित वाघ मारूच अशा विचारांत मंडळी आता जायला निघत आहेत. ताईसाहेबांचे पाय चेपणाऱ्या आदिवासी बाईला एक नोट मिळून राहिली आहे. बहुधा दहा रुपयांची असावी.

कोळशापासून थोड्या अंतरावर पांढरपोणी हे आदिवासींचे गाव आहे. त्याच जंगलात १०० वर्षांपासून आदिवासींनी श्रम करून जमीन चांगली बनवली आहे. त्यांना ह्या इथून आता हटवले जाणार आहे. तसे फर्मानच निघाले आहे. ह्या आदिवासींच्या घरावर छपरे नाहीत. अंगावर पूर्णपणे झाकण्याएवढीही वस्त्रे नाहीत.

ह्या लोकांना बाराही महिने ८ मैलांवरून पाणी आणावे लागते. वीज नाही, रस्ते नाहीत. दीडशे वर्षे हे असेच रहात आहेत.

मोहाच्या फुलाच्या भाकऱ्या खातात. एक प्रकारचा विषारी कांदा साफसूफ करून खातात. साफ करताना चूक झाली तर विष बाधते, अंगावर चट्टे उमटतात.

पहिले चित्र खूप मोठे आहे, दुसरे लहान आहे. ◻



अरुण गोसावी

# मुंबई वार्ता

## ही तर केवळ सुरुवात आहे

मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी बॅरिस्टर रजनी पटेल आल्यापासून आतापर्यंत ठेपाळलेली ही संस्था आता एकदम एका नव्या जोमाने कार्यरत झालेली दिसते. नवनव्या घोषणा काढून, ठराव करून आणि त्या ठरावांची अंमलबजावणी करण्याची शिकस्त करून मुंबई काँग्रेस सध्या आपली नवी क्रांतिकारी प्रतिमा निर्माण करू पाहत आहे. झोपडपट्ट्या, पाणीपुरवठा, रस्ते व रहदारी या व अशा अनेक मुंबईच्या निकडीच्या प्रश्नांवर स्वतंत्र समित्या स्थापन करून त्यांच्याकरवी मुंबई काँग्रेसने तपशीलवार अहवाल आणि योजना मागविल्या आहेत. नुकतीच एक मिरवणूक काढून श्री. रजनी पटेल यांनी शिक्षणातील काळा बाजार बंद करण्याविषयी मागणी केली.

परवा एक मेच्या दिवशी, म्हणजे महाराष्ट्र दिनी आणि कामगार दिनी, श्री. पटेल यांनी एक जोरदार बाँब टाकला. कामगार मेळाव्यात भाषण करताना महाराष्ट्र सरकारच्या कामगारविषयक धोरणावर कडाडून हल्ला चढविला. महाराष्ट्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपात ज्या कर्मचाऱ्यांनी संप फोडयांची कामे केली त्यांना सरकारने प्रत्येकी दोन पगार वाढी दिल्या आहेत. याचा त्यांनी तीव्र निषेध केला. अंबरनाथच्या कामगारांवर निर्घृण गोळीबार केल्याबद्दल सरकारला शिव्या घातल्या. आणि सरकारच्या कामगारविरोधी धोरणाशी झगडण्यासाठी कामगारांनी एकजूट करावी असे वर आव्हानही केले.

श्री. पटेल एवढ्यावरच थांबले नाहीत. तर निवडणूकपूर्व सरकारी आश्वासने आणि निवडणूकनंतरचा कारभार यातील तफावतोवर कोरडे ओढले. एवढे पुरे झाले नाही की काय असे वाटून याच विषयावर त्यांनी मुंबई काँग्रेसच्या कार्यकारिणीमध्ये कडक ठराव पास करून घेतले. त्यामध्ये कमाल जमीन धारणेबद्दल तीव्र मतप्रदर्शन करणाराही ठराव होता.

श्री. पटेल आणि मुंबई काँग्रेस यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे महाराष्ट्र सरकारचे नेते जरा चमकल्यासारखे दिसतात. काही जण तर व्यथित झाले असल्याचेही

सांगतात. 'हा रजनी पटेल कोण? काल काँग्रेसमध्ये आला आणि आम्हाला शिकवितो?' अशी त्यांची वृत्ती दिसते. पक्षांतर्गत या बाबींवर चर्चा करण्याऐवजी श्री. पटेल या गोष्टी वेशीवर टांगतात. याबाबतीत त्यांच्यावर पक्षीय शिस्तीची कारवाई करता येणार नाही का? असाही सूर एका नेत्याने धरल्याचे ऐकिवात येते.

मोठे भपकेबाज जेवणसमारंभ आणि तशाच तऱ्हेचे इतर कार्यक्रम यांना मुंबई काँग्रेसच्या नगरसेवकांनी, आमदारांनी आणि मंत्र्यांनी जाऊ नये असा धोरणात्मक निर्णय प्रदेश काँग्रेसने नुकताच घेतला होता. गेल्याच आठवड्यात मेयर ऐवजी गणात्रा यांनी महाराष्ट्र दिनानिमित्त ताजमहाल या महागड्या हॉटेलात बडा खाना आयोजित केला होता. महापालिकेचे सर्व सदस्य, आमदार, मंत्री यांना या मेजवाणीला बोलाविले होते. परंतु या धोरणात्मक निर्णयामुळे म्हणा की श्री. गणात्रा जुन्या काँग्रेसचे म्हणून म्हणा, पण काँग्रेस नगरसेवकांनी आणि आमदारांनी या मेजवानीत भागच घेतला नाही. मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि पाटबंधारे मंत्री वसंतराव पाटील हे दोनच मंत्री खान्याला हजर होते. यावरूनही बरीच गडबड उडाली आणि उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

मुंबई काँग्रेसचा पवित्रा आहे सरकारच्या मागे क्रांतिकारी कार्यक्रम अंमलात आणण्याची घाई करण्याचा. वेगवेगळ्या प्रकारचे दबाव आणून सरकारला प्रत्यक्ष कृती करण्यास भाग पाडण्याचा मुंबई काँग्रेसचा उद्देश दिसतो. आतापर्यंत असे दिसत असे, की काँग्रेसपक्षाने ठराव करायचे, सरकारने होला हो म्हणायचे आणि आपल्या चालीने चालू लागायचे. परंतु आता ते दिवस उरले नाहीत. हे पक्षाला दाखवून द्यायचे आहे.


# व्होल्गा जेव्हा लाल होते

**वि. स. वाळिंबे**

मूल्य : रुपये अठरा

राजहंस प्रकाशन, पुणे

दुसरा मुद्दा आहे पक्षाच्या सामर्थ्याचा. पक्षाने सांगितलेली गोष्ट सरकारने केलीच पाहिजे. असा मुंबई काँग्रेसचा आग्रह आहे. शासनावर पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित करणे हीच मुंबई काँग्रेस आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील या लढाईची मूळ प्रेरणा दिसते. विधानसभेच्या गेल्या अधिवेशनात मुंबई काँग्रेसच्या नव्या आमदारांनी जो आक्रमक सूर धरला होता तोही सरकारवर दबाव आणून त्याच्याकडून कामे करून घेण्याच्या उद्दिष्टानेच. मंत्र्यांनी आराम करण्याचे दिवस आता गेलेत. त्यांना आता भरपूर मेहनत करावी लागणार, नाही तर पक्ष जाब विचारील असाच याचा अर्थ. अर्थात मुंबई काँग्रेस आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात भांडण आहे ते मूळच्या धोरणाबद्दल नव्हे. तर त्या धोरणांचा अर्थ काय आणि ती कशारीतीने आणि किती गतीने अमलात आणायची याबद्दलचा हा झगडा आहे.

अशा तऱ्हेचे काही भांडण चालू आहे हे मुख्यमंत्री नाईक नाकबूल करतात. पण असे आहे खरे हे स्पष्टच दिसते.

मुंबई काँग्रेसमध्ये असे नवे चैतन्य आणण्याचे श्रेय आहे अर्थातच श्री. रजनी पटेल यांना. सरकारी गोटामध्ये त्यांच्याबद्दल कितीही नाराजी पसरली असो, कामगार मेळाव्यातल्या त्यांच्या भाषणामुळे तमाम कामगार जनता खूष झाली आहे. श्री. पटेल हे नुकतेच म्हणजे दोन महिन्यापूर्वी मुंबईच्या राष्ट्रीय मिल मजदूर संघटनेचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले आहेत. पूर्वी ही जागा महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष श्री. वसंतराव पाटील यांनी भूषविली होती. मेदिनी कामगारांची भूमिका जोमदारपणे मांडल्याबद्दल संघटनेने त्यांचे मनापासून अभिनंदन केले आहे.

श्री. पटेल हे मूळचे कम्युनिस्ट. त्यामुळे त्या पक्षाच्या शिस्तीचे संस्कार अजूनही त्यांच्यावर आहेतच. तीच शिस्त ते आता मुंबई काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. कम्युनिस्टांच्या कामगार चळवळीतूनच त्यांनी राजकारणात पदार्पण केले हे त्यांनीच स्वतः परवाच्या सभेत सांगितले.

श्री. पटेल यांच्या जागी दुसरा कुणी येरा–गबाळा असता तर त्याच्या असल्या चळवळी पाहून त्याला मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून केव्हाच डिच्चू मिळाला असता. पण एकतर बॅरिस्टर रजनी पटेल काही कोणी येरे गबाळे नव्हेत. आणि दुसरे म्हणजे त्यांना थेट पाठिंबा आहे. श्रीमती इंदिरा गांधींचा. त्यामुळे महाराष्ट्र सरकारचे नेते त्यांना विचकूनच राहत असतील यात शंका नाही.

श्री. पटेल यांच्याकडे लक्ष ठेवायला हवे, केवळ मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षपदातच. त्यांच्या नव्या राजकीय कारकीर्दीची इतिश्री होणे शक्य नाही. त्यांचे क्षितीज मोठे आहे. आता तर कोठे हा तारा क्षितीजावर उगवला आहे.

□ □ □

# जबरदस्त 'लक्ष्मी' अखेरीस कोसळलेला 'सखाराम'

विजय तेंडुलकरांच्या सखाराम बाईंडरवर सध्या जी उलटसुलट चर्चा चालू आहे तीमधून एक गोष्ट जणू कट केल्यासारखी अनुल्लेखाने मारली जात आहे. ती म्हणजे या नाटकाचे कसदार मोठेपण. नाटक श्लील की अश्लील, सेन्सॉर बोर्डाने यावर बंदी घालावी की न घालावी यावर धूमधडाक्याने चर्चा करताना मान्यवर व्यक्तीही नाटकाच्या साहित्यगुणांची चर्चा करण्याचे टाळतात. काही दोन–चार लेख सोडल्यास 'सखाराम'वर कुठे कोणी मनापासून काही लिहिल्यासारखे दिसत नाही.

वास्तविक पाहता नाट्य आणि साहित्यगुणांच्या दृष्टीने सखाराम एवढा जबरदस्त आहे की एवढी शंभर नंबरी खरी कलाकृती मराठी रंगभूमीवर अद्याप उतरली नसेल. खुद्द तेंडुलकरांचेच एकही नाटक सखारामच्या पासंगालाही पुरणार नाही. तेंडुलकरांची नाटकं म्हणजे मृदु, नाजुक, रोमँटिक, मध्यमवर्गीय चक्रात अडकलेली त्याच त्याच गुंत्यात फिरणारी आणि थोडीशी स्वप्नाळूही. अगदी 'शांतता, कोर्ट चालू आहे' देखील ही कोंडी फोडण्यात फारसे यशस्वी झाले नव्हते. कलाकुसर, (क्रॅफ्टीनेस) देखील त्यांच्या नाटकात असतो. 'गिधाडे'मध्ये देखील तेंडुलकर कृत्रिमता टाळू शकले नाहीत.

पण 'सखाराम'चा कस एकदम खरा आहे. हे जमिनीवरचे नाटक आहे. इथे स्वप्नीलपणा नाही, रोमँटिकपणाला स्थान नाही. हे अस्सल नाट्य आहे. यात गोड गोड संभाषणे नाहीत. मोजकीच स्फोटक वाक्ये. स्वभावचित्रणे एकदम सफाईची, नैसर्गिक, मानवी संबंधांतील विलक्षण गुंतागुंत अगदी सहज इथे नजरेसमोर येते. सखाराम, चंपा, लक्ष्मी तिघेही सामाजिक दृष्ट्या स्खलन झालेली

पात्रे. पण तिघांच्याही नीतिमत्तेच्या स्वतःच्या कल्पना आहेत. आणि त्या अगदी भिन्न भिन्न आहेत. या तिघांचेही स्वभाव आणि त्यांची गुंतागुंत तेंडुलकरांनी विलक्षण अंतर्ज्ञानाने दाखविली आहे. तेंडुलकर खरोखर एवढ्या उंचीला पोचले नव्हते. यापुढे पोचतील की नाही शंका आहे. अश्लीलतेच्या हाकाटीखाली हे श्रेष्ठ नाटक गुदमरून जाता कामा नये.

'आपण सगळं केलं, पण एक खोटेपणा नाही केला. रंडीबाजी करतो मी. दारूबाजी करतोय. केलं ते एकूण एक कोणाला हवं. त्याला सांगण्याची तयारी आहे आपली, चोख, छाताडावर हात मारून. कोणती माडी किती वेळा चढलो, दाखवतो हवं तर. अलीकडे नाही चढत. गावात साले एकजात सगळे लपताछपतीने झक मारतात. करूनसरून साळसूद राहतात. तेरीबी चूप मेरीबी चूप. अरे हिंमत असेल तर करा काय ते खुल्लं खुल्ला. काय आहे त्यात? सालं शरीर आहे हे. वासनेचं आगर आहे, आगर हे कुणी निर्माण केलं? त्यानेच. मग त्याला काय ठाऊक नाही? बाप लागून राहिलाय बाप तुमचा आमचा—' असा हा सखाराम.

आणखी असा—'डोकं गरम आहे आपलं, काय? भडकलो तर मारतो बेदम. तोंड शिवराळ आहे. तोंडात विडी नि शिवी कायम. सगळं गाव म्हणतं तसं. परिस्थिती जेमतेम, पण दोन वेळा खायला नक्की मिळेल—'

आणि असाही—'देव? असतील तिकडे आत कुठे तरी अडगळीत. तिच्या आधीचीला होता तो नाद. दोनचार तसविरी होत्या वाटतं. नेल्यात का आहेत, ठाऊक नाही. नंतर ही आली. नंतरची—तिचं तसं काय नव्हतं. ती नवऱ्याच्या सदऱ्याचीच पूजा करायची. जीव घ्यायला निघाला होता तिचा. पण तो देव. जीव घेतो तो यांचा देव. जीव वाचवतो तो माणूस. त्याच्या सदऱ्याची पूजा करीत होती दोन वर्षं इथं. क्षय झाला म्हणून शुक्रवारला मिरजेच्या इस्पितळात पोचवली. तिथंच मेली. सदरा उशाला घेऊन. हे बघा. चहात साखर फार लागते आपल्याला. आणि लालभडक हवा—'

'—सगळ्या गोष्टी नाशिवंत आहेत. मग जीव गुंतवून उपयोग काय? कशाला गुंतवायचा जीव? आपण कुणाचं वाकडं न करता सुखात गेलं आयुष्य का झालं. बस्स्! पण हा—खोटेपणा नाही पाहिजे. पाप केलं, थोबाड फोडून घेऊन म्हटलं पाहिजे की मी पाप केलं. तयार असलं पाहिजे शिक्षेला. तिकडे वर कुठली लपवाछपवी? जन्माला आलो तसं होऊनच समोर जावं लागणार की नाही?' असं

# नाटक वाचून सुचलेले काही विचार

अरुण साधू

करावं की बाकी काही वाटलं तरी लाज वाटता कामा नये. लाज वाईट–'

असा हा सखाराम–आता माडचा चढत नाही. पण टाकलेल्या बाया मात्र ठेवतो आहे.

तेंडुलकरांचा हा सखाराम कोण आहे ? तो एक आदिमानव आहे. जग वाढले, समाजव्यवस्था प्रगत झाली, संस्कृतीची आवरणे माणसाने चढविली. पण नर माणसाची सुप्त लक्षणे अजून पूर्णपणे पुसली गेली नाहीत. सखाराम या आदिमानवाचे आधुनिक समाजातील प्रतीक आहे. असे सखाराम अनेक ठिकाणी छुपलेले आहेत. पण हा सच्चा आहे. याला स्वतःच्या तोंडावर मुखवटा घेण्याची गरज वाटत नाही.

इतर सर्व प्राण्यांप्रमाणे माणूसही शरीरशास्त्र दृष्टचा वैविध्याचा भोक्ता आहे. परंतु अस्तित्व टिकविण्यासाठी समाजव्यवस्था निर्माण झाली. समाजवर्धनासाठी काही बंधने आली. विवाहसंस्था हे असेच बंधन. परंतु सखाराम अजून एवढा प्रगत झालेला नाही. त्याला हे बंधन मान्य नाही. तो समाजच मानीत नाही तर सामाजिक नीतिमत्ता त्याच्यासाठी कोणत्या मोलाची ? जंगलातला सिंह मन चाहेल तसा वागतो. तसे याला वागायचे आहे. तसे वागता येत नाही म्हणून तडजोडी करतो. पण त्याही आपल्या रुबाबात. याची नीतिमत्ता एकच. आपण आहोत तसे आहोत. कुणाच्या बापाला घाबरायचे नाही. आपला सगळा खुल्लंखुल्ला कारभार मन चाहेल ते करू।

हा सखाराम अस्तित्ववादी आहे काय ? त्याच्या बोलण्यावरून, त्याच्या कृत्यावरून काही काळ वरवर तो अस्तित्ववादी वाटतो खरा. परंतु त्याचा अस्तित्ववाद हा अंतर्मुखतेतून आलेला वाटत नाही. लहान वयात आलेल्या कटु अनुभवामुळे तो अस्तित्ववादी झाल्यासारखा वाटतो. पण त्याचा हा अस्तित्ववाद, त्याची बंडखोरी ही तार्किक अखेरीपर्यंत पोचत नाही. पाश्चात्यांच्या अस्तित्ववादाच्या कल्पनांमध्ये तर स्थितप्रज्ञतेचीही एक प्रकारची बैठक अनुस्यूत असते. एवढेच नव्हे तर अस्तित्ववादी हा मनाला येईल तसे जगणे हीच वास्तवता समजतो. वास्तवता म्हणजे जगणे. वास्तवतेवर दुसरा विचार करण्याचीही गरज नाही.

सखाराम अस्तित्ववादाच्या मार्गाकडे जाणारा. पण तेथपर्यंत तो पोचू शकत नाही. तो भावनाप्रधानही बनतो. राग-लोभांना सरळ सरळ बळी पडतो. एवढंच नव्हे तर जीवनाविषयी त्याची काही पक्की मतं असतात. तो ती बोलूनही दाखवतो. त्याची जीवनासक्ती तर भयंकर आणि समाजाची बंधने झुगारून देण्याचा आव आणताना त्याच्या परिणामाला तोंड देण्याइतपत कणखरपणा त्याच्यात असत नाही. सखारामचा स्वभाव जसजसा उलगडत जातो तसतसा तो अधिकाधिक दुर्बल वाटत जातो आणि हातून खून झाल्याबरोबर तो एकदम गोठून जातो, फार घाबरतो. रेतीचा पुतळा कोसळावा तसा ढेपाळतो. हे अस्तित्ववाद्याचे लक्षण नव्हे. किंबहुना ज्या भावक्षोभाने तो खून करतो त्यातच त्याची दुर्बळता दिसून येते.

तेव्हा सखाराम हा अस्तित्ववादी नव्हे. काही विद्वानांनी आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन करण्यासाठी त्याला अस्तित्ववादी बनविले आहे. (एक्झिस्टन्शॅलिस्ट या अर्थाने.) त्यामुळे दिशाभूल होण्याचा संभव आहे. कामू आणि सार्त्र यांच्या कल्पनेप्रमाणे तर सोडाच पण साध्या ऑक्सफर्ड डिक्शनरीतल्या अस्तित्ववादाच्या व्याख्येतही सखाराम बसत नाही. सखाराम एक आदिमानव आहे. ज्याच्यात या संस्कृतीच्या आवरणाशी झगडण्याची ताकद नाही तरी झगडतो आहे. तो नागडा आहे. जीवनाच्या त्याच्या प्रेरणा याही त्याच आदिमानवाच्या. म्हणून त्याचे या समाजाशी जमत नाही. पण शेवटी त्यालाही समाजाची बंधनं स्वीकारावी लागतात. नाहीतर हातून खून झाल्याबरोबर तो ढेपाळला नसता.

हा दुबळा, चिडखोर, शीघ्रकोपी सखाराम तेंडुलकरांनी अत्यंत समर्थपणे उभा केला आहे. त्याच्या या विचित्र स्वभावामुळे समाजाशी त्याचे जे विलक्षण गुंतागुंतीचे नाते निर्माण झाले आहे तेही त्यांनी जबरदस्तपणे चितारले आहे. त्यांची बंडखोरी काही फार मोठ्या धाडसीपणाची नव्हे. तो जगतो तो समाजाच्या उच्छिष्टावरच आणि उपकार केल्यासारखा. **पण शेवटी उच्छिष्टासारखी त्याच्या जीवनात आलेली एक वरवर दुबळी वाटणारी पण एक जबरदस्त श्रद्धावान स्त्रीच त्याचा पराभव करते.**

हे नाटक विवाह संस्थेवरच घाला घालणारे आहे असा आरोप करणाऱ्यांची कीव येते. जुन्या कथांप्रमाणे नाटकाचे तात्पर्यच काढायचे असेल तर ते असेच येईल की शेवटी श्रद्धा हीच खरी, विवाहबंधन हेच खरे. खरा आधार श्रद्धावान स्त्रीच देऊ शकते. स्वैराचार झूट आहे. श्रद्धा जीवनावर, देवावर, कावळ्यांवर, मुंगळ्यांवर ज्याने टाकून दिले आहे त्या नवऱ्यावर आणि नव्यानं पत्करलेल्या पुरुषावर. लक्ष्मी हेच दाखवते.

तेंडुलकरांनी लक्ष्मी ही एक प्रचंड स्त्री निर्माण केली आहे. सखारामवर उतारा म्हणून. प्रारंभी दुबळी वाटणारी, कावळ्या-मुंगळ्यांशी बोलणारी ही वावळट लक्ष्मी एक जबरदस्त बाई आहे. चंपा तिच्यापुढे काहीच नाही. लक्ष्मी सोशिक स्त्री आहे. नवऱ्यानं मारल्यावर, कुणी बोलल्यावर ती मुळू मुळू रडते. जीवनाला चिकटून राहण्याची कोडगी जिद्द तिच्यात आहे. नवऱ्यानं टाकून दिल्यावर जीव देण्याचा मूर्खपणा ती करीत नाही, तर साऱ्या नीतिकल्पनांना मुरड घालून सखारामची रखेली म्हणून राहणे ती पत्करते. ती एक भयंकर कोडगी स्त्री आहे. ती मायाळू आहे आणि वावळटही आहे. कावळ्या-मुंग्यांशी बोलते. आणि सखाराम ज्यापासून अलिप्त आहे असे सारे युगायुगांचे, मानवी संस्कृतीचे, समाजाचे, धर्माचे, जातीचे संस्कार तिच्या मनावर खोलवर कोरले गेले आहेत. तिची जिवनासक्ती इतकी विलक्षण जोमदार आहे की चंपा तिच्यापुढे क्षुद्र. त्यापुढे तिला आपल्या

नीतिकल्पनांचे काहीच वाटत नाही. जगणे की नीतिमत्ता हा प्रश्न येतो तेव्हा ती जगणे पत्करते. पण नीतिमत्तेला मुरड बसते ती फक्त तेवढ्या क्षणापुरती. लगेच ती जुना धागा घट्ट पकडते. आणि सखारामभोवती नागिणीसारखे वेटोळे घालून बसते. सखारामवर ती मालकी हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. त्याला नकळत त्याच्या नावाने मंगळसूत्र बांधते.

लक्ष्मी महान श्रद्धावान आहे. तिची देवावर श्रद्धा आहे. तिची स्वतःवरही इतकी विलक्षण श्रद्धा आहे की देव तिला आपल्या मुठीत वाटतो. ती ज्याच्यावर विश्वास टाकील त्याच्यावरही तिची श्रद्धा आहे. त्यामुळे तिची सखारामवर श्रद्धा आहे. सखारामशी ती इतकी एकनिष्ठ आहे की त्याचे किंचितही वाईट झालेले तिला खपणार नाही.

म्हणूनच कदाचित् ती चंपाचा द्वेष करू लागते. पण चंपावर तिचा रोष होता तो मत्सरामुळे की सखारामच्या रक्षणाच्या प्रेरणेने हे जाणून घेणे कठीण आहे. चंपा सखारामच्या घरीच राहून दुसऱ्याशी संबंध ठेवते म्हणून ही भडकते. आणि जेव्हा भडकते तेव्हा ती भयंकर स्त्री बनते. जळत राहते. कांगावे करते. सखाराम लक्ष्मीला घालवायला पाहतो तेव्हा त्याच्याकडे चंपाची चुगली करते. सखाराम चंपाचा खून करतो ते चांगलेच झाले असे तिला वाटते. मेल्यानंतरही चंपाच्या नावाने बोटे मोडते, शिव्याशाप देऊन तिचा उद्धार करते इतकेच नव्हे तर तिच्या प्रेतावर थुंकते देखील. आणि जेव्हा स्वतःच्या हातून खून झालेला बघून सखाराम घाबरतो तेव्हा तिच्या अंगात सर्व स्त्रीजातीचे बळ येते. सखारामच्या मांडीवर मरण्याची इच्छा धरणारी ही दुबळी, त्याच्याच माराने अर्धमेली झालेली ही गूढ बाई हाती कुदळ घेऊन चंपाला पुरण्यासाठी स्वतःच खड्डा खणू लागते.

सखारामला ती सांगते – ' ओरडू नका. नाही तरी पापीच होती ती. नरकात जाईल. तुम्ही नाही जाणार. माझं पुण्य आहे. भरपूर आहे. मी राहीन तुमच्याबरोबर. तुमचं सगळं करीन मी. तुम्ही म्हणाल ते करीन. तुमच्या मांडीवर मरण येईल मला . घाबरू नका – आपण हिला पुरू या – घरातच. निघून गेली म्हणून सांगू .. मी ईश्वरसाक्ष सांगेन. त्याला सगळं ठाऊक आहे. तो माझ्यामागे आहे. तो तुम्हाला पाप लावणार नाही. माझं पुण्य तुम्हाला द्यायला सांगेन मी .. तो मुळी पापीच होती. मी कुणाला वाईट वागवलं नाही. कीडमुंगीलासुद्धा नाही...हे मंगळसूत्र बघा. तुमच्या नावानं बांधलं हे आजपर्यंत. आधीचं बांधणारानं स्वतःच तोडून टाकलं. मी नाही मोडलं. लग्नाच्या नवऱ्याला तिनं लाथाडलं. तुमच्याशी खोटी वागली. तिचं कधीच बरं होणार नव्हतं–तुम्ही चांगले आहात. देव तुम्हाला क्षमा करील. मी सांगेन माझं ऐकतो – आता नाही कुलटा दिसणार. आत्मा नरकात पोचलादेखील असेल एव्हाना. देवाला निवाडा करायला काय वेळ – पापी ! हूँ –'

अशी ही लक्ष्मी. स्त्रीजातीची सारी विचित्र रहस्ये उरात जोपासणारी, स्त्री स्वभावाचे सर्व कंगोरे जपणारी, गुणदोष बाळगणारी एक महाभयंकर बाई. अशी बाई मराठी रंगभूमीवर पूर्वी कधी पाहिली होती ? स्त्रीत्वाचा अर्क दाखविणारी मादी ? जगातल्या सर्व तऱ्हेच्या स्त्रियांशी एकदम आपले नाते सांगणारी ? तेंडुलकरांच्या सर्व नाईकापेक्षाही ही लक्ष्मी उजवी आहे. खरोखर जसजसे अधिक खोलात जावे तसतशी सखारामची व्यक्तिरेखा पुढे थिटी वाटू लागते — लक्ष्मीच्या तोंडी फार कमी भाषणे आहेत. पण ती बाईच तशी अबोल आहे. प्रत्येक दृष्यागणिक तिचे खरे स्वरूप हळू हळू अगदी पाकळी पाकळीने प्रकट होऊ लागते. आणि शेवटी विजेच्या लखलखाटाने आणि ढगांच्या गडगडण्याने व्हावे तसे तिचा अवतार बघून स्मित होतो. ही खरी बाई.

तेंडुलकरांवर हेत्वारोप करण्यात अर्थ नाही. पण त्यांनी लिहिताना खुद्द सखारामवर खूप प्रयास घेतलेले दिसतात. त्याच्या फटकळ बोलण्यावरूनच दिसून येते. पण लक्ष्मी त्यांनी तशीच सोडली. आणि म्हणूनच ती आपोआप अशी वाढत गेली असावी. नैसर्गिकरीत्या.

लहानपणच्या वाईट अनुभवांनी प्रथम शरीरसुखाची शिसारी आलेली आणि नंतर त्याच गोष्टीला चटावलेली उफाड्याची चंपा हीदेखील वाटते तेवढी निर्बुद्ध नाही. सुस्त आहे, आळशी आहे. खादाड आहे. त्याचबरोबर बेरकीही आहे. लक्ष्मीला ती सखारामच्या मारापासून वाचवते पण मग मोलकरणीसारखी राबवून घेते. चंपादेखील स्त्रीजातीचा एक नमुना आहे. सखाराम सॅडिस्ट आहे तर चंपाचा मूळचा नवरा मशोसिस्ट आहे. म्हणजे त्याला चंपाच्या हातचा मार खाणेच आवडते. तेही एक पात्रच आहे.

जगत राहणे, अस्तित्व टिकविणे आणि ते वाढविणे, विस्तृत करणे ही कोणत्याही जीवजंतूची मूळ प्रेरणा. त्यातूनच नर–मादी वा स्त्री–पुरुष संबंध निर्माण होतात आणि स्वभावधर्मांना विविध कंगोरे येतात. हे संबंध, त्यामधली गुंतागुंत ही या नाटकाची थीम आहे. नाटक समजून पाहिले अथवा वाचले असता कोठेही अश्लीलतेचा वास येत नाही. मग बाहेर एवढा आगडोंब कसा ? ज्याचा नाटकाच्या गतीशी, प्रेरणेशी काही संबंध नाही अशी 'अवध्य'मधली खरोखर उत्तान दृश्ये आदिमानवाच्या मुग्ध प्रणयक्रीडा म्हणून चविष्टपणे पाहिली जातात. ती अश्लील ठरत नाहीत. तेंडुलकरांना काही दृश्ये टाळता आली नसती का, असे विचारणारे 'अवध्य'ची ही दृश्ये कशी काय चालवून घेतात ? आदिमानवाच्या 'मुग्ध प्रणयक्रीडा' कॅबेरेतही पहावयास मिळतात. ती दृश्ये मग गरज नसताना नाटकात टाकण्याचा उद्देश काय ?

चीड येते ती याची की लिंगपिसाट, अश्लील अशी हाकाटी करून मूळ नाटकाचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे त्याची. सारे साहित्य आणि नाट्यजगत

तेंडुलकरांवर वैयक्तिक दृष्टचा खवळून उठले त्याची. एखादे सामान्य नाटक असते तर ते तसेच चालून गेले असते. पण हे तेंडुलकरांसारख्या जबरदस्त नाटककाराने आपली पुरी ताकद घालून समर्थपणे उभे केलेले नाटक आहे. ही गोष्ट आपले कूप-मंडूक साहित्यिक कशी चालवून घेणार ? या सर्व गदारोळामध्ये व्यावसायिक मत्सराचा आणि हेव्यादाव्यांचा तर मोठा भाग नव्हे ना, अशीही शंका येते.

आणि सुरुवातीला या नाटकाला थोर म्हणून प्रशस्तीपत्र देणाऱ्या साहित्यिकांनी अश्लीलतेची चोहोबाजूंनी हाकाटी झालेली बघून घाबरून चुकारपणे अंग का म्हणून काढून घ्यावे ? त्या पत्रकावर सह्या करणाऱ्यांवर टीकेचे फटके वसू लागताच त्यातले काही साहित्यिक म्हणू लागले, की आम्ही सही केली ती नाटकावर बंदी येऊ नये यासाठी. नाटक ग्रेट आहे असं म्हटलंच कुठे आम्ही ? खरं म्हणजे अशा कातडी–बचावू साहित्यिकांच्या सर्टिफिकेटचीही तेंडुलकरांना गरज नव्हती. एवढे हे नाटक स्वयंप्रकाशित आहे.

जाता जाता एक किस्सा सांगितलाच पाहिजे. वेळीअवेळी थोर थोर पाश्चात्य लेखकांची नावे जिभेवर घोळविणारे एक विद्वान अभ्यासू मित्र या नाटकावर टीका करण्याच्या निमित्ताने तेंडुलकरांवर भरपूर तोंडसुख घेऊ लागले. अहो नाटकावर बोलाना, असे कुणी सुचविताच हे विद्वान उद्‌गारते झाले, ' सांगून ठेवतो. आपल्या एका मोठ्या लेखकांनीच मला सांगितलं आहे. सखाराम एका ग्रेट पाश्चात्य नाटकावर घेतलेलं आहे. ते कोणतं हे शोधून काढण्याची कामगिरी माझी– " हसावे की रडावे ?

अय्यय्यो ! मदरास !

नलिनी अंबाडे

# उन्हाळा आला, उटकमंडला चला !

आमच्या वर्गात जोशी म्हणून एक मुलगी होती. तिचे वडील माथेरानला इंजिनियर होते. शाळेला उन्हाळयाची सुट्टी लागायच्या आधीपासूनच तिची चिवचिव सुरू व्हायची. तेव्हा पेशवे पार्कात 'फुलराणी' नव्हती ना सारस बागेत बागही नव्हती. आम्हाला त्या छोटयाशा आगगाडीचे फार कौतुक वाटायचं तेव्हा. पुढे पुण्याहून जेव्हा जेव्हा मुंबईस जाई तेव्हा तेव्हा नेरळ स्टेशन दिसेनासे होईपर्यंत मी बाहेर पाहत असायची, की माथेरान कुठं दिसतेय का ? पुढे समजले, की माथेरान लोणावळा-महाबळेश्वर या सर्वांवर ताण करणारे हिल-स्टेशन आहे. 'उटकमंड' व ते दूर आहे मद्रास राज्यांत ! मद्रासला आल्या आल्या मी विचारले–

'उद्याच्या रविवारी उटीला जाऊया का ?'

अर्धापाऊण मिनिट 'हे' माझ्याकडे पाहातच राहिले. अन् पुढे म्हणाले 'तू मॅट्रिकला भूगोल सोडला होतास वाटतं ?'

'वा ! भूगोलातच हैयेस्ट मार्क मिळालेत.'

'म्हणूनच ! अगं मद्रासहून कोईमतूरच तीनशे मैलांपेक्षाही अधिक, तेथून मेट्टूपालयम् पंचवीस मैल अन् मग लहानशा बारक्या गाडीने तितकाच घाट चढायचा. शेवटचं स्टेशन उटी !'–ते काहीही असो. माझ्या टुमण्याचा उपयोग झाला अन एके दिवशी भल्या सकाळी आम्ही मेटूपालयमला उतरलो–सामानासहित !

मेटूपालयम हे निलगिरीच्या पायथ्याशी, डोंगरांच्या कुशीत असणारे, ब्रॉडग्रेज मार्गावरील शेवटचे स्टेशन. जंक्शन असूनही बेताचे स्टेशन. तेथूनच घाट चढणाऱ्या दोन छोटया गाडया सकाळी सुटतात, संध्याकाळी अंधाराच्या आत परत येतात– झाला संपला कारभार ! उटीची उंची आहे साडेसहा हजार फूट आणि हे अंतर अवघ्या ३० मैलांच्या घाटात ती गाडी चढते. तीस मैलांना चार तास लागतात, पण वाटतं हे अंतर अन हा प्रवास कधी संपूच नये ! कल्लारू आणि अडेर्लि ही दोन स्टेशने जाईपर्यंत पुष्कळच उंची गाडीने गाठलेली असते असंच वाटतं. पण एक वळसा घालून गाडी जेव्हा प्रत्यक्ष निलगिरी पर्वतावर आक्रमण करू लागते तेव्हा

खोल दऱ्यांचे पहिले दर्शन घडते. गाडीचा वेग जेमतेम टांग्या इतका किंवा सायकल-इतका. चार डब्यांच्या त्या पिटुकल्या गाडीला इंजिने मात्र दोन आणि प्रत्येक डब्याच्या तोंडाशी एक कंडक्टर. त्याच्या हातात हिरवे-लाल झेंडे व तोंडामध्ये एक शिट्टी. पूर्वी मुंबईला ट्राम गाड्या असायच्यांना, त्यापेक्षाही खूपच लहान डबा. मध्येच डोंगराच्या कपारीशी जंगलाझुडूपांत गाडी का बरं थांबली म्हणून बघावे, तो स्टेशनाची पाटी दिसते हिलग्रोव्ह, नाहीतर रनीमेड, नाहीतर काटेरी रोड–(हे नाव शुद्ध मराठी वाटतं ना?) निघाल्यापासून दोन तासांनी येते 'कूनूर'–आकाशातल्या बापाचा संदेश तर निघाल्यापासून जणू प्रत्येक डोंगरावर मिळतच असतो, कूनूरला घंटानादही ऐकायला मिळतात. कूनूर म्हणजे निलगिरी चहाचे मळे असं समीकरण. पण स्टेशनवर चहा घ्यावा तर, दुसरा घोट घेण्याचं धाडस होत नाही. बघता बघता कुनूर मागे पडते अन सृष्टीसौन्दर्य पाहत पाहत, डोंगर-माथ्यांवरून तळाशी दिसणारे ढग पाहता पाहता येते वेलिंग्टन. येथे सरक्षण खात्याचे कॉलेज व ठाणे आहे. बड्या बड्यांच्या मुलांकरिता रेसिडेन्शियल कॉन्व्हेंटस आहेत. तुम्ही 'मेरा नाम जोकर' पाहिला असेलच, त्यातले शूटिंग याच रेल्वेवरील. पुन्हा डोंगर चढणे. डोंगरांच्या उतरणीवर दूरवर हिरव्या रंगाच्या वड्या मांडून ठेवल्याप्रमाणे दिसतात चहाचे मळे! भर उन्हातही थंडी वाजू लागते अन तेवढ्यात दिसते एक मोठ्ठी लाल रंगाची गिरणी. हीच ती संरक्षण खात्याची जुनी अरवें-काडू फॅक्टरी. ब्रिटिशांनी निवडलेल्या सुरक्षित ठिकाणाचं कौतुक वाटते. पुन्हा चढ चढणे. आता दोन रुळांच्यामध्ये एक तिसरा दात्यादात्यांचा रूळ दिसतो. ही काय भानगड बुवा? जणू काही सायकलची चेन दोन रुळांमध्ये बसवलीय! आता, प्रत्येक डब्याचा कंडक्टर सावध होतो अन इतका वेळ उचलून धरलेली दात्या-दात्यांची चाके, चढावर खाली पाडून देतो. गाडी कधीकधी अक्षरशः उभी राहते, पण या नव्या तिसऱ्या रुळामुळे मागे जात नाही घसरून.

आतापर्यंत पाच हजार फूट चढून आलेले आहोत अन अशा उंचीवर दिसते 'पायकर' धरण–धरणाचा तलाव व लहानसे पॉवरहाऊस! निलगिरी पर्वता-वरील चमचम करणारी वनस्पती हनुमंताचेच वेळी होती. आज पर्वतात चमचम-णारे विजेचे दिवे ही पायकर डॅमची कृपा. जवळच 'इंदू' दिसते. ही मध्यवर्ती सरकारची फोटो-फिल्म्स बनवणारी फॅक्टरी. केटी आणि लव्हडेल ही स्टेशन्स मागे टाकताच दिसू लागते मोठे सरोवर. डोंगरामधून आडवेतिडवे वाकडे तिकडे पसरलेले अन सरोवरात नौकाविहार करणारी जोडपी! वल्ही मारून मारून मेटाकुटीस आलेला 'तो' आणि त्याची तिरपिट पाहणारी मिस्किल 'ती' मंगळसूत्राच्या वाटचा उलटचा अर्थात! अन असेच कांचीपूरम गढवाल बनारस साड्यांचे, ग्वा-लियर सूटांचे ते चालते फिरते प्रदर्शन पाहता पाहताच गाडी थांबलेलीही असते. होय, प्रवास संपलेला असतो अन हेच ते उटकमंड वा उदकमंडलम!

बघा, नुसतं वर्णन वाचूनच निलगिरी-रेल्वे तुम्हाला आवडली ना? जे जाऊन आलेले असतील त्यांना 'त्या गोड' स्मृती आठवतील. जे गेलेले नसतील ते जाण्याचा विचार पक्का करतील. तुम्ही गेलेले असा वा नसा, उन्हाळा संपलेला असला तरीही लौकरच उटकमंडला जरूर जा. शेवटची 'निलगिरी रेल्वे'तून प्रवासाची मौज लुटून घ्या. शेवटची ? होय ! निलगिरी रेल्वे बंद होणार आहे !

वास्तविक रेल्वे खात्याच्या पोटातील ही मळमळ मागेच बाहेर आलेली आहे. या मार्गावर गाड्या चालवून म्हणे दमडीचाही फायदा होत नाही, शिवाय लोकही प्रवास करतात ते केवळ मौज म्हणूनच. त्यापेक्षा बंद करून, रेल्वेरूळ मोडीत विकून का टाकू नयेत ? मधूनमधून जेव्हा जेव्हा संधी मिळते तेव्हा तेव्हा रेल्वेखाते आपलं घोडं पुढं दामटते व लोकांच्या विरोधाची थप्पड बसली की गप्प बसते. स्वतःला होणारा तोटा, भरमसाठ भाडेवाढ करूनही भरून येत नाही. कार्यक्षमता वाढवून पाहण्याचं नाव नको. अशावेळी रेल्वेखाते असा काही कांगावा करते की, जणू काही आजमितिला होणारा सारा तोटा निलगिरी रेल्वेमुळेच ! ते रेल्वेचे रूळ काढून, दोन आणे किलोच्या भावात भंगार म्हणून देखील कुणी पत्करणार नाही. अहो १८९१ साली ब्रिटिशांनी ही रेल्वे बांधली, तेव्हापासून तिची काळजी घेतलीय कुणी ? त्या गोऱ्यांनी घेतली तेवढीच. पुढे स्वातंत्र्यानंतर ?

काही महिन्यांपूर्वी इकडील वर्तमानपत्रांना 'कुणीतरी, बातमी दिली, अन् ती प्रसिद्धही झाली. सध्या असणाऱ्या बारा इंजिनांपैकी आठ, दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी म्हणजे ३०।३२ वर्षांपूर्वी आणलेली आहेत व चार १९५२ मध्ये म्हणजे २० वर्षांपूर्वी. नवनवीन सुधारणांनी युक्त इंजिने स्वित्झरलंडमधून आयातही करीत नाहीत ना देशात बनवीत नाही. गेल्या वर्षी रेल्वेमार्गाचे स्लीपर्स बदलण्यासाठी ६६००० रु. मंजूर झाले—स्लीपर्स आले न कुठेतरी माशी शिंकली व स्लीपर्स दुसरीकडे कुठेतरी वापरले गेले. या रेल्वेवर स्टाफही कमीच आहे. आठ स्टेशन मास्तर कमी आहेत, तर ६४ ब्रेक्समन हवेत—प्रत्येक्षात आहेत २८. रेल्वेमार्गाची डागडुजी करण्यासाठी १५ गँग-पार्टी (प्रत्येकीत १२ जण) होत्या, त्यातल्या दोन कमी झाल्या. मेटूपालयमवरून उटीला जाण्यास फक्त सकाळीच दोन गाड्या, त्याही चारच डब्यांच्या. तीच गोष्ट परतण्यासही आणि महत्त्वाची गोष्ट तर पुढेच आहे. डोंगराळ भागातील रेल्वे म्हणून सरकार २॥ पट भाडे आकारते. ३० मैलांना एरव्ही जेमतेम पावणेदोन रुपये तिकिट पडते तर निलगिरी रेल्वे घेते पावणेपाच रुपये ! आणि इतके असूनही रेल्वे तोटयातच !

रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष श्री. बालिगा, २३ एप्रिलला दिल्लीस म्हणाले 'लोक केवळ मजा म्हणून प्रवास करतात. ज्यांना कामावर लौकर जायचे असते ते बसनेच जातात. म्हणून निलगिरी रेल्वे बंद करणेच ठीक' पण आहे त्या परिस्थितीत

पृष्ठ ४३ वर

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## ढाक्का डायरी थेके

नुकतीच विधानसभेची बैठक पार पडली. एके काळी अयुब खानांनी बांधलेल्या पूर्व पाकिस्तान असेंब्ली हाऊस नामक इमारतीतच ही बैठक घेण्यात आली. तेथें फक्त ३०० लोकांपुरतीच जागा असल्याने सर्वांना अडचणीतच बसावे लागले. बहुतेकांनी पैजामा, अंगरखा व 'मुजीब कोट' असा वेष परिधान केला होता. चर्चा सुरू असताना कुणीतरी स्पीकरचे लक्ष 'जीना कॅप' घातलेल्या काहीजणांकडे वेधले. हे जुन्या राजवटीचे चिन्ह आहे असे सांगून स्पीकरनें त्यांना ती टोपी घालण्यास हरकत घेतली. ताबडतोब त्या सर्वांनी आपापल्या टोप्या काढून टाकल्या.

एकदा एक सभासद मध्येच उठून उभें राहिले आणि म्हणाले की कामकाजाला सुरुवात करण्यापूर्वी कुराणातून काही ओळी वाचण्यात याव्यात, परंतु या मागणीला इतरांनी विरोध केला. स्पीकरनेही तिचा निषेध करून म्हटले की बांगला देश हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असल्याने फक्त कुराणामधील ओळी वाचून चालणार नाही. कुराण वाचले तर बायबल आणि गीतादेखील वाचावी लागेल. त्यापेक्षा काहीच न वाचणे योग्य. ◻

बंगाली ही बांगला देशची राष्ट्रभाषा असल्याने असेंब्लीचे सभासद तिचा वापर करण्याचे बाबतीत फार जागरूक! चर्चा सुरू असताना एक सभासद उठले नि अभावितपणे म्हणाले Mr. Speaker, Sir, I have something to say very urgent..." ताबडतोब बाकीच्यांनी आरडाओरड सुरू केला आणि त्या महाशयांना बंगालीतून बो ण्यास भाग पाडले. सेशनच्या शेवटच्या दिवशी प्रधानमंत्री शेख मुजीब यांनी आपले भाषण 'थँक यू' शब्द हे उच्चारून संपवले. पण लागलीच त्यांनी चुकीची दुरुस्ती केली आणि म्हणाले! 'धन्यवाद!' ◻

बांगला देशातील स्वातंत्र्य युद्धामुळे वर्षभराहून अधिक काळ स्थगित झालेले शैक्षणिक जीवन पुनश्च सुरळीत सुरू झाले आहे. ढाक्का युनिव्हर्सिटीचे वेगवेगळे भाग विद्यार्थ्यांच्या अस्तित्वानें गजबजू लागले आहेत. स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेल्या व त्यातून वाचलेल्या विद्यार्थ्यांनी आपले अभ्यासक्रम नव्या जोमाने पुन्हा सुरू केले आहेत. विद्यापीठाच्या तळमजल्यावरील नोटीस बोर्डावर निर्घृण हत्येला बळी

पडलेल्या विद्यार्थ्यांच्या नावाची यादी लावलेली आहे. तसेच ज्या ठिकाणी हत्या झाली व विद्यार्थ्यांची प्रेते गाडण्यात आली त्या जागेभोवती कुंपण बांधून ती सुरक्षित ठेवण्यात आली आहे. काही ठिकाणी इमारतीच्या दुरुस्तीचे कामही सुरू आहे. □

पंतप्रधान शेख मुजीब दिवसाचे अठरा तास कामात व्यग्र असतात. सकाळपासून पाच वाजेपर्यंत सेक्रेटरिएटमध्ये कामकाज पाहतात व पाचनंतर गण भवनमध्ये जाऊन बसतात. ते भेटीला आलेल्या कुणाही सामान्य व्यक्तीला प्रवेश मिळतो. प्रत्येकाशी ते बोलतात; कुणाचीही निराशा करीत नाहीत.

असेंब्लीतील अवामी लीगच्या सभासदांना ते नेहमी सांगतात की, आपापल्या विभागातील जनतेशी संपर्क साधून त्यांच्या अडचणी समजावून घ्या व त्यांना मदत करा; राष्ट्राच्या उभारणीचे काम जोमाने सुरू करा. 'आता हीच वेळ आहे, आपल्याला खूप कष्ट केले पाहिजेत. एक क्षण देखील वाया घालवता येणार नाही. असे ते सभासदांजवळ बोलले. □

बांगला देशच्या लोकांनी 'बंगाली वर्षारंभ दिन' स्वतंत्र देशात प्रथमच साजरा केला. देशाला खरोखरीच 'सोनार बांगला' बनविण्याचे संकल्प सोडले गेले. वंग-बंधूच्या आदर्शाची उजळणी झाली. अनेक सभा झाल्या नि समारंभ उत्साहाने पार पडला. चार वर्षापूर्वी हाच 'पहिला वैशाख' साजरा करण्यासाठी त्यावेळच्या अयुब सरकारने हरकत घेतली होती. कारण हा सण म्हणजे आयात केलेल्या हिंदु संस्कृतीचे प्रतीक आहे असे त्यांचे म्हणणे होते. गेल्या वर्षी 'पहिला वैशाख' उजाडला तेव्हा बांगला देशची भूमी बंगाली रक्ताने भिजलेली होती. पाकिस्तान्यां-बरोबर आणिबाणिचे युद्ध लढवण्यात ते सारे गुंतले होते.

बांगला देश सरकारने यावेळी सुट्टी जाहीर केली आणि वर्तमानपत्रांनी त्या दिवशीचे खास अंक प्रसिद्ध केले.

## मौलाना भाषानी यांनी दिलेला आश्चर्याचा धक्का

गेल्या फेब्रुवारी महिन्यात नॅशनल अवामी पार्टीचे नेते मौलाना अब्दुल हमीद खान भाषानी यांनी टांगाईलमध्ये आपल्या पक्षाची सभा घेतली. स्वातंत्र्यानंतरची ही पहिली वहिली सभा होती. त्यावेळी त्यांनी जाहीर केले होते की त्यांचा पक्ष अवामी लीग सरकारला हरतऱ्हेने मदत देईल जोवर धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीयवाद आणि समाजवाद यांचा अवलंब करूनच सरकार आपले धोरण ठेवील.

परंतु अगदी अलीकडच्या जाहीर भाषणांमध्ये मात्र त्यांनी अवामी लीग सरकारवर कडक टीका केली. आजचे नेतृत्व अपयशी ठरविले आणि सरकारी

राज्यकारभार स्वच्छ नसल्याचा आरोप ठेवला. या त्यांच्या वक्तव्यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. वास्तविक अनेक अडचणींना तोंड देत असलेल्या बांगला देश सरकावर अशा तऱ्हेची टीका करण्याने राज्यात गोंधळ माजण्याची शक्यता आहे. शिवाय त्यामुळे विरोधी पक्षांना अप्रत्यक्ष प्रोत्साहन दिल्यासारखेच होणार आहे, जेणेकरून भारत व बांगला देश यांचे परस्पर संबंधात वैमनस्य निर्माण होण्याची शक्यता उद्‌भवते.

मौलाना भाषानी यांनी अवामी लीग सरकारला अपयशी म्हणण्याचे कारण आवश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती त्यांनी आटोक्यात आणल्या नाहीत आणि काळा बाजार करणारांविरुद्ध कारवाई केली नाही हे होय. त्यांनी म्हटले, की बांगला देशचे लोक अक्षरश: उपाशी मरत असताना भारतात भरमसाट प्रमाणावर तांदूळ चोरून नेला जात होता. त्यांनी सरकारला ताकीत दिली आहे, की आपल्याला भारताचा 'गुलाम' बनून राहायचे नाही हे सरकारने लक्षात ठेवावे.

मौलानांच्या म्हणण्याप्रमाणे अवामी लीग सरकार हे एकतंत्रीच असून मुक्ति-संग्रामात भाग घेणाऱ्या सर्व पक्षांना जमेला धरूनच घटनेची आखणी करणे आवश्यक आहे. राजशाही येथील जाहीर सभेत ते म्हणाले, की समाजाच्या प्रत्येक थरातील जनतेला अनुसरून आपली उद्दिष्टे सरकारने न ठरवली तर आपण सरकारच्या घटनेला मान्यता देण्यास मुळीच तयार होणार नाही.

## विरोधी पक्षांच्या हालचाली

अल-बदर आणि अल-शाम पक्षांवर बहिष्कार टाकण्यात आला असूनही त्यांच्या सभासदांच्या हालचाली जोराने सुरू झाल्या आहेत. सरकारला विरोध करणाऱ्या पक्षांबरोबर ते हातमिळवणी करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यायोगे सध्याचे सरकार हाणून पाडण्याचा त्यांचा विचार आहे. शिवाय 'बांगला जातीय दला'ने प्रथमच भारत-बांगला देश मैत्रीविरुद्ध आवाज उठविण्यास सुरुवात केली आहे. दोन्ही राष्ट्रांतील कराराचे पत्रक फाडून टाकावे, अशी त्यांची मागणी आहे. याचे कारण ते म्हणतात, की गेल्या चार महिन्यांत ज्यूटाच्या २० लाख गठाणी भारतात चोरून नेण्यात आल्या आहेत.

अर्थात अवामी लीग सरकारने त्यांच्याविरुद्ध कट करणाऱ्यांना धोक्याच्या सूचना दिलेल्या आहेत यावरून ते सरकार ह्याबाबत फार जागरुक आहे हे सिद्ध होते. पंतप्रधान शेख मुजीब यांनी अनेक वेळा सांगितले, की भारत-बांगला देश मैत्रीच्या आड जो कोणी येईल त्याचा सर्वनाश होईल. देशाची अवस्था सुधारण्याचे डोंगराएवढे काम समोर असताना सरकारला सर्वांकडून मदतीचीच अपेक्षा आहे.

□ □ □

# स्नेहयात्रा

## सौ. निर्मला पुरंदरे — चार

खेड्यातलं वास्तव्य संपत आलं होतं. आपल्यासारखेच तेथील खेड्यातील लोक साधे-प्रेमळ-अगत्यशील वाटतात. जवळ जवळ पुष्कळ ठिकाणी आता टलिव्हिजन पोचला आहे. सगळं जगच जणू काय त्यांच्या मुठीत आलं आहे असा भास होतो. शेतकरी शेतावर कष्ट मनापासून करतो. शहरातील वातावरणाबद्दल यांच्याही मनात 'आम्ही काय बावा, खेडवळ' असा न्यूनगंड आहेच. तरुण पिढीला आता शेतीचं फारसं आकर्षण वाटत नाही. शहरांकडे धाव घेण्याची प्रवृत्ती फार मोठ्या प्रमाणावर आहे. आणि ही गोष्ट माझ्या फ्रेंचच्या वर्गातील अनेक देशांच्या स्त्री पुरुषांनीही सांगितली. शेतीमध्ये यांत्रिकीकरण खूपच झालंय. त्यामुळे माणूसबळाची तेथे आवश्यकता नाही असं तरुण-तरुणींना वाटतं. खेडी अशा तऱ्हेनं ओस पडू नयत म्हणून सरकारकडे उद्योगधंद्याचं विकेंद्रीकरण करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर मागणी केली जाते आहे. सर्व उद्योगधंदे पॅरिस व पॅरिसच्या आसपास एकत्रित झाले आहेत. खेड्यांचाही सर्व दृष्टींनी विकास व्हावा, शहरांमधील गर्दी कमी व्हावी यासाठी हे विकेंद्रीकरण अत्यावश्यकच आहे. तशा योजना आखल्या जात आहेत.

एका मुलींच्या वसतिगृहात एक आठवडा मी रहात होते. या सर्व मुली शेतकरी कुटुंबातल्या. आर्थिक परिस्थिती बेताचीच. शालेय शिक्षण संपल्यावर या मुली या संस्थेत येतात. नर्सिंग, शिक्षिका, शेतकरी समाज-कल्याण साहाय्यक किंवा अशाच निरनिराळ्या व्यवसायात पदार्पण करण्यापूर्वीच काहीसे मूलभूत शिक्षण त्यांना येथे मिळतं. ३ महिने पुस्तकी अभ्यासक्रम व १ महिना त्यांनी हवं ते काम शोधून

तेथे काम करायचं. त्यांची बौद्धिक पातळी बेताचीच असते.

निरनिराळ्या ग्रुप्समध्ये मी बोलत असे. एकूण ६० मुली शिक्षिका होणं, मॉंटे-सरी स्कूलमध्ये शिकवणं, नर्सिंगचा अभ्यासक्रम घेणं अशाच स्वरूपाच्या मुलींच्या आवडी दिसून आल्या. त्यांना म्हटलं की तुम्हाला शेतात काम करणं किंवा शेतकरी नवऱ्याशी लग्न करणं आवडेल का ? तर फक्त २ मुलींनी 'हो' म्हणून सांगितलं. आठवड्याच्या शेवटी मी स्लाईडस दाखवल्या. मुलींनी खूप प्रश्न विचारले. शाळेचे अध्यक्ष, प्रिन्सिपॉल वगैरे सर्वच लोक या कार्यक्रमाला हजर होते. त्या दिवशी संध्याकाळच्या जेवणात गोड पदार्थ म्हणून मी सर्वांना शिरा केला होता. रात्री प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम खूप छान झाला.

पाहिलंस, मध्येच किती दिवस निघून गेले ते ! काही ना काही काम मध्ये निघतं आणि तुला लिहीणं राहून जातं. कालच माझी मैत्रीण क्लोदिन लसतिचे हिचं पत्र आलंय. तिच्या घरी मी रहात होते महिनाभर. तिचे आई-वडील, एक बहिण फ्रॉन्सिन असे तिघंजण एका घरी व क्लोदिन छोटासा ब्लॉक घेवून तिथे रहात असे. मी असे तेव्हा रोज ती मोठ्या घरीच जेवा-खायला यायची.

१९६८ मध्ये ती पुण्याला आली होती. नऊ-दहा फ्रेंच लोकांचा ग्रुप तीन दिवसां-साठी मी कोल्हापूरला घेऊन गेले होते तेव्हा त्यात ही होती बरं का ! इंग्रजी बोलण्याचा तिला मुळीच सराव नव्हता. त्यामुळं आमचं संभाषण जवळजवळ मुळीच झालं नव्हतं. त्यांच्या घरी मी ज्या दिवशी रहायला गेले तेव्हा दार उघडता उघडता ती म्हणते, 'अरे, मला माहीत आहेत या' आणि मी फ्रेंचमध्ये बोलायला लागले न मग आमची गट्टीच जमली.

सहा फूट उंचीची ही धिप्पाड मुलगी. मनमोकळी, हौशी, शांत आनंदी आहे अगदी. भारतावर तुडुंब प्रेम. हिच्याबरोबर मी रस्त्यात चालायला लागले की लॉरेल हार्डीचीच जोडी वाटायची. अश्शी खळखळून हसली मी तिला म्हटलं तेव्हा. आता हिचं वय जवळ जवळ सत्तावीस अठ्ठावीस. जगातल्या कुठल्याही आईप्रमाणे हिच्या आईलाही वाटतं, की दोघींची लग्न व्हावीत. त्यांचे घर-संसार आनंदाचे असावेत. पण या दोघी बहिणींचा काही विचार दिसत नाही. आणि आता या क्लोदिनला ६।।–७ फूटाचा नवरा तरी शोधायचा कसा ? बिचारीला बूट, मोजें, फ्रॉक्सची कापडं, साड्या सगळ्यांचाच विकत घेताना प्रश्न पडतो. परमेश्वराची तरी कमालच आहे. मात्र उंच-निच स्त्री पुरुष आपल्यापेक्षा तिकडे प्रमाणानं जास्त हे. क्लोदिन जरा जास्त धिप्पाड येवढंच.

अनाथ मुलांना आधार देऊन त्यांना शिक्षण-नोकरी-व्यवसाय मिळण्याला हात-भार लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका Remand Home सारख्या संस्थेत क्लोदिन काम करते. ही संस्था सरकारी मदतीवर चालते. संपूर्ण फ्रान्सभर हिच्या शाखा आहेत. आई-वडिलांनी सोडून दिलेलीं मुलं, आई-वडिलांचं पटत नाही तेव्हा

घरातील त्रासाला कंटाळून पळून आलेली मुलं-मुली, दारुड्या वडिलांच्या सहवासात रहाणं नको म्हणून घरातून निघून गेलेली मुलं अशा व इतर अनेक अडचणींमुळे अनाथ झालेली १६ वर्षे वयापर्यंतची मुलं यथे आसरा मिळवण्याच्या अपेक्षेनं येतात.

आलेल्या या मुलांशी विश्वासानं बोलून, त्यांना आधार वाटावा असं बोलून शक्य तर त्यांची एकाद्या शाळेच्या वसतिगृहात, एखाद्या कुटुंबात रहायची सोय करण्याचं काम क्लोदिन करते. तिला पगार चांगला आहे. एक महिनाभर मी हिच्याबरोबर काम करत होते. अनेक मुला-मुलींच्या कहाण्या ऐकायला मिळाल्या. त्यांच्या प्रश्नांवर उपाय शोधण्याचे कितीतरी प्रयत्न खाजगी-सरकारी संस्थामार्फत केले जातात हेही जवळून पहाता आलं, कुमारी मातांचीही व्यवस्था पहाणारी काही केंद्रे पाहिली. अडचणीत सापडलेल्या या मुलींची सुखरूप प्रसूती झाल्यावर त्यांच्यासाठी नोकरी, उद्योग शोधून देणं, त्यांना आसरा मिळेल अशी व्यवस्था करणं हेही क्लोदिनच्या कामात येतं. अशा मुलींकडे पहाण्याचा समाजाचाही दृष्टीकोन उदार आहे असं वाटतं. धकाधकीचं जीवन, वाढतं रहाणीमान प्राप्त करून घेण्यासाठी करावी लागणारी धडपड, अफाट वेगानं चालू असलेलं औद्योगिकरण या व अशा अनेक कारणांनी दोन वेळचं पोट भरणं सुलभ होत असलं तरी इतर अनंत गुंतागुंतीचे प्रश्न उद्‌भवताहेत. हे अटळच आहे असं तुला नाही का वाटत ? नित्य नवीन चालू असलेल्या संशोधनांमुळे व्यावहारिक मूल्ये, नैतिक मूल्ये काल होती ती आज राहिली नाहीत, राहू शकत नाहीत. महापुरात जसं बऱ्याबरोबर वाईटही वाहून जावं, उन्मळून पडावं तसं कालप्रवाहाच्या सध्याच्या जबरदस्त प्रवाहात होणारी उलथापालथ आपल्याला पहावी लागणार आहे.

कशावरून निघाला हा विषय ? हं—कुमारी माता. बघ नं. ती जिसलेन. इतकी गोड मुलगी. वय वर्षे सोळा. सौम्य चेहरा, गालाला खळी, सुरेखच आहे दिसायला. तिला दवाखान्यात भेटायला गेले. बाळंत झाली होती. मुलगा झाला होता. ज्याच्याकडे याचं पितृत्व आहे तो मुलगा १८ वर्षांचा. सध्या तुरुंगात एका चोरीच्या प्रकरणात शिक्षा भोगतोय. जिसलेनला त्याला पुन्हा भेटण्याची, लग्न करण्याची मुळीच इच्छा नाही. ती आता उद्योग-नोकरी करून या मुलाला सांभाळणार म्हणते. घरच्या मंडळींचा फारसा आधार ती घ्यायला तयार नाही. अशीच ती पॅट्रिशिया, निकोल आणि ती आणि ती आणि ती. त्या ख्रिस्तीनला मी विचारलं, अगं पुन्हा तू अशा प्रसंगात सापडणार नाहीस असं कशावरून ?' अंग शहारल्यासारखं करून म्हणते, 'नको ग बाई, आताच पुरे झालं.' पण माझं मन बावरलं असतं. थोडा काळ जाईल. ह्या वेदना, काळजी विसरली जाईल न् मग पुन्हा कुणाची तरी ओळख...अर्थात त्यावरही उपाय शोधले आहेत. ही अल्पवयीन मुलं, मुली ज्या जिद्दीनं आयुष्याला सामोरी जातात, ते पाहून मन अचंबा करतं हे खरं. मला तरी

वाटतं, की हे प्रश्न जगभर सारखे आहेत. सरकारनं, समाजानं त्यांच्यासाठी शोधलेले उपाय कमी-जास्त प्रभावी असतील एवढेच.

क्लोदिनबरोबर पाहिलेल्या, ऐकलेल्या या अनेक कथा मला खूप काही सांगून गेल्या म्हणेनास का! फ्रान्समधील माझ्या कार्यक्रमाच्या आखणीमुळे हा एक फायदा झाला, की ते समाजजीवन मला असं विविधांगांनी पाहता आलं. आणि तुला गंमत सांगते, की या संस्थेत मी क्लोदिनबरोबर महिनाभर काम करायचं ठरवलं होतं? तर ही अशा अवघड परिस्थितीतील, नाजुक मनःस्थितीतील मुलं-मुली माझा वेष, माझं परदेशीय अस्तित्व लक्षात आलं, की बिचकतील, मनमोकळी बोलणार नाहीत, अशी भीती गी पॉतव्हँ, क्लोदिन व ॲलन शमँ यांना वाटत होती. तेव्हा मी युरोपियन पोषाख घालावा अशी त्यांची सूचना होती. माझी समजूत तर या मुद्द्यावर पटेना. मी म्हटलं की, नुसते कपडे बदलून का माझी ओळख बदलणार? माझं बोलणं, चेहरा, केस हे कसं बदलायचं? तेव्हा कसं का होईना, पण पोषाख भारतीयच असू द्यावा यावर एकमत झालं आणि समाधानाची गोष्ट म्हणजे ही मुलं-मुली माझ्याशीही मोकळेपणानं बोलत असत. आमच्या संस्थेच्या डायरेक्टर मादाम मोकाँसँ यांनी या अनुभवाचा मोठ्या कौतुकानं उल्लेख केला होता.

खेडेगावातील वास्तव्य, शहरामधील निरनिराळ्या संस्थांचा, तेथे काम करणाऱ्या व्यक्तींचा परिचय, कुटुंब जीवनाची जवळून ओळख ह्या सगळ्यात नकळत माझं फ्रेंच बोलणं सुधारत होतं. हसू नकोस, आश्चर्य वाटून घेऊ नकोस, पण सांगते, की निरनिराळ्या शाळांमधून, कॉलेज-युनिव्हर्सिटी विद्यार्थ्यांच्या गटांमधून, महिला मंडळांमधून माझ्याजवळील स्लाईडस् दाखवण्यासाठी निमंत्रणं येत असत. दोन-अडीच तास त्यांच्या आधारे प्रश्नोत्तरांचे कार्यक्रम होत असत. क्लोदिन, ॲलँ, गी फ्रॉन्सिन, सोलॉंज, मारी फ्रॉन्स्वॉज आणि कितीतरी माझे मित्र-मैत्रिणी या कार्यक्रमात अत्यंत उत्साहानं, अगत्यानं भाग घेत असत म्हणून सांगू? धुकं असू दे, पाऊस-बर्फ असू देत, त्यांनी कधी अडचणींचा बाऊ केला नाही. काही ठिकाणी स्लाईडस् दाखवल्या, काही ठिकाणी जेवणाच्या कार्यक्रमात आपले पदार्थ करून-जेवणानंतरचा प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम तर काही ठिकाणी पॅरिसमधल्या भारतीय वकिलातीतून नेलेल्या डॉक्युमेंटरीज दाखवल्या. पंचवीस लोकांपासून ते शे-सव्वाशे लोकांच्या सभेत असे कार्यक्रम फार प्रभावी झाले. नवल वाटतंय नं तुला? माझाही तो एक अनुभव होता. अशा कार्यक्रमांमधून लक्षात येत असे, की आपल्यालाच भारतातल्याच किती गोष्टी अजून कळून घ्यायच्या आहेत आणि त्याबरोबरच तेथेही भारताबद्दलचं किती अज्ञान आहे, काही समजुती कशा ठाम आहेत म्हणून!

पण एक सांगते, की माझ्यासारख्या एका सामान्य स्त्रीनं आपल्या तुटपुंज्या ज्ञानावर, तुटपुंज्या साहित्यावर भारताबद्दलची वस्तुस्थिती कळण्यासाठी तेथे जे प्रयत्न केले तसेच किंवा त्याहूनही अधिक प्रभावी प्रयत्न अतिशय कौशल्यानं आखणी

करून आपल्या वकिलाती का नाही करू शकणार ? फ्रान्स, जर्मनीत मला भारता-बद्दल खूप खूप सहानुभूतीच आढळून आली. त्यांना उत्सुकता आहे. पूर्वेकडच्या या प्रचंड देशाबद्दल एक नवीनच कुतूहल तरुण पिढीत जागृत झालं आहे. त्याचा आपण आता चित्रपट, व्याख्यानं, चर्चासत्रं, व्यापार, वाद्य-संगीत, नृत्य वगैरे माध्यमातून भारताची वास्तववादी ओळख करून देण्यासाठी पुरेपूर उपयोग करून घेतला पाहिजे, नाही का ?


मुक्काम पॅरिस. Group Dynamies च्या एका छोटचा कोर्ससाठी मी आले. सामाजिक कामांमध्ये भाग घेणाऱ्या लोकांसाठी तसंच नर्स, प्रिस्टस, डॉक्टर्स, labour officers वगैरे ज्यांचा ज्यांचा म्हणून समाजात वावरण्याचा प्रसंग येतो अशा लोकांसाठी लहान मोठे कोर्सेस फ्रान्समध्ये चालू असतात. दोन सत्रं मी केली. या कोर्सेसची फी फार मोठी असते. माझ्या कार्यक्रमात हे कोर्सेस माझ्या भाषा ज्ञानाच्या मानानं फार लवकर आखले गेले. या सत्रांची पद्धतच मुळी मला अज्ञात होती. शिवाय तुटपुंजे भाषाज्ञान. या सत्रानंतर श्री. पॉनव्हँशी चर्चा करताना आमच्या लक्षात आलं की माझ्या मुक्कामाच्या शेवटी ही सत्रं घेता आली असती तर मला जास्त समजली असती. का होईना पुढचे कार्यक्रम आखताना या अनुभवाचा एक धडाच मिळाला. पॉनव्हँना नाही का ?

बघ हं कसे होते हे कोर्सेस ते. व्यक्तीमत्वाचा विकास हा या कोर्सचा उद्देश. विचार करायला शिकणं, तो विचार बोलून दाखवणं भाव-भावनांचे पदर सुटे करून विश्लेषणाची सवय लावणे या गोष्टींचा या कोर्समध्ये प्रयत्न केला गेला.

पहिल्या दिवशी कोर्समध्ये भाग घेतलेले आम्ही पंधराजण एका ग्रुपमध्ये. असे तीन ग्रुप्स केले होते. तुला आश्चर्य वाटेल ऐकून. अरे एक दहा मिनिटात प्रत्येक सभासदानं आपापली ओळख करून दिली. आमच्या ग्रुपमध्ये एक निरिक्षक होता. आम्हाला कोणालाच नेमकं आपण काय करणार आहोत याची कल्पना नव्हती बरं का. ओळख समारंभ झाल्यावर निरीक्षकानं सांगितलं की तुम्ही काहीही करू शकता. कोणाला काही समजेचना. अरे, ना ओळख ना देख. अशा परिस्थितीत काहीही करा म्हणजे काय करा तरी ? चुपचाप एकमेकांकडे पहात आपले बसून राहिलो बघ. इतकं मनावर tension आलं होतं प्रत्येकाच्याच. काही बोलायला सुचेना, कुणाला काही विचारायला सुचेना. चर्चेला सूत्र सापडेना. निरीक्षकही आपला मुखस्तंभ. अक्षरशः संपूर्ण सकाळचा वेळ असा चमत्कारिक गेला.

दुपारी तिनही ग्रुप्स एकत्र आले. पुन्हा तोच प्रकार. पन्नास माणसं. चार निरीक्षक, धुम्रपानशिवाय चाळा नाही. आगगाडीच्या डब्यात निदान गाडीचा आवाज तरी असतो. येथे काहीच नाही. प्रत्येकाचीच विचारशक्ती कशी थांबली होती म्हणते मी. आणि प्रत्येकाला काहीही, कसही बोलायची वागायची परवानगी होती ह अन तरीही प्रत्येकजण स्तब्ध. मति गुंग झाल्यासारखा होता. निरीक्षक याचंच

IMPRESS H/14



1922 GOLDEN JUBILEE 1972

# पन्नास वर्षांपूर्वी...

मुंबईहून नाशिकला जायचं म्हणजे काशीयात्रेला जाण्याइतका खडतर प्रवास असे.
काळ इतक्या झपाट्यानं पालटला आहे की हाच प्रवास तुम्ही अर्ध्या-एक तासात करू शकता !
प्राचीन तीर्थक्षेत्र नाशिक आज एक औद्योगिक केंद्र म्हणून ओळखलं जातं.
कै. बस्तीराम नारायणदास सारडा यांनी पन्नास वर्षांपूर्वी
बिडी उद्योगाची सिन्नर येथे मुहूर्तमेढ रोवली व ग्रामीण कुटुंबांच्या मिळकतीत भर घालणारा
पूरक रोजगार निर्माण करून एक मोठं सामाजिक कार्य केलं आहे.
मुंबई-नाशिकची ही पेढी 'उंट' बिडीमुळे आज महाराष्ट्रातच नव्हे
तर साऱ्या भारतात ओळखली जाते; एवढंच नव्हे तर अमेरिका, स्वित्झर्लंड, कॅनडा
बेल्जिअम इ० अनेक प्रगत राष्ट्रातही त्यांची बिडी आता जाऊ लागली आहे.
संस्था आपले सुवर्णमहोत्सवी वर्ष मोठ्या अभिमानाने साजरे करीत आहे.
भावी वाटचालही कालानुरूप गतिमान राहील एवढेच नमूद करावेसे वाटते.
लक्षावधी ग्राहकांचे आम्ही आभारी आहोत !

**बस्तीराम नारायणदास सारडा**

मुंबई
नाशिक

निरीक्षण करत होते. सकाळी ९ ते १२॥ आणि दुपारी २ ते ६ या वेळेत एक आठ दहा वाक्यांच्या देवाण घेवाणी शिवाय काहीही घडलं नाही.

संध्याकाळी निकोकडे आले. ॲलँ व निकोलनं उत्सुकतेनं विचारलं, 'काय काय झालं आज ?' माझं तर डोकंच अगदी जड झालं होतं. दिवसभरातल्या शांततेचं वर्णन केलेन काय. दुसरा न तिसरा दिवस यापेक्षा थोडे बोलके गेले. पण नेमके विषय नाहीत. जिकडे वळेल तिकडे संभाषण वळे. ऑन्द्रे तर एकदा हे मनावरचं ओझं असह्य होऊन म्हणाला सुद्धा की आम्हाला नेमकं मार्गदर्शन करायचं नसेल तरू हा निरीक्षक आमच्यात बसलाच तरी कां ? त्याच्या अस्तित्वाचीच अडचण होतेय. निदान त्यानं निघून तरी जावं. पण निरीक्षक गेला नाही. आणि हे ग्रुपचं तार शिड नसलेल्या होडक्यासारखं तीनही दिवस आपलं भरकटत राहिलं.

या सामुदायिक मौनामध्येच एखाद्या तीक्ष्णबुद्धी माणसाला एखादा वेगळा विचार सुचू शकतो असं शक्य आहे का ? विचारशक्तीचा सर्व बाजूंनी कोंड-मारा झाला तर माणूस कसं वागतो ? अशा या मौनात ग्रुपमधील व्यक्ती-व्यक्तीची प्रतिक्रिया कशी असते याचाही हा अभ्यास असू शकतो. मला तर तुरुंगातले कैदी, मोठ्या वार्डात एकत्र असलेले, वर्षानुवर्ष काय करत असतील ? कुठले विषय आपापल्यात बोलत असतील याचीच आठवण आली. तीन दिवसानंतर हे सत्र संपल्यावर केव्हाही एकमेकांशी बोलताना आम्ही नेमकं काय केलं हेच आम्ही सांगू शकलो नाही, फ्रॉन्स्वॉज, जाँ, इरेन वगैरेना मी विचारलं, 'याच संस्थेचं पुढचं सत्र करणार का ? ' बहुतेक नाही ' असं त्यांचं उत्तर होतं.

ज्या निकोलकडे गेले तीन दिवस मी उतरले होते ती मोठी गोड मुलगी. माझी अगोदरची ओळख मुळीच नव्हती. इंग्रजी बोलते. नोकरी करते. तीन खोल्यांचा फ्लॅट घेऊन पॅरिसमध्ये गेली कित्येक वर्ष रहाते. अविवाहित आहे. वय सुमारे अठ्ठावीस वर्षे. तिची आईही जवळपास कुठंतरी रहातात एकट्याच. वडिल इटालियन होते. ते वारले. वरचेवर दोघीहीजणी एकमेकींकडे जात असतात. मुलीला वेळ नसेल तर आई येऊन भांडी धुवून घर स्वच्छ करून जाते. निकोलचं एका तरुण डॉक्टरवर प्रेम होतं. अल्जिरीयातील युद्धात तो मारला गेला. आणि ही आता अविवाहित रहाते आहे. हे फार अवघड आहे असं नाही तुला वाटत ? आपल्या प्रिय माणसाच्या स्मृतीत हे असं एकलेपणाचं आयुष्य घालवणं सोपं आहे का ? या अशा आधुनिक सीता-सावित्री जगाच्या पाठीवर सर्वत्रच असू शकतात नाही का ? निकोलसारखी गोड सुंदर मुलगी एकाकी जीवन जगणार या विचारानं माझं मन अस्वस्थ झालं बघ.

खरं म्हणजे मुलगी पंधरा सोळा वर्षांची झाली की तिची बोहल्यावरची मूर्ती तिच्या आईवडिलांना, दिसू लागणं हेच माहित असलेलं माझं मन निकोलच्या एकलेपणामुळे अस्वस्थ झालं असावं. माझ्या अवतीभवती अनेक अविवाहित मुली

आहेत. आम्ही 'लग्न या विषयावर खूप मोकळेपणानं बोलत असू. लग्न करायचंच नाही हा काही त्यांचा हट्ट नाही. या रूप-गुणवान, सुस्वभावी, कर्तवगार मुलींची स्वाभाविक अपेक्षा स्वावलंबी, स्वतंत्र जीवन असावं अशी असते. अभ्यासातील, आपापल्या कामातील प्रावीण्य, आर्थिक स्वावलंबन, स्वतःचा मित्र परिवार, देशा-परदेशांमध्ये स्वतंत्रपणे प्रवास करणे वगैरे कितीतरी बाबतीत या स्वतःच समर्थ असतात. लग्न करून हे स्वातंत्र्य कशाला घालवायचं ? हा विचार त्यांना लग्नाच्या निर्णयापासून दूर ठेवतो. लग्न करून कुटुंबासाठी आपल्या आवडीनिवडींवर बंधनं घालून घ्यायची हा विचार त्यांना पटत नाही. पाहिलंस नं पूर्व आणि पश्चिमेतील विचारसरणीत किती फरक आहे तो.

आता विषयच निघाला म्हणून पुढे सांगते. विवाह पद्धतीमधील फरक मात्र मला वाटतं दिवसेंदिवस कमी होत जाईल. आपल्याकडे आई वडिलांना मुला-मुलींचे विवाह ठरवणे हा जो प्रकार आहे त्याची तिकडे त्यांना कल्पना करवत नाही. ज्याच्या बरोबर संसार करायचा तो साथीदार हा केवळ स्वतःच्या पसंतीचा असावा हे मुला-मुलीचं मत मान्य केलं गेलंय आता. एकेदिवशी जेनव्हिएव्हशी असंच बोलत बसले असताना ती म्हणते, 'शंभर टक्के विवाह यशस्वी होतील अशी कुठलीच पद्धत अस्तित्वात नसेल तर मुला मुलींनी आपल्या जोडीदाराच्या पसंती-बाबत वडिल माणसांचा सल्ला घ्यावा, त्यांचा विचार हा सुवर्णमध्य असू शकेल.' कोण जाणे बाबा. प्रत्येक गोष्टीतच या सुवर्णमध्याची आज आवश्यकता आहे की जो नेहमीच दूरदूर पळत असतो.

मी जे दुसरं सत्र केलं नं ते मागच्यापेक्षा थोडं तरी समजू शकले. गटामध्ये वागताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी लागते यासंबंधी अनेक बाजूंनी या सत्रात सुचवलं, सांगितलं गेलं. गटामध्ये एकमेकांशी संबंध कसे असावेत, ग्रुप प्रमुखाचं सर्वांशी नातं कसं असावं, सर्वांचं प्रमुखाशी नातं कसं असावं याबद्दल मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करायचा आहे असं कळलं होतं, मला तरी वाटतं यामध्ये माणसाच्या मनाची गुंतागुंत कशी असते, खडा पाण्याच्या पृष्ठभागा-वर मारल्यानंतर उठणाऱ्या तरंगाप्रमाणे एका घटनेतून किती निरनिराळे अर्थ निर-निराळी मनं काढतात ह्याची उदाहरणं या सत्रात मी पाहू शकले. मी ही सत्रं करण्याच्या आधी श्री. गी पॉतन्हँना याबद्दल कल्पना विचारली होती. त्यांनी अशी सत्रं केली होती. मला ते नेमकं असं काही सांगू शकले नाहीत. कोणीच मला समाधानकारक माहिती देऊ शकलं नाही. याही कोर्सला, पाच दिवस रहाणं-जेवण्यासाठी भरमसाट फी होती.

पॅरिसमधून कमरपट्ट्यासारखी सेन नदी संथपणानं वहाते. लहानपणी भूगोलात वाचलेल्या या सेनच्या काठावर पॅरिसच्या प्वॉसी या उपसागरात एक जुन्या सर-दारी वाड्यात या सत्रासाठी पाच दिवस रहायचं होतं. बॅझाँसोला कॉलेजमध्य

भेटलेली मैत्रीण मोनिक सकाळी आठला मला येथे पोचवायला आली होती.

'तुम्ही इंडियन का?' एक तरूण मुलगा मला विचारत होता. मी 'हो' म्हटल्यावर म्हणतो, 'माझं नाव ख्रिस्तीयान. मी सहा महिने भारतात एका प्रवासी कंपनीबरोबर गेलो होतो. दिल्ली, आग्रा वगैरे ठिकाणी हिंडलो. साडी पाहिली तेव्हाच मला वाटलं की तुम्ही इंडियन आहात म्हणून' या स्वभावानं शांत, भारदस्त स्वभावाच्या मुलाची न् माझी छानच गट्टी जमली त्या पाच दिवसात.

सकाळच्या शांत वेळात अंगणातच उभे होतो. सत्रात भाग घेणारे एकेकजण येत होते. आपली आपण ओळख करून देत होते. सत्रात नेमकं काय होणार याबद्दल तमाम मंडळी संभ्रमात बरं का! सगळेच जण एकमेकांना विचारतात. मी अशाच प्रकारची दोन तीन तत्रं करूनही काही सांगू शकत नाही.

आम्ही वीस जण व दोन निरिक्षक असा ग्रुप जमला. परिचय केला गेला. आनंदाची गोष्ट की यामधील निरिक्षक बोलणार होते, बोलायला लावणार होते, भावनांच्या प्रकटीकरणाला आवाहन करणार होते.

या पाच दिवसात सकाळ संध्याकाळ असे कार्यक्रम चालू असायचे. जेवण तयार करण्याचं कॉन्ट्रॅक्ट दिलं होतं. मात्र टेबल लावणं, भांडी विसळणं पुसणं ही कामं आम्हीच आळीपाळीनं करावयाची होती.

मला नाही वाटत की मी अगती जसंच्या तसं वर्णन, वर्गातल्या घटनांचं करू शकेन म्हणून. सकाळच्या वेळात, नऊ ते साडेबारामध्ये आमच्यापैकी कोणीही एखादा प्रसंग सांगायचा व तो आमच्यातील पात्रं निवडून प्रत्यक्ष रंगवायचा. ती दानियेल. किडकिडित, रुपवान व बहुतेक सर्व वर्गाची आकर्षणबिंदू झालेली अशी. तिनं तिच्या घरचा जेवणाच्या वेळचा प्रसंग रंगवायचा सुचवलं. तिच्या कल्पनेप्रमाणे आमच्या ग्रुपमधील किंचितसं का होईना साम्य असलेली आई, वडिल, आत्या, लहान भाऊ, बहीण वगैरे पात्रं तिनं निवडली. खेळ सुरू झाला. बाकीचे सर्वच जण निरिक्षक.

दुसरा प्रसंग ख्रिस्तीयानं निवडला. दोन मुलींशी त्याची प्रेमप्रकरणं अर्धवटच झाली. तिसऱ्या मुलीला घेवून तो त्याच्या आईवडिलांकडे ओळख करून द्यायला येतोय. त्यानं मला आई म्हणून निवडलं. आमच्या ग्रुपचे प्रमुख निरिक्षक श्री. पात्रिस यांना वडिल केलं आणि दानियेलला तिसरी मैत्रीण. माझी म्हणजे -पंचाईतच रे. फ्रेंच भाषेच्या अडचणीमुळे मी असा ॲक्टीव्ह भाग घ्यायची टाळाटाळच करायची बरं का. हिंमतच नाही व्हायची तर! पण ही सर्व मंडळी खूप सहानुभूतीनं मला भाग घ्यायलाच लावायची. 'चुकीचं का होईला पण तू बोल' म्हणायची.

पात्रिस या खेळातले आमचे यजमान. टेबलाभोवती आम्ही दोघंजण बसलो. मी

म्हटलं, 'पात्रिस, तुझ्या (अहो-जाहो बात नस्से हं) लक्षात नाही का आलं की ख्रिस्तीयान आजकाल खुषीत नाही दिसत म्हणून. तुला तो काही बोललाय का? कसल्यातरी काळजीत असल्यासारखा वाटतोय तो.'

'नतालीचं घरी येणं जाणं अगदीच कमी झालंय. त्यांचच काही बिनसलय की काय कोण जाणे. काही बोलतही नाही, सांगतही नाही,'

दारावर टकटक होते. ख्रिस्तीयान त्याच्या नवीन मैत्रीणीबरोबर येतो. तेथील रिवाजाप्रमाणे आई-वडिलांचं चुंबन घेऊन मैत्रीणीची ओळख करून देतो. मैत्रीण त्यांच्याशी हस्तांदोलन करते. एक सात-आठ वाक्यांची देवाण-घेवाण होऊन खेळ संपतो.

यानंतरचा संपूर्ण उरलेला वेळ हा या प्रसंगाचं, त्यातील पात्रांच्या अभिनयाचं प्रत्येकाच्या दृष्टीकोनातून विश्लेषण. यानंतरची प्रसंगाची चिकित्सा, सर्वांनी मतं सांगणं, प्रत्येक पात्राच्या हालचालीबद्दल आपल्याला काय वाटलं, कुठल्यातरी क्षणी आपल्याला त्यात भाग घ्यावासा वाटला का? का वाटला? का नाही वाटला? असे एक का छप्पन्न प्रश्न निरीक्षक पात्रिस किंवा सोलाँज देमोलिए विचारत असत. एका प्रश्नाचे, त्याच्या उत्तराचे कितीतरी सूक्ष्म पदर असू शकतात हे लक्षात येत असे. या सर्व अभ्यासक्रमाचा उद्देशच व्यक्तीमत्व विकसाबरोबर ग्रुपमध्ये वागण्याचं शास्त्र शिकवणं हा होता.

दुपारच्या वेळेत कल्पना विस्ताराचा कार्यक्रम असे. ज्याला वाटेल त्यानं एखादं वाक्य बोलायचं, निरीक्षकांनी त्यांची नोंद घ्यायची, सर्वांची सांगून झाली की मतदानानं बहुमताचं एक वाक्य निवडायचं, नमुन्यादाखल ही काही वाक्यं मला आढळतात.

(१) मी झाड आहे. (२) मी झोपलेला अणू आहे. (३) मी हलत नाही. (४) मला माहीत नाही. (५) मी शोधतोय मला सापडत नाही. (६) माझा स्वभाव balanced आहे असं लोक म्हणतात, मला तसं वाटत नाही, सांग आता तूच, आहे का याला काही आगा पिछा?

बहुमतानं ६ नंबरचं वाक्य घेतलं गेलं. ते सुचवलं होतं ख्रिस्तीयाननं.

निरीक्षक सोलाँज त्याला विचारतात, 'balanced ची तुझी व्याख्या काय? तुझ्या मनासमोर कशाची प्रतिमा उभी रहाते?

'झाड, खडक, स्थिर मनाचा व भारदस्तपणानं निर्णय घेणारा एकादा शेतकरी–निव्वळ वृक्ष व खडकही नाही हं.' ख्रिस्तीयाननं विचार करून सांगितलं.

'आणि अस्थिरतेची तुझी व्याख्या कोणती?' सोलाँचचं त्याला छेडणं चालूच.

'वादळ–वारा' ख्रिस्तीयाननं उत्तर दिलं.

सोलाँजनं तेच सूत्र पकडून सर्वांना विचारलं, 'ख्रिस्तीयानच्या मनातली वादळाची प्रतिमा कोण साकार करील?'

सेवाभावी नर्सचं काम करणारी ओदिल तयार झाली. लहान पक्षी ? जाँ पिएर. वृक्ष ? स्वत: ख्रिस्तीयान, आनमारी धिटुकली खार. झेवियर झाडांना कापण्यासाठी आलेला वाटसरू.

प्रसंगाला सुरुवात झाली. ख्रिस्तीयान दोन हात बाजूला पसरून झाड म्हणून स्तब्ध उभा. स्वत: सोलाँज या थकल्या भागल्यासारख्या विश्रांतीसाठी त्याच्या पायाला टेकून बसल्या. दुसरे निरीक्षक पात्रिस वाटसरुच्या भूमिकेत त्यांच्याशी मनात येईल तसं बोलू लागले.

आता खार, पक्षी, वारा हे त्या व्यापाऱ्याशी बोलू लागतात. व्यापारी झाडं कापण्याची, लाकडाची उपयुक्तता पटवून देण्याचा प्रयत्न करतो. एवीतेवी कधीतरी तो समूळ उखडून नाहीसा होणार आहे. मग आताच तोडायला का नको ? आणि खार, पक्षी, वारा कर्कश आवाज करून वृक्षाचा त्यांचा आसरा न तोडण्याबद्दल कटाक्षानं सांगताहेत.

आम्ही बाकीचे सर्व वर्गात अवतीभवती बसून अगदी शांतपणानं मध्यभागी चाललेला हा प्रकार पहातो आहोत. या प्रसंगात उत्सफूर्तपणे कोणीही भाग घेवू शकतो. आनमारी तशीच सामील झाली होती.

त्यानंतरचं विश्लेषण सोलाँज व पात्रिस इतकं चिकित्सेनं करतात, करवतात की विचारू नकोस. या प्रसंगावर प्रत्येकजण आपलं प्रामाणिक मत देतो. अन् अशातूनच एखादी सहज चकमक झडून जाते. माणूस आत्मपरीक्षण करायला शिकतो. काही वेळेला हळव्या मनाच्या माणसावर विपरित परिणामही होतो. जाक व आनमारी चवथ्या दिवशी म्हणालेसुद्धा की या प्रश्नोत्तरांच्या पद्धतीचा मनाला त्रास होतो. आनमारी रात्रभर अस्वस्थ होती.

आनमारीचाच विषय निघाला म्हणून सांगते, तिची न् माझी छान गट्टी जमली होती. नेहमी जेवायला, न्याहरीला एकत्र असू. एका अलिशान खोलीत आमची पाच जणींची रहाण्याची झोपण्याची व्यवस्था होती. आनमारीचा पलंग माझ्या पलंगा-जवळ. खूप बोलत असे, एक दिवशी सकाळच्या वर्गात प्रत्येक सभासदाला इतर सभासदाबद्दल काय वाटतं हे प्रामाणिकपणानं सांगायचं, राग वगैरे न धरता, प्रत्येकानं ते मत समजावून घेण्याचा प्रयत्न करावयाचा होता. फ्रॉन्स्वॉजचा एक घाव दोन तुकडे करणारा तुटक स्वभाव, दानियेलचा उतावळा व मी म्हणेन तेच खरं करण्याचा स्वभाव, जाकचा भारदस्त, आधार वाटावा असं व्यक्तिमत्व, जाँपिएरचं खेळकर उमदं व्यक्तिमत्व अशी प्रत्येकाची काही ना काही बरी वाईट वैशिष्टय मोकळेपणानं सांगितली गेली. माझ्याबद्दल काय म्हटलं गेलं ते ऐकायचंय का ? बरं वाटेल तुला याची खात्री आहे बघ. सर्वांचं एकमत हं. हिचं व्यक्तिमत्व शांत आहे. आधार वाटावा असं आहे, ही बोलते ते बरोबर बोलते, हिच्या साध्या सौम्य चेहऱ्याकडे पहावंसं वाटतं...' स्तुती वगैरे असली तर विसरून जा हं हे सर्व.

आनमारीच्या बाबतीत नेमकं काय म्हटलं गेलं ते मला आठवत नाही आता. पण दुपारी जेवताना ती टेबलाशी दिसली नाही तेव्हा मी तिला शोधायला वर खोलीत गेले. बाईसाहेब पलंगावर पडून मुसमुसत होत्या 'काय झालं ग ?' मी जवळ बसत विचारलं. एकदम माझ्या गळयात हात टाकून ओक्साबोक्सी रडायलाच लागली. काही समजेचना मला. विचारल्यावर म्हणते, ' कसलं ग आयुष्य हे, आई-वडील विभक्त रहातात. मी स्वतंत्र रहाते. आज दुपारी आईचा फोन आला की घरी ये म्हणून. मला तर मुळीच जावंसं वाटत नाही, लहानपणापासूनच मन विटून गेलंय. हा एकटेपणा अगदी खायला उठतो. काय करावं समजत नाही तिचा फोन आला की.'

काय सांगणार होते तिला मी ! इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलून तिचं मन शांत करून खाली जेवणघरात घेऊन गेले. नंतरही बरेच दिवस तिचा व माझा पत्रव्यवहार चालू होता, अशी ही गरीब, प्रेमळ व भावडी मुलगी.

या दुसऱ्या अभ्यासक्रमाच्या वेळी माझ्या लक्षात आलं की हे तरुण-तरुणी किती मोकळेपणानं आत्मकथन करू शकतात. जीवनात सर्व काही शक्य आहे या कल्पनेने इतरही कोणी त्यात बाऊ वाटून घेत नाही. एकमेकांना समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे असं मला वाटलं. ऐनवेळच्या सुचवलेल्या विषयांवर प्रसंग रंगवण्यात स्वत:चं व्यक्तिमत्व विसरावं मला तरी कौतुकास्पद वाटलं. अनुभव ग्रहण करण्याची इच्छा फार प्रभावी वाटली मला.

या अभ्यासक्रमांमध्ये नेहमीच मी एकेटीच परदेशी नागरिक होते. भारताची माहिती कुणालाच फारशी नव्हती. आपोआप चहाच्या, जेवणाच्या सुटीत साडी, कुंकू, मंगळसूत्र लांब केस आणि इतर रीतिरिवाजावर चौकस प्रश्न विचारले जात असत. ज्यांना आवडेल त्यांना साडया नेसवून दाखवणं हा तर माझा उद्योगच झाला होता बघ. आपल्याकडील विवाहपद्धती, 'एकत्र कुटुंबपद्धती वगैरेंवर चर्चा होत असत. त्यांना खूप कुतूहल निर्माण झालं आहे. जेथे जेथे भारताबद्दलचं त्यांचं कौतुक मला अवास्तव वाटत असे तेथे मी त्यांना सावध करायचा प्रयत्न करायची ? मी सुरुवातीलाच म्हणत असे, " मंडळी, आमचं फार कौतुक करण्यात अर्थ नाही. जाति-भेदांचा अतिरेक करून आम्ही समाजाची प्रगती खिळवून टाकली आहे, एकत्र कुटुंब पद्धतीच्या काही फायद्यांबरोबर व्यक्ती विकासाला पायबंदही बसवून घेतला आहे, हुंडा पद्धत, लाचलुचपत, पालकांचं ऐकणं याचा अर्थ म्हणजे स्वत:च्या मताचं अस्तित्व न दाखवता घडणारी मुलामुलींची लग्नं, एकत्र कुटुंबपद्धतीमधील सासू-सुनांचे तीव्र मतभेद, लग्नात वधूपक्षाला मिळणारा कनिष्ठपणा वगैरे एक का दोन गोष्टी सांगू ?' तत्वं कितीही चांगली असली तरी समाज ती कशी राबवतो याला फार महत्व आहे. त्यावर त्याचा विकास, मानसिक व आर्थिक, अवलंबून आहे. तुला नाही का असं वाटत ? माझ्या देशाबद्दल त्यांच्या बऱ्या-वाईट गोष्टी

प्रामाणिकपणानं सांगताना चर्चेत एक मोकळेपणा येत असे. वितंडवाद टळत असे.

या चर्चेच्या विषयावरनंच आठवलं. सतत चालत असलेल्या या चर्चांच्या कार्यक्रमांमध्ये काही लक्षात राहतील असे प्रश्न विचारले गेले बरं का ! एका तरुण स्त्री-पुरुषांच्या गटामध्ये.

१) तुम्ही एक दोन संस्थांची कामं करता. तुमची आमच्याकडून काय अपेक्षा आहे ?

उत्तर : तुमचा स्नेह मिळावा. आणि भारत जसा आहे तसं तुम्ही त्याला समजावून घ्याव. टेलिव्हिजन, वृत्तपत्रांचा सुकाळ असलेल्या देशात दरिद्री-भारत, रानटी भारत, अडाणी भारत हे एकच चित्र असावं याचं मला दुःख होतंय. या सर्वांबरोबर माहिती असायला पाहिजे अशा अनेक गोष्टी माझ्या देशात आहेत. त्या दाखवायला आमचेच प्रयत्न अपुरे आहेत याची जाणीव आहे.

प्रश्न : हिंदुधर्म समाजाच्या प्रगतीला खीळ घालतो असं तुम्हाला नाही का वाटत ?

उत्तर : धर्मतत्वं चांगली असली तरी काळानुरूप बदल न करता ती तशीच अंधळेपणानं अनुसरणं हे ही खीळ बसण्याचं कारण असू शकतं. याला निरक्षरता हे फार मोठं कारण आहे.

आणखी एका ग्रुपमध्ये मला विचारलं गेलं.

'आम्ही Boal de rie (भाताचा कटोरा) म्हणजेच अविकसिक देशांमध्ये आमचं एकवेळचं जेवण वाचवून ते पैसे पाठवण्याच्या विचारात आहोत. ते पैसे घेण्यात तुम्हाला कसं वाटेल ?'

माझ्या देशातल्या अन्नान्न करणाऱ्या लोकांच्या वतीनं मला उत्तर द्यायचं होतं. मला 'माणूस' तर्फे केलेलं अन्न स्वतंत्रता संचलन आठवलं. टेलिव्हिजनवर मुंबई-कलकत्त्यातील फटपाथवर, स्टेशनांवर, रस्त्यांवरची दाखवलेली भूखी, खपाटीला गेलेल्या पोटाची, भेसूर चेहऱ्यांची माणसं आठवली. मी त्यांना म्हटलं, 'स्वातंत्र्यानंतर फक्त वीस-बावीस वर्षं झालीत. वसाहतवादानं केलेल्या आमच्या शोषणामुळे आमचं अज्ञान दूर व्हायला जरा जास्त अवधी लागतो आहे खरा. परंतु आमच्या देशाचं हे सतत दाखवलं जाणारं चित्र आम्हाला दुःख देणारं आहे. परकिय मदत कठोरपणानं थांबवली जावी असा फार मोठा मतप्रवाह देशात वहायला लागला आहे. या मदतीनं आम्हाला अगोदरच फार पंगू केलं आहे. स्वाभिमानाला आम्ही पारखे झालो आहोत.

आज ना उद्या भारताचं हे चित्र बदलेल. तुमच्या या सहानुभूतीबद्दल मी आभारी आहे. जग या काळात आता लहान झालं आहे. तुम्हाला अविकसित राष्ट्रांबद्दल काही सक्रिय करायचंच असेल तर तुम्ही आमच्याकडील नृत्य, संगीत, चित्रकला, कलावंत बोलावू शकता. त्यांच्या कार्यक्रमांमधून तुम्ही एखादा निधी

जमवून दिलात तर तो आम्हाला ओझं वाटणार नाही. यापुढे देवाण-घेवाण व्हावी. नुसतीच देवाण नको असं मला वाटतं.

आणखी एक नेहमी विचारला जाणारा प्रश्न. 'भारतात गायीला देवता मानलं जातं मग ती इतकी दुबळी कशी? रस्त्यात कुठंही, केव्हाही कशी दिसू शकते? तिची निगा देवतेसारखी का नाही राखली जात? माणसांना खायला पुरेसं अन्न नसताना परदेशांमधून मदत मागवण्यापेक्षा गायींचा अन्न म्हणून उपयोग का नाही करत?'

आली का पंचाईत उत्तराची? मला आठवली ती आपल्या गृहमंत्री नंदांच्या कारकिर्दीतील दिल्लीमधील तमाम साधूवर्गानं केलेली गोहत्ये विरोधी निदर्शनं. तेव्हाच माझ्या मनात आलं होतं की ही मंडळी भाडेखर्च, रहाणं-जेवण, दंगलीचा खर्च करण्यापेक्षा त्यांनी काही आदर्श गोशाळा बांधून दाखवल्या असत्या तर समाजानं, सरकारनं थोडं तरी सहानुभूतीनं त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष दिलं असतं.

आठवणींमधून बाहेर येत मी म्हटलं, 'भारतानं कालानुरूप अनेक बदल पचवले आहेत. बहुपत्नित्व ते एक पत्निकत्व, अष्टपुत्रा सौभाग्यवती भवपासून इच्छित संततीभवपर्यंत, उंबऱ्याआत दबून वावरणाऱ्या स्त्रीपासून सर्व क्षेत्रात समर्थपणे संचार करणाऱ्या स्त्रीपर्यंत अनेक सर्वच क्षेत्रातील बदल या समाजानं मान्य केले आहेत. या बदलांची गती मात्र फार मंद आहे हे कबूल करावं लागेल. पण ही परिवर्तनाच्या वेळची खळबळ, विरोध कोणत्या समाजाला चुकलाय तरी? तेंव्हा गायींच्या बाबतीतला दृष्टिकोनही बदलू शकेल वेळ आली तर.' रस्तोरस्ती घासभर खायला मिळेल या आशेनं हिंडणाऱ्या देवतेकडे पाहून आमच्या विचारसरणीतील विसंगती आमच्या जेव्हा तीव्रतेनं लक्षात येईल तेव्हा खरं. परदेशांमध्ये टेलिव्हिजन, वर्तमानपत्रं, पुस्तकांच्याद्वारे होणारी आमची ही जाहीर मानहानी आम्हाला शेकडो वर्षांपासून जाणवतच नाही की काय? पारतंत्र्याचा केवढा मोठ्या काळाचा शिक्का आपल्यावर पडलेला आहे नाही?

हे आणि असे प्रश्न वारंवार विचारले जात असत. मीही त्या अनुषंगानं शिकत होते. त्यांच्या घरचे रीतिरिवाज समजावून घेत होते. ओळखी वाढत होत्या. चहा-जेवण, चित्रपट वगैरे बघायला जाण्यासाठी निमंत्रणं येत होती. बहुतेक दिवस इतके गडबडीत जायचे की बस्स. तुला वर कुठंशी क्लोदिनची ओळख करून दिली आहे नं? त्यांच्या घरी असताना तिच्या आईच्या कधीचं मनात होतं की मी त्यांच्या रशियन मैत्रिणीकडे ओळख करून घ्यायला जावं म्हणून. एक दिवशी ऑफिस संपल्यावर आम्ही परस्पर त्यांच्याकडे गेलो. आई अगोदरच येऊन थांबल्या होत्या.

फ्रेंच नागरिकत्व असलेलं हे रशियन दांपत्य. श्री. पप्पफ यांचं वय सुमारे ८२ व श्रीमतींचं सुमारे ८०. दोघंही अजून खुटखुटीत, मोठे विद्वान, फ्रेंच, इंग्रजी व

रशियन भाषांच्या शिकवण्या घेतात. अतिशय शांत, प्रसन्न व्यक्तिमत्त्व. मी तर लगेच मिसळून गेले त्यांच्या घरी. म्हटलं, 'तुम्ही फ्रेंच नागरिकत्व का घेतलं ?'

श्रीमती पप्पफनी सांगायला सुरुवात केली. म्हणाल्या, 'आमचं घराणं सरदारी, श्रीमंत. रशियन राज्यक्रांतीनंतर फार हलाखीचे दिवस आले. अनेक कुटुंबीय मारली गेली. यजमान प्रसिद्ध चित्रकार होते. महामुश्किलीनं पॅरिसमध्ये चित्रप्रदर्शन भरवण्याची परवानगी मिळवली. दुर्दैव हात धुऊन पाठीशी. पॅरिसला निघण्याच्या तीन दिवस आधी मोटर अपघातात यजमान वारले. बाईंनी हिंमत धरून ठरल्याप्रमाणे प्रयाणाची संधी साधली. मृत यजमानांच्या काही शिष्यांशी संपर्क साधून प्रदर्शन पार पाडले. पुन्हा रशियात पाऊल न टाकण्याची शपथ घेतली होतीच. सध्याचे श्री. पप्पफ हेही रशियातून सटकून आले होते. त्यांच्याशी परिचय व काही वर्षांनी लग्न झाले. सध्याच्या घरात प्रथम पतीची काही चित्रं मोठ्या अभिमानानं लावलेली आहेत. श्री. पप्पफच आम्हाला दाखवत होते. वाङ्मय वाचनाची दोघांनाही आवड. एवढं मोठं वय असूनही मला त्या दोघांच्यात एक ताजेपणा, हौस, संतुष्टता आढळली बघ.

नाताळच्या सुटीसाठी एका खेड्यात तुला नेण्यापूर्वी आमच्या फ्रान्स मित्र मंडळातर्फे प्रथमच फ्रान्समध्ये एक महिनाभर रहाण्यासाठी १४० भारतीय लोक आल्याचं कदाचित तू वाचलं असशीलच. या सर्वांचं वास्तव्य कसं काय झालं वगैरे कळण्याबद्दल तुला उत्सुकता असेल. त्यांच्यापैकी अनेकांकडून तू ऐकलंही असशील. मी त्यांच्या अगोदर व त्यांच्या नंतर सहा-सहा महिने तेथे होते. त्यामुळे त्यांच्या स्वागताच्या तयारीत. तसंच ते भारतात परतल्यावर फ्रेंच लोकांच्याबरोबर गावोगाव झालेल्या संभाषणांमुळे काही माहिती झाली. भारतात किंबहुना आपल्या गावात जी माणसं आपण नेहमी पाहतो ती थोडीफार वेगळी असू शकतात हे लक्षात आलं. सर्वसाधारण हा मुक्काम बरा झाला असा सूर होता. आर्टिस्ट ग्रुपच्या निरनिराळ्या गावांमधील कार्यक्रमांनी फार चांगलं वातावरण तयार झालं होतं हं. बऱ्यावाईट अनुभवांना सामोरं जात का होईना ह्या अशा प्रकारच्या योजना चालू असायला हव्यातसं वाटतं. तू प्रत्यक्ष भेटशील तेव्हा आणखीन गंमती सांगेन या प्रवासाबद्दल.

( क्रमशः )



मोहोल्लेवाल्यांनी गणूतात्यांची एकसष्टी करायचे ठरविले. गणूतात्या महान राष्ट्रनिर्माता म्हणजेच शिक्षक होते व आता सेवानिवृत्त झाल्यावरही मोहल्यातल्या राष्ट्राच्या भावी पिढीला (आज शेंबड्या) फुकट शिकवत होते. या व्यतिरिक्त जोडपी सिनेमाला गेलेली असताना त्यांची मुलं सांभाळणे, भाजी, दळण आणणे, रेशनकार्ड नवीन करून देणे, रंगरंगोटी करणे, रद्दी विकणे वगैरेसारखी किरकोळ व सन्माननीय कामं मोहोल्लेवाले गणूतात्याकरता अगत्यानं राखून ठेवीत. ही असली कामं करण्याकरता गणूतात्याजवळ एक मोठी कॉलिफिकेशन होती, ती म्हणजे त्यांना स्वतःचं कुटुंब नव्हतं व त्यांना पेन्शन मिळत नव्हती.

एकसष्टीचा बूट काढला गोरे वकिलांनी. दोन खुन्यांना फासावरून अलगद उचलून समाजात मोकाट सोडल्यापासून त्यांची वकीली धडाकून चालत होती. सगळे पैसेवाले निवडणूकीला उभं राहण्याचा विचार करतातच त्याचप्रमाणे गोरे वकील ही करीत होते. म्हणून ते म्हणाले,

" गणूतात्या महान समाजसेवक आहेत. ते आमच्या मोहोल्याचे गुरुदेव आहेत. त्यांची एकसष्टी साजरी करू. मंत्र्यांना बोलावू..."

देशपांडे वर्गणी गोळा करणारा स्पेशलिस्ट. या चान्सचा वास आला रे आला की देशपांडेची नैतिक भूक जागृत होते.

त्यानं उत्साहानं दुजोरा दिला.

लीला श्रीवास्तव

समाजसेवा करायची लताबाईंना विलक्षण तळमळ होती. समाजसेविका म्हणून फेमिनामध्ये फोटो छापवून दाखवीन अशी त्यांनी मनोमन प्रतिज्ञा केलेली होती. तेव्हा त्याही पुढं सरसावल्या.

देशपांडे वर्गणी गोळा करू लागला व बाजारात सूटाकरता टेरेलिनचे नवे कापड शोधू लागला. मोहोल्यांतल्या मोघे मास्तरांनी वर्गणीदाखल फक्त एकच रुपया देऊ केला तेव्हा देशपांडेला राष्ट्रीय राग आला.

" आपल्या देशातल्या लोकांना हेच नाही. सगळीकडे भिक्कारपणा. म्हणूनच तर आपल्या देशाचे हे होत नाही. "

लताबाईंना सोबत घेऊन गोरे वकील मंत्र्याकडे गेले. मंत्री म्हणाले, नारळाचं झाड गच्चीवर लावता येईल का या विषयाची माहिती काढण्याकरता मी विदेशाचा दौरा काढलेला आहे महिन्या.भराचा तेव्हा वेळ नाही.

" पाहिलंत ?" लताबाई म्हणाल्या, " तरी मी म्हणत होते की रामू गजरा आणायला गेलाय. तो माळून मग चलते. तर तुम्ही घाई केलीत. तेव्हढी एक उणीव राहिली म्हणून काम झालं नाही. "

" अहो, दुसऱ्या मंत्र्याकडे जाऊ, मंत्रिमंडळात पन्नास मंत्री आहेत. "

या मंत्र्यानी आनंदानं स्वीकृती दिली. ते नम्रपणं म्हणालं, " आम्ही जनसेवक. नाही कसं म्हणणार ? "

# गणूतात्यांची एकसष्टी

गेल्या पंधरवडचात मंत्रीमहोदयांना एकाही सभासमारंभाचं बोलावणं आलेलं नव्हतं त्यामुळे ते फार उदास होते.

सारं निश्चित झाल्यावर मंडळींनी गणूतात्याकडे मोर्चा वळविला.

गणूतात्या आपल्या विरलेल्या पंचाला गाठी मारीत बसलेले होते. या मंडळीना पाहून ते घाबरले. कुणाचं काही काम राहिलं असल्याचं त्यांना आठवेना. फक्त लताबाईच्या साड्या तेवढ्या ड्रायक्लिनकडून आणायच्या राहिलेल्या होत्या.

गणूतात्या, "आम्ही तुमची एकसष्टी साजरी करणार आहोत." गणूतात्या आणखी घाबरले.

" नको नको, आता माझ्यानं जास्त काम होत नाही. शिवाय तुमची मुलंही आता मला दवत नाहीत. "

गोरे वकील सात्विक संतापले.

“आम्ही विजयी झालो.
आता साऱ्या जगाचा थरकाप उडू दे”

स्वातंत्र्यदिनाच्या आपल्या पहिल्याच भाषणात
विजयोन्मादाने माओ-त्से-तुंग असे म्हणत होता.

आणि खरोखरच सारे जग हादरून गेले.
शतकानुशतकांच्या सुस्तपणानंतर
अत्यंत कर्मठ अशा कम्युनिस्ट चाबकाच्या
फटकाऱ्यामुळे अक्राळ–विक्राळ शक्तीचा चीन
खडबडून जागा झाला.

या चिनी
कम्युनिस्ट क्रांतीची कथा

# आणि ड्रॅगन जागा झाला

अरूण साधू

राजहंस प्रकाशन : पुणे
मूल्य : चौदा रुपये

" नको कसं ? मंत्री, फोटोग्राफर, वर्तमानपत्रवाले, ब्लॉकवाले साऱ्यांना पक्क करून आलोय. आमची ही तयारी खड्डयात जाणार की काय ? मोहोल्याचं अन्न खात आहात अन वर एवढा कृतघ्नपणा ?"

" चुकलो. " गणूतात्यांनी हात जोडले.

व्यासपीठ सजवण्याचं काम मोहोल्यांतल्या तरुण पोरापोरींनी शिरावर घेतलं. मन्या-बनी, शीला-बबन, सुधा-बंड्या अशा जोड्या जोड्या झाल्या अन् सारे झटून कामाला लागले. वेळ साडेपाच वाजताची होती.

चार वाजल्यापासून मोहोल्यातल्या बायकांनी नाटाथटायला सुरुवात केली. डॉक्टरीणबाईंनी नथीपासून सर्व दागिने घातले. लताबाईंनी नव्या साडीची घडी मोडली व स्पेशल आर्डर देऊन मागविलेला गजरा माळला, गोरे वकीलांनी खास बनवलेला खादीचा ड्रेस व देशपांडेनं नवा टेरेलिनचा सूट घातला.

मंत्री आपल्या लांबोडक्या चकचकीत मोटारीतून उतरताच पाच सुहासिनींनी त्यांची आरती केली. गोरे वकील त्यांना व्यासपीठावर घेऊन आले. आपल्या पांढऱ्या टोपीचा कोन ठीक करीत मंत्री-महोदयांनी इकडे तिकडे पाहिलं. फोटोग्राफर दिसताच त्यांना हायसं वाटलं.

बबन गोरे वकिलांच्या कानाला लागला, " अहो पण गणूतात्या कुठायत ?"

" हात्तिच्या, आणा त्या मास्तरड्याला शोधून. "

व्यासपीठावर बसलेल्या लताबाईंनी ते ऐकलं होतं. त्या हळूच म्हणाल्या, " मी त्यांना दळण आणायला पाठवलं होतं. बबन, जा चक्कीवरून घेऊन ये त्यांना. म्हणावं, आजच्या दिवस राहू दे दळण. "

थोड्या वेळानं बबन गणूतात्यांचं काखोटं पकडून घेऊन आला.

" आता मला काय माहीत की आजच... "

गणूतात्या चाचरत स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करू लागले.

हार आले. माननीय मंत्र्यांना व गोरे वकिलांना हार घालण्यात आला. कॅमेरे क्लीक झाले.

लताबाई मनात चडफडल्या, " मेल्यांनो, मला हार नाही घातलात का ? पाहून घेईन. "

मंत्र्यांना एकदम आठवण आली.

" एकसष्टी की कायसं म्हणाला होता ना तुम्ही ? कुणाची ?"

गोरे वकिलांनी खाली मान घालून बसलेल्या गणूतात्यांकडे बोट दाखविले.

मंत्र्यांनी तत्परतेनं आपल्या गळ्यातला हार काढला व तो गणूतात्यांच्या गळ्यात घातला. टाळ्यांचा कडकडाट व मंत्र्यांच्या नावे जयनाद झाला.

गळा खाकरून गोरे वकील बोलायला उठले, " परम आदरणीय मंत्रीजी व उपस्थित जनहो, आजचा दिवस अत्यंत भाग्याचा आहे, कारण एका श्रेष्ठ पुरुषाचे

पाय आपल्या मोहोल्ल्याच्या धरतीला लागले आहेत. मंत्र्याच्या महानतेची थोरवी काय वर्णावी ? इंदिरा गांधींची त्यांच्यावर खास मर्जी आहे. पुढच्या निवडणुकीला उभं राहून जनसेवा करावी, अशी माझी इच्छा आहे. याची मंत्रीजींनी आवश्य नोंद घ्यावी व माझी ही तुच्छ इच्छा इंदिराजींपर्यंत नेऊन पोचवावी. आपण सर्व मला पाठिंबा द्याल अशी खात्री आहे. कारण मोहोल्ल्यात दोन सार्वजनिक नळ बसविण्याचे व आजचा एकसष्टी समारंभ घडवून आणण्याचे श्रेय मलाच आहे."

त्यानंतर लताबाईंनी सुश्राव्य भाषण दिले. हे भाषण आरशात बघून त्या सतत सात दिवस पाठ करीत होत्या. त्यांनी स्वतःच्या समाजसेवेचा आवर्जून उल्लेख केला व आपण किती महान समाजसेविका आहोत हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. लताबाईंचे भाषण ऐकून कुणालाही वाटलं असतं, एवढ्या श्रेष्ठ समाजसेविकेला कमीत कमी पद्मश्री तरी मिळायलाच हवी.

"मी काही बोलू का ?" गणूतात्यांनी गोरे वकिलांच्या कानात विचारलं.

"बसा चूप." गोरे वकील डाफरले.

"तुमचे सर्वांचे आभार मानतो."

"गणूतात्या, माझं नाव नक्की आलं पाहिजे हं त्यात. बोलू द्या हो त्यांना." लताबाई म्हणाल्या.

त्यानंतर स्वल्पाहाराचा कार्यक्रम झाला. माननीय मंत्र्यांकरता सर्वोदयी आहाराचा खास प्रबंध होता. साडेसहाला चक्की बंद होऊन जाईल, या भीतीनं गणूतात्या केव्हाच सटकले होते.

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांत फोटो छापून आला. त्यात मंत्री, गोरे वकील व लताबाई त्यांत गजऱ्यासह प्रामुख्यानं दिसत होत्या. एकसष्टी समारंभ कसा धडाक्यात त्यात झाला त्याचा व समारंभात झालेल्या भाषणांचा समग्र रिपोर्ट होता. मोहोल्ल्यातल्या लोकांनी ह्या समारंभाकरता किती कष्ट घेतले, त्याचंही वर्णन होतं. फक्त गणूतात्याचा तेवढा उल्लेख नव्हता !



अनंत भावे

# पुस्तके

## ' मॉर्निंग फेस '

या वेळचे साहित्य अकादमीचे एक पारितोषिक श्री. मुल्क राज आनंद यांच्या ' मॉर्निंग फेस ' या कादंबरीला मिळाले आहे. इंग्रजीमध्ये लिहिणारे जे मोजके भारतीय लेखक आहेत त्यापैकी मुल्क राज आनंद हे एक. म्हणून त्यांचे साहित्य भारतापलीकडे देखील पोचू शकले आहे. भारतीय लेखकांच्या इंग्रजी भाषेबद्दल बरीच उलटसुलट मते ऐकू येतात. खरे सांगायचे तर माझ्यासारख्या मराठमोळ्या वाचकाला इंग्रजी-इंग्रजीतील फरक सहजी समजत नाहीत; म्हणून इंग्रजीत लिहिलेल्या प्रस्तुत कादंबरीचे भाषिक विश्लेषण मी करत नाही.

श्री. मुल्क राज आनंद यांनी आत्मचरित्रात्मक सात कादंबऱ्यांच्या मालिकेचा संकल्प सोडला आहे. त्यातील पहिली, काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली ' सेव्हन समर्स ' ही कादंबरी उपोद्घातात्मक होती. ' मॉर्निंग फेस ' ही या मालिकेतील दुसरी कादंबरी होय. या कादंबरीमालिकेचा नायक आहे कृष्णचंद्र. कृष्णचंद्राचे बालपण आणि यौवनारंभ या टप्प्यांचे चित्रण ' मॉर्निंग फेस ' या कादंबरीत

**साहित्य अकादमीचे या वेळचे पारितोषिक लाभलेली**
**मुल्क राज आनंद यांची कादंबरी**

लेखकाने घडवले आहे. या दोन टप्प्यांनी व्यापलेला कालखंड मर्यादित असला तरी कृष्णचंद्राच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीच्या दृष्टीने त्याचे असलेले महत्त्व ओळखून लेखकाने ही ५७१ पृष्ठांची बृहत्कादंबरी सिद्ध केली आहे.

' सिटी ऑफ ड्रेडफुल नाइटस, ' ' द प्रिझन ' आणि ' द रेजिमेंट ' असे कादंबरीचे तीन विभाग लेखकाने केले आहेत. पहिल्या विभागात, कृष्णचंद्राच्या बालपणीचे अमृतसर शहर, त्याचे कर्मठ एकत्र कुटुंब, त्यातील व्यक्तींचे परस्परसंबंध, सुधारक शेजारी, पंडित वैजनाथ हायस्कूल आणि तेथील शिक्षक व विद्यार्थीमित्र यांचे चित्रण केले आहे. कृष्णचंद्राचा वडील भाऊ लुधियाना येथे तुरुंगाधिकारी असतो. पुढील शिक्षणाच्या निमित्ताने वडील भावाकडे काढलेल्या दिवसांचे चित्रण दुसऱ्या

### श्री. मुल्क राज आनंद यांचे इतर प्रकाशित साहित्य

१. अनटचेबल
२. कूली
३. टू लीव्हज अँड अ बड
४. द व्हिलज
५. अॅक्रॉस द ब्लॅक वॉटर्स
६. द सोर्ड अँड द सिकल.
७. द बार्बर्स ट्रेड युनियन अँड अदर स्टोरीज.
८. द बिग हार्ट
९. द ट्रॅक्टर अँड द कोम गॉडेस अँड अदर स्टोरीज.
१०. सेव्हन समर्स
११. प्रायव्हेट लाईफ ऑफ अॅन इंडियन प्रिन्स.
१२. रिफ्लेक्शन्स ऑन द गोल्डन बेड अँड अदर स्टोरीज.
१३. द ओल्ड वुमन अँड द काऊ.
१४. द पॉवर ऑफ डार्कनेस अँड अदर स्टोरीज
१५. द रोड.
१६. डेथ ऑफ अ हिरो
१७. लॅमेंट ऑन द डेथ ऑफ अ मास्टर ऑफ आर्टस.
१८. लाजवंती अँड अदर स्टोरीज.

भागात केले आहे. 'द रेजिमेंट' या तिसऱ्या भागात, वडिलांच्या नोकरीमुळे, पलटणीच्या क्वार्टर्समध्ये काढलेल्या वर्षांचे चित्रण येते. या वर्षात क्रांतिकारी चळवळीच्या ओढीने घरापासून, आणि विशेषत: वडिलांपासून, दुरावलेल्या कृष्णचंद्राचे वेधक दर्शन घडते.

जीवनाच्या तीनही टप्प्यांत दोन प्रकारच्या व्यक्तींनी कृष्णचंद्राच्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला आहे. सुधारक शेजारी देव दत्त, वडील भाऊ हरीश, क्रांतिनिष्ठ डॉ. चुनीलाल आणि केदारनाथ या पुरुषांच्या सहवासात कृष्णचंद्राची वैचारिक भूमिका निश्चित होत गेली; उलट त्या त्या टप्प्यात लाभलेल्या देवकी, मुमताझ, शकुंतला या स्त्रियांच्या स्नेहामुळे त्याचे भावजीवन सखोल झाले. या दोन प्रकारच्या व्यक्तींच्या सान्निध्यात हळू हळू विकास पावणाऱ्या कृष्णचंद्राच्या जीवनपटाचे, त्याच्या मनात खोलवर अंकुरित होऊन यथाकाल प्रस्फुट होणाऱ्या स्वत्वाच्या जाणीवेचे मोठे प्रत्ययकारी दर्शन मुल्क राज आनंद यांनी घडवले आहे, कृष्णचंद्राच्या स्वत्वाच्या जाणीवेचे एक हृद्य रूप म्हणजे त्याच्या अंगी असलेल्या कवित्वशक्तीचा झालेला साक्षात्कार, कृष्णचंद्राच्या व्यक्तिमत्त्वाला दिलेले हे कवित्वशक्तीचे परिणाम, मुल्क राज आनंदांच्या कलाचातुरीचे द्योतक आहे.

या प्रदीर्घ कादंबरीत अनेकानेक व्यक्ती आहेत; परंतु रखेली मुमताझ आणि एकदोन शिक्षक यांचे सांकेतिक चित्रण सोडता बाकीच्या व्यक्तींचे चित्रण मोठे स्वाभाविक उतरले आहे. या व्यक्ती आपले स्वत्व जपणाऱ्या असल्यामुळे त्यांच्या परस्परसंबंधातून अपरिहार्यपणे नाट्य निर्माण झाले आहे. त्यामुळे सनसनाटी कथानक नसूनही कादंबरी वेधक झाली आहे.

बहुतेक आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यात तपशीलाचा भाग अतिशय असतो. ' मॉर्निंग फेस ' ही कादंबरी त्याला अपवाद नाही. चित्रणीय वास्तव नायक-लेखक अतीजवळून न्याहाळत असतात, त्यात घडतविघडत असतात; त्यामुळे वेचक तपशील निवडण्याचे तटस्थ भान हरपते. त्यात पुन्हा ' मॉर्निंग फेस ' ही एका महत्त्वाकांक्षी विस्तृत आत्मचरित्रात्मक कादंबरीमालिकेतील केवळ एक कादंबरी आहे. त्यावरून मुल्क राज आनंदांच्या संकल्पित योजनेचे अफाटपण ध्यानात यायला हरकत नाही. साहित्य अकादमीच्या पारितोषिकामुळे लेखकाचा उत्साह वाढेल असे वाटते. पारितोषिकाच्या जोडीला असंख्य भारतीय चाहत्यांच्या शुभेच्छा आहेतच. ◻

**मॉर्निंग फेस :** मुल्क राज आनंद, कुतुब पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठे ५७१; किंमत रु. ३७–५०.

---

**अय्यय्यो ! मद्रास्स....** पृष्ठ १७ वरून

सुधारणा करून, अधिक नफा मिळवावा हा विचार मात्र त्यांच्या मनात आला नाही ! सरकार एकीकडे टूरिझम खात्यावर दरसाल कोटीकोटी रुपये उधळते, पण त्याचवेळी प्रवाशांना नेमके काय हवे ते पाहिलं जात नाही. उटीला बसस्टॅण्डच बांधलेला नाही. मधल्या सर्व दहा स्टेशनांवर, कूनूर वगळता, कपभर चहा मिळत नाही ना सकाळचा पेपर ! तेथे स्टॉल्स बांधून लिलांव केले तर ? उटीला दोन गाड्यांना एकच फलाट आहे. रूळ ओलांडून दुसऱ्या गाडीत जावे लागते.

कुणीतरी खाजगी कंपनी, कलकत्त्याचे मार्टिन-बर्नप्रमाणे, ही रेल्वे चालविण्यास तयार आहे असेही ऐकले होते. रेल्वेला तो स्वत:चा अपमान वाटत असावा जणू ! १६ एप्रिलला तमीळनाडू सरकारचे पर्यटन खात्यातर्फे कूनूर येथे प्रवाशांसाठी कॉटेजेस बांधल्या. त्यांचे उदघाटनाचे वेळी पर्यटन मंत्री राजाराम यांनीही रेल्वे बंद करू नका हे पुन्हा पुन्हा सांगितले. तमीळनाडूचे आमदार दिल्लीला पार्लमेंटमध्ये रेल्वेवर दबाव आणणार आहेत आता. उटीला सरकारी टूरिस्ट बंगला सुरेख आहे.

ते काहीही असो, आज ना उद्या रेल्वे खाते हा मार्ग मोडीत काढणारच आहे. तोवरच उन्हाळा असो वा पावसाळा असो उटीला जरूर जाऊन या ! मनात विचार आला, उशीर कशाला ? चला उटीला !

◻ ◻ ◻

मध्यरात्रीची वेळ होती. भूमध्य महासागरात आफ्रिकेतील अल्जेरियाच्या किनाऱ्याजवळ एक पाणबुडी सागरपृष्ठावर आली. तिच्या डेकवरून धडीच्या छोटया रबरी होडया खवळलेल्या पाण्यात सोडण्यात आल्या. लेफ्टनंट जनरल मार्क वेन क्लार्क मध्यरात्रीच्या अंधारात डोळे विस्फारून पाहात होता. थोडयाच अंतरावर शत्रुव्याप्त प्रदेशाची किनारपट्टी होती.

किनाऱ्यापासून जवळच पुष्कळ झाडेझुडुपे वाढली होती. त्यातच एक उभा कडा होता. कडयाच्या टोकावर, सागराकडे तोंड करून एक घर उभे होते. क्लार्क आणि त्याच्या सहकाऱ्यांना याच घरी जायचे होते. प्रचंड लाटा ठराविक लयीत वाळूवर धडकत होत्या.


जनरल क्लार्कने दुर्बिणीने त्या घराचा वेध घेतला. घराच्या एका खिडकीत दिवा जळत होता. याच इशारतीची, जर्मन आणि इटालियनांचे स्वामित्व असलेल्या पाण्यात दडलेल्या पाणबुडीत बसून क्लार्क आणि त्याचे सहकारी गेले छत्तीस तास अधिरतेने वाट पाहात होते. पुन्हा एकदा क्लार्कने किनाऱ्यावर धडकणाऱ्या लाटांकडे नजर टाकली. मूठभर जवळजवळ निःशस्त्र अधिकाऱ्यांनी सहज उतरावे अशी निर्धोक जागा दिसत नव्हती ती. शिवाय अंड्याच्या टरफलाइतक्या हलक्या होडयांतून प्रत्यक्ष किनाऱ्यावर पोहोचणे हीदेखील सोपी गोष्ट नव्हती.

परंतु जनरल क्लार्कने या खाजगी मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी सरसेनापती आयसेनहॉवरजवळ हट्टच धरला होता. ही खाजगी मोहीम यशस्वी होताच जर्मन–

---

दुसऱ्या महायुद्धात सामान्य सैनिकानें असामान्य पराक्रम गाजवला. पण या युद्धाची व्याप्ती इतकी मोठी होती, की मोठमोठ्या सेनाधिकाऱ्यांना देखील, जिवावर उदार होऊन, अवघड लष्करी वा राजनैतिक मोहिमा पार पाडाव्या लागल्या. जनरल मार्क क्लार्कची मोहीम ही त्यातलीच एक. या साहसी मोहिमेची मूळ कथा श्री. पॉल सार्जंट हाईन्स यांनी सांगितली आहे.

---



# जनरल क्लार्कची खाजगी मोहीम

## अनंत भावे

इटालियनांच्या हातून फ्रेंच उत्तर आफ्रिका हिरावून घेण्यासाठी नौदल, हवाईदल आणि पायदळ यांची एक प्रचंड संयुक्त मोहीम आखण्यात येणार होती.

'ठीक आहे' क्लार्क म्हणाला, 'आपण निघू या आता.'

तो आणि त्याचे सहकारी खवळलेल्या पाण्यात थयथयणाऱ्या होड्यात सावधपणे उतरले. होड्या ताबडतोब अल्जेरियाच्या किनाऱ्याकडे निघाल्या. त्यांच्यामागे पाणबुडी सेराफने पाण्यात दडी मारली. आकाश ढगांनी झाकोळले होते. चंद्र दिसत नव्हता. त्यामुळे अंधार अधिकच गडद भासत होता. समोर त्या घराच्या खिडकीतील दिव्यावर साऱ्यांचे डोळे खिळले होते.

वल्ही पाण्याचा आवाज न करता मारण्याची त्यांची शिकस्त चालली होती. आवाजाचा कानोसा कान सतत घेत होते. डोळे समोरील काळाकुट्ट अंधार भेदण्याचा प्रयत्न करत होते. उंच लाटांवर त्या हलक्या होड्या बुचांसारख्या तरंगत होत्या.

'समजा' कोणीतरी क्लार्कच्या कानाशी कुजबुजले, 'समजा, तो दिवा म्हणजे एखादा सापळा असला तर?'

'समजा, तो सापळा असला तरी त्याच्या बाबतीत आता आपण काहीही करू शकत नाही.' क्लार्कने स्पष्ट शब्दात वस्तुस्थिती सांगितली. किनाऱ्यावर त्यांची कोणाशी गाठ पडेल हे निश्चितपणे सांगणे अवघड होते. किनाऱ्यावर दैववशात शत्रूच्या हाती सापडलो आणि आपले नाव, हुद्दा उघडकीला आला तर त्याचे कोणते परिणाम होतील, यावर क्लार्कने पुन: पुन्हा डोके शिणवले होते. क्लार्क आणि त्याचे सहकारी यांची भूमिका जर्मन आणि इटालियनांच्या दृष्टीने हेरांचीच होती.

कोणीतरी क्लार्कच्या हाताला स्पर्श केला. क्लार्कने वर पाहिले. डोळ्यांवर असलेल्या खास चष्म्यामुळे क्लार्कला किनाऱ्यावरून दिली जाणारी अदृश्य दिव्याची इशारत दिसू शकली. या इशारतीमुळे होड्या सुरक्षितपणे किनाऱ्याजवळ पोहोचल्या आहेत हे क्लार्कला समजले. काही क्षणातच क्लार्कची होडी ओल्या वाळूवर येऊन थांबली. डोळ्यांना आता अंधाराचा सराव झाला होता. तरीही काहीच दृष्टीला पडत नव्हते. त्याचे मोजके सहकारी त्याच्याभोवती जमा झाले.

क्लार्कने रिव्हॉल्व्हर हातात घेतले आणि त्यानेच किनाऱ्यावरील झाडीची दिशा दाखवत सहकाऱ्यांना म्हटले, 'एकेक, दोन-दोन करून या झाडीत जा. बरोबर या होड्यादेखील घ्या. लौकरात लौकर आपण आडोसा घेणं बरं.

क्लार्कचे सहकारी पांगले. त्यांच्या पावलांचा वाळूवर होणारा आवाज क्लार्कला ऐकू येत होता. पाठोपाठ तोदेखील त्याच दिशेने वळला. कदाचित शंभर डोळ्यांच्या जोड्या आपल्या या सावध हालचाली निरखत असतील; कदाचित शंभर बंदुकांच्या नळ्या आपल्यावर रोखलेल्या असतील, असे त्याला सतत वाटत होते.

काही पावले चालताच कड्याच्या छायेत उभ्या असलेल्या माणसांचा एक लहानसा गट क्लार्कच्या दृष्टीला पडला. आपल्या सहकाऱ्यांना ही बातमी सांगण्याची संधीही त्याला मिळाली नाही. रिव्हॉल्व्हर हातात घट्ट धरून तो सावधगिरीने पुढे सरकला; आणि नंतर अंधारातून एक हार्दिक अमेरिकन आवाज क्लार्कच्या कानांवर पडला : 'उत्तर आफ्रिकेत तुमचे स्वागत असो !'

क्लार्क पुढे धावला. अल्जेरियाच्या किनाऱ्यावर येऊन पोहोचण्याचा पहिला भाग यशस्वीरीत्या पार पडला, हे क्लार्कला उमगले. परंतु मोहिमेचा हा सर्वांत सोपा भाग होता, याचीही जाणीव त्याला होती. खरी कसोटी तर पुढेच होती. आता कोठे मोहिमेला नुसती सुरुवात झाली होती.

अवघ्या सहा दिवसांपूर्वी, मोठ्या नाट्यमय रीतीने फ्रेंच उत्तर आफ्रिकेवरील मार्क क्लार्कच्या या 'खाजगी' मोहिमेला सुरुवात झाली होती; आणि ही नाट्यमयता मोहीम संपेपर्यंत कमी होणार नव्हती. दुसऱ्या महायुद्धातील कमाल चित्तथरारक मोहिमांमध्ये मार्क क्लार्कच्या या खाजगी मोहिमेचा अंतर्भाव केला जातो तो उगाच नव्हे.

## मर्फीची कामगिरी

१७ ऑक्टोबर १९४२ रोजी मार्क क्लार्क लंडनमध्ये होता. 'टॉर्च' या सांकेतिक नावाने ओळखल्या जाणाऱ्या, उत्तर आफ्रिकेवरील मोहिमेचे नेतृत्व करण्याची जबाबदारी जनरल आयसेनहॉवरने त्याच्यावर सोपविली होती. या मोहिमेची सिद्धता दीर्घकाळ चालली होती. ठरल्यापेक्षा मोहिमेला उशीरही झाला होता. या मोहिमेमध्ये प्रथमच अमेरिकन फौजा पॅसिफिकहून वेगळ्या रंगमंचावर प्रवेश करणार होत्या.

पर्ल हार्बरवरील जपानी हल्ल्याला वर्ष लोटून गेले होते. पश्चिम युरोपमध्ये हिटलरने केलेल्या भीषण आक्रमणाला दोन वर्षे होऊन गेली होती.

मार्शल हेन्री फिलिफ पेटेन हा फ्रेंचांचा पहिल्या महायुद्धातील मानबिंदू होता. दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या आक्रमणापुढे फ्रान्स कोलमडल्यावर याच मार्शल पेटेनने हिटलरशी तह केला होता. या तहाप्रमाणे फक्त उत्तर फ्रान्स हिटलरने व्यापला होता. दक्षिण फ्रान्स आणि उत्तर व पश्चिम आफ्रिकेतील फ्रेंच वसाहती पेटेनच्या आधिपत्याखाली होत्या. व्हिशी येथे पेटेनची राजधानी होती. आफ्रिकेतील फ्रेंच वसाहतींच्या पूर्वेला, लिबियामध्ये, ब्रिटिश सेना जनरल अर्विन रोमेलच्या आफ्रिका कोअरबरोबर झुंज देत होत्या. या झुंजीत जयापजयाचे पारडे सारखे वर-खाली होत होते. फ्रेंच उत्तर आफ्रिकेमधून अमेरिकन फौजांनी रोमेलच्या पिछाडी-वर हल्ला चढविला तर ब्रिटिश आणि अमेरिकन फौजांच्या संयुक्त माऱ्यापुढे वाळवंटातील जर्मन फौजा गुडघे टेकतील असे दोस्तांच्या लष्करी तज्ज्ञांचे मत होते.

परंतु या कल्पनेत एक अडचण होती. जर्मनी, इटली आणि जपान यांच्या विरुद्ध अमेरिकेने जसे युद्ध पुकारले होते तसे व्हिशी फ्रान्सविरुद्ध पुकारले नव्हते. राज-नैतिक कारणांसाठी, हिटलरच्या जित साम्राज्याचा भाग असलेल्या या प्रदेशात दोस्तांना आपले प्रतिनिधी राखायचे होते.

मात्र काही महिन्यांपूर्वी, व्हिशीमधील अमेरिकन दूतावासात सल्लागाराचे काम करणाऱ्या रॉबर्ट डॅनिएल मर्फी याला अल्जियर्स येथे विशेष कामासाठी पाठविण्यात आले होते. त्याच्या कामाचे स्वरूप पेटेन वा हिटलरला अज्ञात होते. फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांशी संपर्क साधून पक्षबदलासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न मर्फी करणार होता.

मर्फीची कामगिरी नाजुक होती. स्वातंत्र्येच्छेने प्रेरित होऊन पक्षबदल करायचा म्हणजे लष्कराच्या परंपरागत आज्ञाधारकपणाला बाध येणार होता. लष्करी न्यायाप्रमाणे हा देशद्रोहच ठरला असता. अधिकारारूढ सरकारला आंधळेपणाने आपली निष्ठा वाहण्याची सेनेची सवय मर्फीला दूर करायची होती. त्यासाठी मर्फीने फ्रेंच आफ्रिकेत सर्वत्र गुप्तहेरांचे जाळे पसरले, आणि दोस्तांचे हस्तक म्हणून ज्यांचा उपयोग करून घेता येण्यासारखा आहे. अशा वरिष्ठ फ्रेंच सेनाधिकाऱ्यांशी संपर्क साधला.

१९४२ च्या ऑक्टोबरमध्ये मर्फीची सारी तयारी पूर्ण झाली. अल्जेरियाचा सेनाप्रमुख जनरल चार्ल्स मास्टसारखा मासा मर्फीच्या गळयाला लागला होता. त्याच्याकरवी जनरल जिरॉद आणि जनरल ज्युइन यांचेही मन त्याने वळवले होते. अमेरिकन आक्रमक फौजा फ्रेंच आफ्रिकेमध्ये उतरल्यानंतर आपल्या फौजांना शस्त्रत्यागाचा हुकूम द्यायला ते आता तयार झाले होते. या गुप्तयोजनेमुळे रक्ताचा एक बिंदूही न सांडता अमेरिकन फौजा आफ्रिकेत उतरू शकणार होत्या.

परंतु या फ्रेंच सेनाधिकाऱ्यांना साहजिकच अमेरिकन फौजांकडून काही आश्वासन पाहिजे होते. अल्जियर्समधील आपल्या कार्यालयात बसून मर्फीने एक संदेश खरडला आणि गुप्त मार्गाने तो वॉशिंग्टनला धाडला.

१७ ऑक्टोबरला रविवार होता. मार्क क्लार्क सकाळी दहा वाजता लंडनमधील आपल्या मुख्य कार्यालयात आला. आयसेनहॉवरच्या कार्यालयापासून क्लार्कचे कार्यालय दोन मैलांवर होते. मर्फीने वॉशिंग्टनला पाठविलेला संदेश वॉशिंग्टनहून एकाच वेळी या दोन कार्यालयात दाखल झाला होता.

क्लार्कने संदेश घेतला आणि बारकाईने वाचला. स्वतः राष्ट्राध्यक्ष रूझवेल्टनी वॉशिंग्टनहून तो या कार्यालयात प्रक्षेपित करण्याचा हुकूम दिला होता. जनरल जॉर्ज मार्शल याने त्याच्यावर सही केली होती. मात्र संदेशातील मर्फीचे शब्द जसेच्या तसे ठेवलेले होते. त्यात उत्तर आफ्रिकेतील एका सांकेतिक स्थळी एका वरिष्ठ सेनाधिकाऱ्याला पाठविण्याची विनंती केली होती. या अधिकाऱ्याने त्या स्थळी एका वरिष्ठ फ्रेंच सेनाधिकाऱ्याशी चर्चा करावी, माहितीची देवाणघेवाण करावी असे संदेशात सुचविले होते.

क्लार्कने ताबडतोब दूरध्वनीवरून आयसेनहॉवरशी बोलणे केले.

'होय' आइक म्हणाला, 'आत्ताच पाहिला मी तो संदेश.'

'या मोहिमेवर मला जाऊ दे ना' क्लार्कने विनंती केली.

'ते पाहू आपण. तू इकडेच ये म्हणजे आपल्याला बोलता येईल त्याबद्दल' आइकने उत्तर दिले.

आठवड्याच्या अखेरीला वरिष्ठ अमेरिकन अधिकाऱ्यांचा चेकर्स या विन्स्टन चर्चिल यांच्या अधिकृत निवासस्थानी जाण्याचा परिपाठ होता. यावेळी जेवणाखाण्याबरोबरच ब्रिटिश पंतप्रधान आणि त्यांचे सहकारी यांच्याबरोबर युद्धविषयक अनेक प्रश्नांची मनमोकळी चर्चा त्यांना करता येई. आज मात्र त्यांना हा परिपाठ पाळता येणार नव्हता. म्हणून आइकच्या कार्यालयातून क्लार्कने दूरध्वनीवरून चेकर्सशी संपर्क साधला. चेकर्स येथे मेजर जनरल सर हेस्टिंग्स इस्मे यांनी दूरध्वनीग्राहक उचलला. क्लार्क म्हणाला, 'वॉशिंग्टनकडून आम्हाला एक अत्यंत महत्त्वाचा संदेश आला आहे. त्याची चर्चा अशी दूरध्वनीवरून नाही करता येणार; आणि तिकडे यायला सवड नाही आम्हाला. मला वाटतं पंतप्रधानांना हे कळलं तर बरं होईल.'

पंतप्रधान चर्चिलना खळबळ अत्यंत प्रिय होती. त्वरित कृती करण्याचा त्यांचा स्वभाव होता. या संदेशाची वार्ता कळताच दूरध्वनीवरून त्यांनी आइकशी बोलणे केले. त्या बोलण्यात, शहरातील पंतप्रधानांच्या निवासस्थानी भोजनोत्तर आइकनी त्यांना भेटावे, असे ठरले.

आइक आणि क्लार्क ताबडतोब कामाला लागले. तत्पूर्वी, अल्जियर्स येथे वरिष्ठ फ्रेंच अधिकाऱ्याला सांकेतिक स्थळी भेटायला आपल्याला पाठवावे या विनंतीला क्लार्कने आइकची संमती मिळवली होती. घाईघाईने योजक अधिकाऱ्यांची बैठक भरवण्यात आली. फ्रेंच प्रदेशाच्या भल्यामोठ्या नकाशावरून मर्फीच्या संदेशातील तपशीलांची काळजीपूर्वक छाननी करण्यात आली.

मर्फीने किनाऱ्यालगतच्या कड्यावरील एका घरात फ्रेंच व अमेरिकन अधिकाऱ्यांची भेट होईल असे कळविले होते. अल्जेरियाची राजधानी अल्जियर्स-पासून हे ठिकाण साठ मैलांवर होते. खास नकाशावर हे घर नेमके दाखवलेले होते.

मर्फीच्या संदेशात, 'टॉर्च' या मोहिमेच्या तपशीलाशी परिचय असलेला एक, नौदलाचा एक, एक पुरवठातज्ज्ञ आणि एक अस्खलित-फ्रेंच बोलू शकणारा राजकीय अधिकारी यांचाही समावेश भेटमंडळात असावा, असे सुचविले होते. त्याप्रमाणे योग्य माणसांची निवड क्लार्कने केली.

नंतर ठरल्याप्रमाणे उत्साही चर्चिलने सारी योजना नजरेखालून घातली आणि संपूर्ण ब्रिटिश सहकार्याचे आश्वासन दिले. या मंडळाने अमेरिकन विमानातून जिब्राल्टरपर्यंत जावे आणि नंतर ब्रिटिश पाणबुडीने त्याला भूमध्यसमुद्रातून अल्जियर्सजवळ न्यावे, असे ठरविण्यात आले.

दिवसभरात आलेल्या गुप्त संदेशातील माहितीमुळे क्लार्कच्या मोहिमेची तातडी अधिकच वाढली. या माहितीप्रमाणे, एक लाख फौज फ्रेंच ट्युनिशिया व अल्जेरिया येथे हलविण्याची तयारी जर्मन करत होते. या पार्श्वभूमीवर 'टॉर्च' मोहिम यशस्वी व्हायची तर अमेरिकनानी प्रथम हालचाल करणे जरुरीचे होतें. हिटलरने निर्णायक कृती करण्याअगोदरच चपळाईने व्हिशी आफ्रिका व्यापण्याची आवश्यकता होतो. त्यासाठी फ्रेंचांच्या सहकार्याची गरज होती.

अमेरिकन आणि ब्रिटिश युद्धखाती तत्परतेनें कामाला लागली. ज्या दोन अमेरिकन विमानांतून क्लार्क आणि त्याचे सहकारी जिब्राल्टरला जाणार होते ती विमाने लंडनजवळील एका विमानतळावर सज्ज ठेवली होती. त्यांच्यासाठी खास वैमानिकांची निवड केली होती. कॅनेडियन डॉलर्सची एक भली मोठी थैलीदेखील तयार ठेवली होती. प्रसंगी संकटातून सुटण्यासाठी या थैलीचे बंद सैल सोडण्याचा प्रभावी उपाय योजता येणार होता.

पण अचानक हवामान बिघडले. त्यामुळे विमानोड्डाण अशक्य झाले. हवामान दोन दिवस तसेच राहिले. विमानोड्डाणाचे सोडा, जिब्राल्टरला विमान उतरविण्यात

देखील अडचण होती. त्या तोकड्या धावपट्टीवर एवढे मोठे विमान कधीच उतरले नव्हते.

मोहिमेच्या गुप्ततेला तडा जाऊ नये म्हणून क्लार्क व त्याचे सहकारी यांना एका अज्ञात स्थळी दडविण्यात आले होते.

तासामागून तास चालले होते. सारे जण अस्वस्थ झाले होते.

क्लार्कने आपल्या पत्नीला एक चिठ्ठी लिहून ठेवली. क्लार्क कोठे आहे, कोठे जाणार आहे याची तिला बिचारीला काहीच कल्पना नव्हती. मोहिमेत क्लार्कवर प्राणसंकट गुदरले तर ही चिठ्ठी त्याच्या पत्नीला देण्यात येणार होती.

अखेर १९ ऑक्टोबर रोजी हवामान निवळले. पहाटे विनासंरक्षण जिब्राल्टरला उड्डाण करण्याचा धोका पत्करायचे ठरले. आकाशात जर्मन विमानांशी गाठ पडण्याची शक्यता होती. त्यामुळे संरक्षक फायटर विमाने बरोबर नेणे एकापरीने आवश्यक होते. परंतु विमानांच्या अशा ताफ्यापेक्षा दोनच विमाने निसटून जाण्यची शक्यता अधिक होती.

कोणत्याही कारणासाठी स्पेन वा पोर्तुगालमध्ये विमाने उतरवायची नाहीत अशी ताकीद वैमानिकांना देण्यांत आली होती. खुद्द जिब्राल्टरच्या विमानतळावर उतरण्यातही थोडासा धोका होताच. कारण जर्मनीबद्दल कैवार असलेल्या स्पेनपासून हा विमानतळ अवघ्या तीनशे यार्डांवर होता. नाझी हस्तक त्याच्यावर सतत लक्ष ठेऊन होते. दोन प्रचंड अमेरिकन बाँबर विमानांच्या आगमनाने त्यांचे कुतुहल जागृत होणे स्वाभाविकच होते. या कुतुहलाची परिणती चुकीचे निष्कर्ष काढण्यात होईल अशी आशा बाळगण्यावाचून दुसरे काही तेव्हा तरी करता येण्यासारखे नव्हते.

वाटेत कसलेही संकट न येता विमाने जिब्राल्टरच्या विमानतळावर उतरली. आणि त्याचे सहकारी विमानातून उतरले. क्लार्क आणि अगदी शेजारीच उभ्या असलेल्या मोटारीत बसले. तेथून त्यांना जिब्राल्टरच्या राज्यपालांच्या निवासस्थानी नेण्यात आले. तेथे शाही नौदल आणि ब्रिटिश कमांडो अधिकारी यांच्याशी सूक्ष्म चर्चा करून योजनेच्या तपशीलावरून अखेरचा हात फिरविण्यात आला. त्यानंतर क्लार्क आणि त्याच्या सहकाऱ्यांना 'सेराफ' या पाणबुडीचा कर्णधार लेफ्टनंट नॉर्मन जेवेलर याच्या स्वाधीन करण्यात आले. सेराफची गती मंद होती. ती जुनाटदेखील होती. परंतु नियोजित कामाला अगदी योग्य होती.

## दिवा दिसतो आहे !

सुरवातीला पन्नास मैल जलपृष्ठावरूनच जाणाऱ्या सेराफला एका ब्रिटिश विनाशिकेने संरक्षण दिले होते. नंतर ती विनाशिका मागे फिरली. सेराफ पाण्याखाली गेली.

'आपली गती फारच मंद आहे.' जेवेल क्लार्कला म्हणाला, 'पाण्यावरूनच गेलो

तर दहा नॉट वेग राहतो आपला; पण पाण्याखाली मात्र तीन नॉटपेक्षा जास्त वेगाने जाऊ शकत नाही आपण.'

'पण आपल्याला तर घाईने जायचे आहे' क्लार्कने उत्तर दिले, 'त्यामुळे शक्य तर पाण्यावरच राहण्याचा प्रयत्न करू आपण.'

'ठीक आहे.' जेवेलने उत्तर दिले.

भूमध्यसमुद्रावर जर्मन विमाने आणि युद्धनौका यांचे आधिपत्य होते. त्यामुळे दहा नॉट वेगाने जाणाऱ्या सेराफला मोठाच धोका होता. तिच्या मंद वेगामुळे विमानांच्या व युद्धनौकांच्या दृष्टीने ती एक स्थिर लक्ष्यच होती. प्रत्येक वेळी एखादी नौका दिसली किंवा दुरून येणाऱ्या विमानाचा अस्पष्ट आवाज ऐकू आला म्हणजे सेराफ पाण्यात दडी मारायची. हल्ला होता तर सेराफ वाचण्याची सुतराम शक्यता नव्हती.

अखेर सेराफ इच्छित स्थळाच्या जवळ आली. ब्रिटिश कमांडो अधिकाऱ्यांनी घडीच्या रबरी होड्या चालविण्याचे कठीण तंत्र अमेरिकनांना समजावून सांगितले. या होड्यांमधूनच त्यांना अल्जेरियाच्या किनाऱ्यावर उतरायचे होते. या होड्या चालवणे ही गोष्ट सोपी नव्हती. प्रत्यक्षात ब्रिटिश कमांडोज असूनही या होड्या उलटल्या आणि क्लार्क व त्याच्या सहकाऱ्यांना, इच्छा नसतानाही, समुद्रस्नान घडले.

२१ ऑक्टोबरच्या पहाटे सेराफ अगदी अल्जेरियाच्या किनाऱ्यापाशी आली. त्यावेळी जेवेल क्लार्कला म्हणाला, 'मला वाटतं आता आपण पाण्यात बुडी मारावी; कारण अर्ध्या तासाच्या आत किनाऱ्यावरील तोफांच्या माऱ्याच्या टप्प्यात येऊ आपण.'

जेवेलच्या सूचनेप्रमाणे सेराफ समुद्रात दडली. फक्त तिचा ऊर्ध्वदर्शक (पेरिस्कोप) तेवढा पृष्ठभागावर होता. त्यातून जवळ येणारा किनारा क्लार्क निरखून पाहात होता.

परंतु त्याचा आधीचा उत्साह आता काहीसा मावळला होता. जिब्राल्टर सोडल्यावर लगेच वॉशिंग्टनशी संधान बांधून मर्फीला भेटण्यासाठी दुसरे एखादे संकेतस्थळ निश्चित करण्याची विनंती त्याने केली होती. कारण या नियोजित संकेतस्थळी होणारी भेट चुकण्याचा संभव होता. आता तर ती चुकेल असेच वाटत होते. वॉशिंग्टनहून कसलाच जबाब आला नव्हता.

क्लार्कच्या इंग्लंडमधील उड्डाणाला, अयोग्य हवामानामुळे विलंब लागेल किंवा सर्वसाधारण गतीपेक्षा मंद गतीच्या बोटीमधून त्याला भूमध्यसमुद्र पार करावा लागेल, या गोष्टी, भेटीची तारीख ठरवताना मर्फीने साहजिकच विचारात घेतलेल्यां नव्हत्या.

'आता आपल्याला इथं थांबून राहणं भागच आहे' क्लार्क म्हणाला, 'आता

मागं जाऊ शकत नाही आपण.'

'पण इथं थांबून राहणं मोठं धोक्याचं आहे' जेवेल म्हणाला, 'या उथळ पाण्यात विमानं आणि बोटीदेखील पाहू शकतील आपल्याला.'

'त्याला आता काय करणार!' क्लार्क उत्तरला.

मधूनमधून पृष्ठभागावर डोके वर काढणाऱ्या ऊर्ध्वदर्शकातून क्लार्कला उंच कड्यावरील ते संकेतस्थळ – ते घर दिसत होते. लहानग्या होड्यांतून तेथील किनाऱ्यावर उतरणे बरेच धोक्याचे असावे, असे त्याला वाटले.

पाणबुडीत सारे उदास झाले होते.

'निरोप मिळण्याची वाट न पाहताच किनाऱ्यावर उतरायला काय हरकत आहे?' होम्सने विचारले.

'तसं कसं करणार?' क्लार्क म्हणाला, 'कसंही झालं तरी साध्या प्रवाशांसारखं किनाऱ्यावर उतरण्यात काहीच अर्थ नाही. मर्फीची माणसं जर आली नाहीत तर तिथं जाऊन करणार काय आपण?'

अखेर ज्याची ते आतुरतेने वाट पाहात होते तो निरोप आला. त्याच रात्री क्लार्कने किनाऱ्यावर उतरण्याचा प्रयत्न करावा, असे मर्फीने सुचवले होते. घराच्या मागील खिडकीतून दिवा दाखवून सारे आलबेल आहे असे कळवण्यात येणार होते. दिवा नसेल तर क्लार्कने किनाऱ्यावर उतरू नये; मग पुन्हा ४८ तासांनंतर भेटीची योजना ठरविण्यात येईल, असा तपशील निश्चित झाला होता.

'आज रात्रीच सगळं झालं तर बरं होईल,' क्लार्क म्हणाला, 'आणखी अठ्ठेचाळीस तास या जागी घालवण्याची इच्छा नाही आपली.'

वेळ भरत आली तशी सारे उत्कंठित झाले. क्लार्क पुन्हा पुन्हा किनारा न्याहाळत होता; पण किनाऱ्यावर काहीच दिसत नव्हते. दहा वाजले. पण त्या धोकेबाज किनाऱ्यावरील काळोखाचा भेद करणारा तो संकेत दिवा अजून उजळत नव्हता. साडे-दहा वाजले तेव्हा त्या दिवशी भेट होण्याची आशा क्लार्कने सोडून दिली. कंटाळून त्याने एका खाटल्यावर लोळण घेतली आणि थोडी झोप काढण्याचा प्रयत्न तो करू लागला.

तो किती वेळ तसा पडला होता कोणास ठाऊक. अचानक कुणीतरी त्याला हाक मारून दिवा दिसतो आहे, अशी बातमी दिली.

क्लार्क खाटल्यावरून ताडकन उठून उभा राहिला. त्याने आपल्या घड्याळाकडे पाहिले. मध्यरात्र झाली होती.

सेराफ हळूहळू पृष्ठभागावर आली. होड्या खळबळत्या पाण्यात हलकेच सोडण्यात आल्या आणि क्लार्क व त्याचे सहकारी त्यांच्यात बसले.

'व्ही' या अक्षराच्या आकारात होड्या किनाऱ्याकडे सरकू लागल्या. वल्ह्यांचा आवाज होणार नाही, याची काळजी प्रत्येकजण घेत होता. समोरच्या अंधारात

कड्यावरील त्या घराच्या पाठीमागच्या खिडकीतील तो दिवा तेवढा चमकत होता.

कर्नल होम्स व त्याचा सहकारी प्रथम किनाऱ्यावर उतरले. पाठोपाठ बाकीच्या होड्या आल्याच. काही मिनिटातच क्लार्क आणि त्याचे सहकारी किनाऱ्यावरच्या ओल्या वाळूत उतरले. आपल्या होड्यांच्या घड्या करून त्या बरोबर घेतल्या. समोरच्या अंधारात, पाहण्याचा प्रयत्न करूनही, त्यांना काही दिसत नव्हते. तो विस्तृत किनारा रिकामा भासत होता. समोरच तो उंच कडा उभा होता. त्यावर चढणे कठीण आहे असे वाटत होते. कदाचित् शत्रू आपल्या हालचाली न्याहाळत असेल या जाणिवेने सगळे मनोमन भयकंपित झाले होते.

'चला, धावत जाऊन त्या कड्याचा आडोसा घ्या.' क्लार्कने हुकूम सोडला. सगळ्यांनी कड्याकडे धाव घेतली. तेथून जवळच झाडांच्या काळ्या पडछायेत उभी असलेली काही माणसे क्लार्कला प्रथम दिसली. त्याने लगेच रिव्हॉल्व्हरला हात घातला. इतक्यात त्यांच्यापैकी एकाने खास अमेरिकन आवाजात क्लार्कचे स्वागत केले. तो मर्फी होता. ठरल्याप्रमाणे आपल्या माणसांसह तो हजर झाला होता. क्लार्कने खरे म्हणजे एक छोटेसे फ्रेंच वक्तव्य-तयार ठेवले होते. पण प्रत्यक्षात मात्र तो एवढेच पुटपुटला, 'सुटलो एकदाचा'–तेही इंग्रजी भाषेत.

परंतु ही तर मोहिमेची नुसती सुरुवात होती. किनाऱ्यावर आता अदबशीर उपचारांवर अधिक वेळ घालवून चालण्यासारखे नव्हते. मर्फीने क्लार्कच्या हाताला धरले आणि ते एका अरुंद पायवाटेने कड्यावरील घराकडे निघाले. क्लार्कने पाहिले, नजिकच्या परिसरात एकही घर नव्हते किंवा कसलाही दिवा नव्हता. ते पाहून तो म्हणाला, 'तुम्ही जागा तर चांगलीच शोधलीत.'

मर्फी म्हणाला, 'हे घर एका तेसिये नावाच्या माणसाचं आहे. आपल्याला इथं भेटू देण्यासाठी त्यानं जीव धोक्यात घातला आहे. परंतु सुदैवानं आत्मरक्षणाच्या भावनेपेक्षा त्याची देशभक्ती अधिक प्रखर आहे. ते असो. घर रिकामंच आहे. तेसियेने त्याच्या अरब नोकरांना दोन दिवस रजा दिली आहे. आता इथं आपल्याला कुणाचा त्रास होणार नाही वा कोणी आपली चुगली करणार नाही.'

लहानखुऱ्या चणीच्या, भेदरलेल्या तेसियेने त्यांचे स्वागत केले. उत्कंठेने तो बेजार झाला असला तरी त्याची अगत्यशीलता कमी झाली नव्हती. मर्फी आणि क्लार्क व त्याचे सहकारी यांना त्याने एका खोलीत बसवले. कमांडोजची व्यवस्था त्याने वेगळ्या खोलीत केली. पुन्हा निघेपर्यंत कमांडोजना तेथे व्यवस्थित बसता-झोपता येणार होते.

मर्फी क्लार्कला म्हणाला, 'जनरल चार्ल्स मास्ट आणि इतर अधिकारी पाच वाजायच्या आधी काही इथं येणार नाहीत. तेव्हा मी असं सुचवतो की आपण सगळ्यांनी थोडी झोप काढावी. ते आले म्हणजे तेसिये उठवेल आपल्याला.' पुढील काही तास क्लार्कने एका अव्यस्थित पिछाऱ्यावर झोपेशी झगडण्यात घालवले.

पाच वाजण्याचे सुमारास तेसियेने त्याला उठवले तेव्हा तो अर्धवट जागाच होता. शत्रूच्या प्रदेशात इतक्या थोड्या लोकांनिशी आपण आलो आहोत ही जाणीव त्याला झोप लागू देणे शक्यच नव्हते.

## दगलबाजी

क्लार्क खाली येईपर्यंत जनरल मास्ट आणि इतर अधिकारी दिवाणखान्यात गोळा झाले होते. त्यानंतर औपचारिक ओळख झाल्यावर लगेच योजनेच्या चर्चेला सुरवात झाली.

तेसियेचे हे घर जुने होते. खूप मोठे होते. मुख्य रस्त्यापासून ते इतके दूर होते की रहदारीचा आवाज घरापर्यंत पोचत नव्हता. खाली विस्तृत किनारा अगदी शांत होता. त्याच्या पलीकडे लाटा लयबद्ध उसळत होत्या. या इतक्या निरामय शांत वातावरणात, घरात जमलेल्या मंडळीच्या जिवाला असलेल्या धोक्याचे विस्मरण खुद्द त्यांनाच होणे शक्य होते.

या वातावरणात उत्तर आफ्रिकेच्या मोहिमेतील अमेरिका आणि फ्रान्सच्या सह-कार्याची चर्चा सुरू झाली. शब्द दिल्याप्रमाणे फ्रेंचांनी सगळ्या आवश्यक कागद-पत्रांच्या मूळ प्रती आणि त्यांच्या खऱ्या नकला आणल्या होत्या. त्यात नकाशे, निरनिराळ्या तुकड्यांची माहिती, तोफांची केंद्रे, विमानतळ, छावण्या, दारूगोळा आणि तेलाचे साठे यांची स्पष्ट माहिती होती. फ्रेंचांना विश्वास वाटेल इतकी माहिती द्यावी, परंतु मोहिमेचा सूक्ष्म तपशील मात्र त्यांना सांगितला जाऊ नये, असा आदेश क्लार्कला देण्यात आला होता. क्लार्क ही माहिती देत असतानाच अचानक खोलीतील दूर ध्वनीने आवाज केला.

क्लार्कने वाक्य अर्थातच तोडले. त्याने हात उंचावून सर्वांना शांत रहाण्यास खुणावले. खोलीतील अकराही माणसे गोठून गेल्यासारखी निश्चल झाली. इतक्यात तेसिये, घाबरलेल्या सशासारखा धावत खोलीत आला आणि त्याने दूरध्वनीयंत्र उचलले

प्रसंग आणीबाणीचा आहे हे क्लार्कने जाणले. सेराफ येथे बुडून राहिली होती त्या सागरभागाकडे तो अजूनही व्यग्र होऊन पाहात होता. तेसियेने दूरध्वनी यंत्र खाली ठेवले. त्याचा चेहरा पांढराफटक झाला होता. तो क्लार्कला उद्देशून म्हणाला, 'पोलीस येतील कोणत्याही क्षणी इथे. कोणीतरी आपल्याशी दगलबाजी केलेली असावी.' तेसियेचा स्वर कापत होता.

तेसियेचे बोलणे पुरते संपण्यापूर्वीच फ्रेंच अधिकाऱ्यांनी दाराबाहेर धूम ठोकली होती. तत्परतेने ते मोटारीत बसले आणि त्यांनी मोटारी सुसाट सोडल्या. अल्जि-यर्सच्या मुख्य रस्त्यावर एकदा गेल्यानंतर, अधिकृत कामासाठी आपण निघालो आहोत, असे त्यांना सहज सांगता येणार होते.

क्लार्कने भिवया उंचावून मर्फीला म्हटले, 'आपणदेखील बाहेर पडू या इथून.

मी कमांडोजना सांगतो तसं.'

जनरल क्लार्क धावत कमांडोजच्या खोलीकडे गेला. त्याने कमांडोजना झोपेतून उठवले आणि आदेश फर्मावला, 'पोलीस येत आहेत. प्रथम इथून बाहेर पडा. बरोबर होडया घ्या आपल्या. मागं काही ठेऊ नका. आपण इथं होतो असा थोडा-देखील संशय येता कामा नये कुणाला. किनाऱ्यावर जाण्याचा प्रयत्न करा आणि सेराफला इशारत द्या.'

सेराफशी संपर्क साधण्यासाठी असलेला रेडियो ज्या कमांडोकडे होता तो तेवढा घरातून बाहेर पडून किनाऱ्यावर पोचला. बाकीचे होडयांची आवराआवर करण्याची धडपड करत असतानाच तेसिये धावत तेथे आला आणि म्हणाला,

'आता बिलकुल वेळ नाही. पोलिसांची मोटार अगदी जवळ आली आहे. जनरलसाहेब, तुम्ही माझ्याबरोबर चला.'

तेसियेने आपल्या पांढुरक्या ओठावर तर्जनी उभी ठेवून कमांडोजना गप्प राहण्याची खूण केली. नंतर क्लार्कसह तो बाहेर पडला. खोलीला बाहेरून त्याने कुलूप लावून टाकले. तेसियेमागोमाग क्लार्क धावत खाली गेला. मर्फी त्याचीच वाट पाहात होता. मर्फीने त्याला एका झडपेपाशी नेले. जमिनीत असलेली ही झडप मर्फीने हिसका देऊन उघडली. खाली तळघरात उतरण्यासाठी एक अरुंद शिडी होती. क्लार्क तिच्यावरून धडधडत खाली उतरला. पाठोपाठ झडप लावली गेली, तिच्यावर एक कुलूप ठोकण्यात [illegible] तळघरात सारा अंधार होता. अंधारा-तच क्लार्कला त्याच्या एका [illegible] [illegible]द ऐकू आले: 'जनरलसाहेब आम्ही सारेच इथं आहोत. मर्फी म्हण[illegible]लिसांना हु[illegible]कावणी देणार आहे.'

'पोलिसांना कमांडोज सा[illegible]डले नाहीत म्ह[illegible] मिळवली,' क्लार्क पुटपुटला, 'त्यांना वर खोलीत होडया आणि [illegible] सामानासह बंद करून ठेवलंय. बरं पण त्या कागदपत्रांचं काय झालं?'

'आहेत. सारे कागदपत्र इथं सुरक्षित आहेत.' एकाने आश्वासन दिले.

तेवढयात कोणीतरी सावधानतेने क्लार्कच्या हातात पिस्तुल सरकवले. पिस्तुल हाती येताच ते बंद झडपेवर रोखून क्लार्क म्हणाला, 'मी पिस्तुल झाडीपर्यंत कोणी गोळीबार करायचा नाही. ते नालायक पोलीस जर आलेच इथे तर मात्र त्यांचा निकाल लावल्याशिवाय मी राहणार नाही.' अचानक त्या निःशब्द शांत-तेला तडा पाडत वर दिवाणखान्यात भसाडया आवाजात समूहगानाला सुरुवात झाली.

तेसियेने सारे पुन्हा ठाकठीक केले होते. महायुद्धातील एक अतिगुप्त व नाटय-पूर्ण बैठक नुकतीच तिथे झाली होती, असे आता तेथे येणाऱ्या कोणालाही सहज समजण्यासारखे नव्हते. क्लार्क आणि त्याचे सहकारी सारे व्यवस्थित कुलूपबंद केले होते. मर्फी, तेसिये आणि इतर दोघे आता मोठया टेबलाशी बसून उच्च

स्वरात गाणे म्हणू लागले होते. मर्फी त्यांना म्हणाला, 'गाणं अगदी स्वाभाविक वाटू दे; मग आवाज भसाडा असला तरी हरकत नाही.'

पूर्वसूचना देणारा दूरध्वनी मिळून काही मिनिटेच झाली असतील इतक्यात पोलिसांची मोटार तेसियेच्या घरापाशी थांबली. पोलीस खाली उतरले. पाठोपाठ पुढील दरवाज्यावर ठोठावण्याचा आवाज ऐकू आला. तेसिये दरवाजा उघडायला गेला.

गाणं थांबवू नका तुम्ही.' मर्फीने आदेश दिला. आता त्यांच्या कानावर पोलिसांचे शब्द पडले. 'पोलीस! इथं चाललं आहे तरी काय?' तेसिये म्हणाला, 'काही नाही साहेब. थोडे मित्र जमले आहेत. खाणंपिणं चाललंय मजेत.' पोलिसांनी तेसियेला बाजूला ढकललें आणि ते दिवाणखान्यात घुसले. पोलीस अधिकाऱ्याच्या हातात पिस्तुल होते. फ्रेंच माणसासारख्या न दिसणाऱ्या मर्फीवर ते रोखून, त्याच्याजवळ जात, तो पोलिस अधिकारी कठोरपणे म्हणाला, 'तू कोण आहेस?'

'रॉबर्ट मर्फी. अल्जियर्समधील अमेरिकेचा राजदूत आहे मी.' अस्खलित फ्रेंचमध्ये मर्फीने उत्तर दिले. आणि पोलीस अधिकाऱ्याला उद्देशून विचारले, 'थोडं मद्य घेणार का तुम्ही? आणि काय आहे हा सगळा प्रकार?'

'काहीतरी शोधून काढण्यासाठी इथं पाठवलंय मला.' अधिकारी गुरगुरला, 'कागदपत्र आहेत का तुमच्याजवळ?'

मर्फीने आपले परवानापत्र काढून त्याच्या हाती ठेवले. या पोलिसांबरोबर नमते घेणेच इष्ट होते.

अधिकाऱ्याने परवानापत्र पाहिले आणि परत केले. त्यानंतर तो म्हणाला, 'आम्हाला बातमी अशी कळली होती की इथं काहीतरी बेकायदेशीर गोष्ट चाललेली आहे. दुसरं कोण आहे घरात?'

मर्फीने ओशाळल्याचा अभिनय केला आणि तो म्हणाला, 'खरं सांगू का, काही फ्रेंच अधिकारी आणि आम्ही – मेजवानी चालली आहे आमची. बाकीचे अधिकारी आहेत वरती. झोपायच्या खोल्यांमध्ये. त्यांच्याबरोबर आम्ही आणलेल्या काही मुलीसुद्धा आहेत.

ही थाप मारताना मर्फीचे हृदय लकलकत होते. पोलीस अधिकाऱ्याचा चेहेरा मात्र निर्विकार होता. मर्फीने सांगितलेल्या गोष्टीवर त्याचा कितपत विश्वास बसला आहे ते कळत नव्हते.

धूर्तपणाने मर्फी पुढे म्हणाला, 'त्या मुली चांगल्या अल्जेरियन घरातल्या आहेत. आता हे जर कळलं सगळ्यांना तर, बापरे, केवढा गहजब होईल–'

'होय' पोलीस अधिकारी म्हणाला. त्याचा चेहेरा थोडा सैलावला. थोडासा हसलादेखील असावा तो. मग पुन्हा चेहेरा कठोर करत त्याने म्हटले, 'तरीदेखील आजूबाजूला झडती घेणार आम्ही.'



"अल्जियर्समधील अमेरिकेचा राजदूत आहे मी." मर्फीने उत्तर दिले.

मर्फीच्या उरात धडकी भरली. वरच्या खोल्यांमधून अधिकारी आहेत अशी मोठी धीट थाप त्याने मारली होती. त्यामुळे पोलीस वर जाण्याच्या भानगडीत पडणार नाहीत, अशी आशा त्याला वाटत होती. आता मात्र, आपण ती थाप मारली हे योग्य केले किंवा नाही, या विचाराने त्याच्या चित्तात काहूर माजले. ब्रिटिश कमांडोज किंवा गणवेषधारी अमेरिकन सापडले म्हणजे सगळा खेळ खलास होणार होता. मग क्लार्क आणि त्याचे सहकारी यांच्या प्राणांपेक्षा कितीतरी अधिक मोल मोजावे लागणार होते. दोस्तांना कदाचित् सबंध आफ्रिकेचीच किंमत द्यावी लागली असती.

आता यातून सुटण्याचा एकच मार्ग होता. तो म्हणजे अधिक धिटाई दाखविण्याचा. मर्फी उठला आणि जादा मद्यपान केलेल्या माणसाच्या आविर्भावात पोलीस अधिकाऱ्याला म्हणाला, 'तुम्हाला जायचं असेल वर तर जाऊ शकता तुम्ही. पण त्याचं केवढं प्रकरण होईल याचा विचार करा. समजा तर तुम्हाला एक फ्रेंच अधिकारी आणि ती मुलगी बिछान्यात एकत्र आढळली...काय बरं त्या मुलीचं नाव? नको. पण त्या मुलीचं नाव न सांगितलंच बरं ते सांगणं सभ्यपणाचं होणार नाही.'

मर्फी पुन्हा खुर्चीत बसला आणि हसू लागला. त्याच्या मित्रांनी त्याला चांगली साथ दिली. तेसियेला तर, या निमित्ताने आपल्या मनावरील ताण हलका करण्याची चांगली संधी मिळाली.

तळघरात क्लार्क आणि त्याचे सहकारी श्वास रोधून बसले होते. वर पोलिसांची पावले वाजत होती. एकदा तर सरळ झडपेवरच दणाणली ती.

इतक्यात कोणाला तरी खोकल्याची उबळ आली. मार्क क्लार्कने तत्परतेने आपल्या तोंडामधील च्युइंगम काढून खोकलेवाल्याच्या तोंडी दिला आणि त्याचे तोंड बंद केले.

पोलीस अधिकाऱ्याने तळमजल्यावरचा शोध पुरा केला आणि तो मर्फीपाशी आला. पुढे काय करावे याविषयी त्याचा निश्चित निर्णय होत नाही हे मर्फीने ओळखले.

'आम्ही जातो आता' पोलीस अधिकारी म्हणाला, 'पण जे चाललं आहे ते काही पसंत नाही मला. पुन्हा येईन मी.'

म्हणजे याबाबत आपल्या वरिष्ठांशी चर्चा करण्यासाठी त्याला वेळ हवा आहे, हे मर्फीने ताडले. पोलीस अधिकाऱ्याने एका पोलिसाला घराच्या प्रवेशद्वारात पहाऱ्याला ठेवले आणि तो बाकीच्या पोलिसांसह निघून गेला.

मर्फीने सुटकेचा निःश्वास सोडला. ताबडतोब त्याने क्लार्क आणि इतर मंडळींना मोकळे केले.

'मार्क, ते गेले निघून आता' मर्फी म्हणाला, 'पण पुन्हा येतील ते.'

'कधी?'

'कदाचित् अर्ध्या तासातदेखील. त्यामुळे आपण इथून बाहेर पडावं हे बरं.'

## चड्डी नाहीशी झाली

प्रवेशद्वारी असलेल्या पोलिसाला न चाळवता क्लार्क आणि त्याचे सहकारी मागील दाराने चोरपावलांनी बाहेर पडले. त्यांच्याबरोबर फ्रेंचांचे गुप्त कागदपत्र होते. शिवाय होड्या आणि इतर साहित्यदेखील होते.

किनाऱ्यापाशी त्याना, पोलीस येण्यापूर्वी निसटलेला तो कमांडो अधिकारी भेटला. त्याने सेराफशी संपर्क साधला होता.

'पाणबुडीवर सारे अस्वस्थ आहेत जनरलसाहेब' तो म्हणाला.

'इथंदेखील कोण स्वस्थ आहे?' क्लार्कने उत्तर दिले.

पहाऱ्याकरता एकदोघांची योजना करून बाकीची मंडळी रात्र पडण्याची वाट पाहू लागली. काळोख पडल्याबरोबर क्लार्कने कोर्टने या आपल्या सहकाऱ्याला म्हटले, 'आता आपल्याला प्रयत्न करायलाच पाहिजे. लाटा फार मोठ्या आहेत हे खरे; पण आपण होडी हाकारू शकलो तर बाकीचेदेखील धीर करतील थोडा.' कोर्टनेने होकार दिला.

त्या खवळलेल्या लाटांमध्ये विमुकली रबरी होडी हाकारायची म्हणजे मोठी अवघड गोष्ट होती. त्या प्रयत्नात समुद्रस्नान घडणे अटळच होते. म्हणून क्लार्कने केवळ एक छोटी चड्डी आणि सदरा अंगावर ठेवला. आपल्या होडीतून वीस हात अंतर ते जेमतेम गेले असतील इतक्यात एका लाटेच्या तडाख्यासरशी ती किनाऱ्यावर फेकली गेली. क्लार्क आणि कोर्टने ओल्या वाळूत आदळले. धडपडत क्लार्क

ज्यावेळी कोरडचा वाळूत आला त्यावेळी आपली चड्डी नाहीशी झाल्याचे त्याच्या लक्षात आले. चड्डीबरोबरच त्याचा कमरपट्टाही पाण्यात गेला होता. त्यात कितीतरी सुवर्णमुद्रा होत्या. क्लार्क उद्विग्न होऊन मर्फीला म्हणाला, 'इथून कसंही करून जायला पाहिजे आपल्याला. केवळ अधिकाऱ्यांच्या जगण्यामरण्याचा प्रश्न नाहीं आहे हा. हे सगळे कागदपत्र आईकला पोचवायचे आहेत आपल्याला.'

'खरं आहे' मर्फी म्हणाला, 'इथून जवळच शेरशेल नावाचं खेडं आहे. तिथं कोणालातरी पाठवू आपण. एखादी होडी भाड्यानं मिळते का ते पाहण्याचा प्रयत्न करू.'

भरपूर सुवर्णमुद्रा घेऊन एक माणूस या कामगिरीवर पाठवण्यात आला; पण अर्ध्या तासाने तो अयशस्वी होऊन परत आला.

क्लार्क आणि त्याचे सहकारी चांगलेच अडचणीत सापडले होते. कामगिरी पुरी करायची तर सेराफपाशी जाणे आवश्यकच होते; आणि उसळत्या लाटांमुळे सेराफपर्यंत पोचणे अशक्य वाटत होते. सेराफ बिचारी उत्कंठेने किनाऱ्यापासून अवघ्या पाऊण मैलावर उभी होती. मार्क क्लार्कने तिच्याशी सतत संपर्क ठेवला होता.

मध्यरात्रीच्या सुमारास क्लार्कला वाटले, तेसियेच्या घरामधून काही खाद्यपदार्थ आणि उबदार कपडे आणले तर बरे होईल. ते आणण्यासाठी स्वतःच जायचे त्याने ठरवले. अनवाणी पायांनीच तो तेसियेच्या घरापाशी पोचला. सारे शांत होते. मागील बाजूच्या एका खिडकीतून क्लार्क घरात शिरला. आणि अंधारातून वाट काढत ते सियेसमोर दत्त म्हणून उभा राहिला.

'तुम्ही कशाला आलात? ताबडतोब निघून जा तुम्ही.' तेसिये क्लार्कला अजिजीने म्हणाला.

'मी इथं थांबायला थोडाच आलो आहे.' क्लार्कने उत्तर दिले, 'थोडे उबदार कपडे पाहिजेत मला, मी अगदी गारठून गेलो आहे. आणि पाव, चीज असं काही खायला मिळू शकेल काय?'

'जरूर. तेसिये उद्गारला, 'पण नंतर मात्र बिलकुल थांबू नका तुम्ही.'

थोड्याच वेळात तेसियेने काही कपडे आणले. ते महाकाय क्लार्कला आडस होऊ लागले. पण त्याला इलाज नव्हता. एक पाव आणि मद्याच्या दोन बाटल्याही तेसियेने आणल्या होत्या. क्लार्क त्या पोटाशी ठेवत असतानाच घराच्या दाराशी एक मोटार थांबल्याचा आवाज झाला.

'अरे बापरे' तेसिये ओरडला, 'हे कोण आलं आणखी? जनरलसाहेब, कृपा करा आणि तुम्ही ताबडतोब निघा कसे.'

तेसिये पुढील दाराकडे धावला. अधिकारी उद्दामपणाने कोणीतरी दार ठोठावीत होते. पुन्हा पोलिसच आले असणार हे क्लार्कने ओळखले. तो मागील बाजूने बाहेर पडला. बाहेर सगळे काळेकुट्ट होते. घराच्या आवाराच्या भिंतीवरून क्लार्कने उडी

मारली. अणुकुचीदार दगडांनी त्याचे पाय कापले. रक्ताचे थेंब सांडतच तो आपल्या सहकाऱ्यांपाशी येऊन पोचला. पाव आणि मद्याच्या बाटल्या मात्र त्याने सुरक्षित आणल्या होत्या.

सेराफवर कसे जायचे उत्तर अजून सापडत नव्हते. सेराफवरील माणसे आणि क्लार्कचे सहकारी एकमेकांना धीर देण्याचा प्रयत्न करीत होते. उथळ पाण्यात दडलेली सेराफ आणि किनाऱ्यावर झुडुपांमध्ये दडलेले क्लार्कचे टोळके या दोहों-पैकी कोण अधिक संकटात आहे ते सांगता येत नव्हते.

असा एक तास गेला. दोन गेले. तेसियेच्या घरात काय झाले असेल याची काळजी क्लार्क करीत होता. किनाऱ्यावरून ऐकू काहीच येत नव्हते. घर पूर्ण काळोखात बुडाले होते. कोणत्याही क्षणी व्हिशी पोलीस त्यांचा माग काढत येण्याचा संभव होता. त्यामुळे आळीपाळीने प्रत्येकजण ठोळचात तेल घालून पहारा करत होता.

पोलिसांच्या आगमनामुळे क्लार्कची गुप्त बैठक उधळल्याला. आता दहा तास झाले होते. पहाटेचे तीन वाजले होते. इतक्यात तेसियें स्वतःच दबकत दबकत किनाऱ्यावर आला. येताना केवळ एक काळी आकृती तेवढी दिसत होती. त्यामुळे सावधगिरीच्या हेतूने एकाने त्याच्या पोटात पिस्तुलाची नळी खुपसली आणि तोंडा-वर हात दाबला. मग चेहेऱ्यावर प्रकाश टाकला तेव्हा तेसियेची ओळख पटली.

'अखेर पोलीस गेले एकदाचे' तेसिये म्हणाला 'आता ते पुन्हा येतील असं नाही वाटत.'

'त्यांना खबर कुणी दिली असं वाटतं तुला ?' क्लार्कने विचारले.

'मला वाटतं माझ्या नोकरांनीच खबर दिली असणार. मी रजा दिली तेव्हाच त्यांना संशय वाटला असावा. या अरब लोकांचं काहीच सांगता येत नाही. मोठे चमत्कारिक असतात ते.'

क्लार्क आता अधिकाधिक अस्वस्थ होऊ लागा. लाटा तशाच उसळत होत्या. मध्येच तो राईट या आपल्या सहकाऱ्याला म्हणाला, 'जेरी, चल तू आणि मी सेराफवर जाण्याचा प्रयत्न करूया. कदाचित् आपल्याला जमेलसुद्धा ते. काहीही झालं तरी पहाटेपूर्वी इथून निघून गेले पाहिजे आपल्याला.

क्लार्कने सुचवल्यामुळे आता सगळ्यांनीच होड्या सिद्ध करायचे ठरवले. क्लार्क आणि राईट प्रथम निघाले. लाटांनी त्यांची होडी एकदा भेलकांडली, परंतु नशिब बलवत्तर असल्यामुळे ती उलटली नाही. मागून येणाऱ्या सगळ्या होड्या उलटल्या. त्यांना सेराफपर्यंत मोठ्या कष्टाने यावे लागले. त्या प्रयत्नात सगळे गुप्त कागदपत्र भिजून गेले होते.

क्लार्क आणि राईट वल्ही मारत होते. आता वेगळ्याच कारणामुळे ते अस्वथ झाले. सेराफ कोठे दिसत नव्हती त्यांना.

'सेराफ निघून गेली असेल काय ?' राईटने विचारले.

'मला नाही वाटत.' क्लार्क म्हणाला 'पण मग आहे तरी कुठं ती ?' थोडयाच वेळात त्यांच्या समोरच सेराफ पृष्ठभागावर आली. क्लार्क आणि वाईट सेराफवर चढले. ते भिजले होते; दमले होते. जेवेलने त्यांची चांगली देखभाल केली.

'तुमचे स्वागत असो' जेवेल म्हणाला.

'एखाद्या जागी परत आल्याचा आज होतोय तेवढा आनंद आजवर कधी झाला नव्हता मला.' क्लार्क हसून म्हणाला; 'जेवेल, तुझ्याशिवाय ही मोहिम सफल नसती. थांबल्याबद्दल मी आभार मानतो तुझे.'

आणखी अर्ध्या तासाने बाकीचे सहकारीदेखील सेराफवर येऊन पोचले. परंतु वाटेत मर्फीने लंडनला पाठविलेल्या गुप्तपत्रांची एक थैली सागराने गिळंकृत केली होती.

ती वार्ता कळली तेव्हा क्लार्क म्हणाला, 'वैतागच आहे. ते कागदपत्र कोणाला सापडले तर मर्फीचा आपल्या बैठकीशी संबंध सहज जोडता येईल.'

परंतु झाल्या गोष्टीवर काहीच इलाज करता येण्यासारखा नव्हता.

थोडयाच वेळात सेराफ जिब्राल्टरकडे परत निघाली. क्लार्कची खाजगी मोहिम यशस्वी झाली होती. रक्ताचा थेंबही न सांडता फ्रेंच उत्तर आफ्रिका व्यापण्याचा मार्ग मोकळा झाला होता. या मोहिमेने दुसऱ्या महायुद्धाला एक वेगळे वळण लागले होते.

या कथेला उपसंहार लिहिला पाहिजे. क्लार्कच्या या खाजगी मोहिमेनंतर पंधरा दिवसांनी अमेरिकन फौजा प्रचंड संख्येने फ्रेंच मोरोक्को आणि अल्जेरिया यांच्या किनाऱ्यावर उतरल्या.

यावेळी क्लार्क किनाऱ्यावर उतरला तेव्हा त्याचे स्वागत करायला मर्फी पुन्हा हजर होता. मात्र यावेळी त्याने जनरल क्लार्कसाठी एक विशेष भेट आणली होती. मर्फीने भेटवस्तूचे पुडके क्लार्कच्या हाती ठेवले. क्लार्कने ते औत्सुक्याने उघडले. आत, खाजगी मोहिमेच्या वेळी समुद्रात नाहीशी झालेली त्याची छोटी विजार होती !

# देव जागा (केला) आहे

नाट्यसंपदेच्या नवीन नाटकाभोवती असलेली 'हवा'—देव जागा आहे या नवीन नाटकाभोवती नव्हती. प्रयोगामध्ये विशेष उणिवा होत्या, कलाकार मातब्बर नव्हते अशातला भाग नाही. संपदेची नेहमीची निर्मितीमूल्ये लाभूनही हे नाटक समाधान देऊ शकले नाही.

भावनात्मक पातळीवरून चाललेल्या नाट्यामध्ये रहस्याची भर पडून गुंतागुंत वाढते. दोन अंकापर्यन्त नाटक एका विशिष्ठ टोकाने जाते आणि मग अचानक पलटी मारून झोपलेल्या देवाला बळेच जागे करते. हेमंत आणि त्याची पत्नी यांचे लग्न यशस्वी ठरत नाही. असाध्य रोगाने अंथरुणाला खिळलेल्या पत्नीची सेवा करणारा हेमंतही अखेर माणूसच असतो. अखेरीस तोही कंटाळतो. चिडून वैतागून नको ते बोलू लागतो. हेमंतच्या पत्नीची मैत्रीण वर्षा घरामध्ये आपुलकीने वावरत असते. लग्नाचे वय टळून गेलेलं असतं. तरी संसाराची आशा मनात असते आणि अचानक तिला एक विलक्षण कल्पना सुचते. हेमंतच्या पत्नीचा ती वीष देऊन खून करवते. पत्नीचा मृत्यु हा नैसर्गिक आहे. अशीच सर्वांची कल्पना होते. डॉक्टर धर्मानंद यांना काही संशय येतो. परंतु तेही गप्प राहणे पसंत करतात. पत्नी आजारी असतानाच हेमंतचे कोर्टींग सुरू झालेले असते. ललिता नावाच्या छकड्या पोरीशी त्याचे सूत जमते. लग्न करणे आवश्यक आहे इतकी सलगी निर्माण झाल्यामुळे आणि पत्नीचा अडसर दूर झाल्याने हेमंत ललितेशी लग्न करून येतो.

नवीन संसाराची उमेदीने चित्र पहाणारी वर्षा खचून जाते आणि मग पहिल्या पेक्षा विषारी विचार तिच्या डोक्यामध्ये येतो. आपल्याशी प्रतारणा करणाऱ्या हेमंतवर पत्नीच्या खुनाचा आरोप येईल, अशा पद्धतीने ती सर्व प्रकरण पुन्हा उकरून काढते. त्यात यशस्वी ठरते. कारण कोर्टामध्ये बिनतोड पुरावा उभा राहिल्याने हेमंतला फाशीची सजा होते. डॉक्टर धर्मानंद यांना वर्षाच्या वर्तणुकी-बद्दल संशय असतो. शेवटपर्यन्त खटपट करून ते अखेरच्या क्षणी वर्षाकडून कबुली-जबाब मिळवतात.

सौ. रत्नमाला हडप यांनी लिहिलेल्या या नाटकाचे पहिले दोन अंक जमून आले आहेत. संवादाची पातळी समाधानकारक नसली. तरी सुस्पष्ट व्यक्तिचित्रण, आणि कथेची वेधक गुंफण, जरूर पाहवयास मिळते. खरा खुनी कोण आहे हेही स्पष्ट होते. तुरुंगामध्ये वर्षा हेमंतला भेटावयास जाते तो भागही चांगला वाटतो. परंतु डॉक्टर धर्मानंदाकरवी धावपळ करवून हेमंतची सुचीत केलेली सुटका नाटकी

आणि कृत्रीम वाटते आणि म्हणूनच झोपलेल्या देवाला बळेच जागे करवून बाई न्याय घेतात असे वाटते. वर्षाचे मनोगत हेमंतसारख्या कलाकार माणसाला अखेर-पर्यन्त समजू नये हेही न पटणारे आहे.

### सुलभा देशपांडे : अप्रतिम भूमिका

या नाटकाचा खरा आत्मा आहे वर्षा–वर्षाची 'कॅरेक्टर' चांगली उतरली असून सुलभा देशपांडे यांनी वर्षाची ही भूमिका विलक्षण तन्मयतेने साकार केली आहे. व्यावसायिक रंगभूमीवरील बाईंची ही पहिलीच भूमिका. व्यवसायामध्ये पाच-दहा वर्षे घालवली त्यांनीही आवर्जून पाहवी, अभ्यासावी अशी झाली आहे. संयमित अभिनयाचे सुंदर दर्शन त्यांनी घडवले आहे. स्वतःच्या आणि हेमंतचा संसार उभारण्याची स्वप्ने पाहणारी वर्षा, मनोभंग झालेली वर्षा आणि सूडाचे इप्सित साध्य होऊनही हेमंतच्या अखेरच्या भेटीमध्ये सत्य परिस्थिती सुस्पष्ट झाल्यावर असमाधानी अस्वस्थ असलेली वर्षा, अशी या वर्षाची विविध रूपे बाई तन्मयतेने रंगवतात. अर्थवाही संवादफेक आणि विलक्षण सहजतेने वावर ही बाईंची अन्य वैशिष्टचेही नजरेतून सुटत नाहीत. लेखन आणि प्रयोग या दोन्ही दृष्टीने उत्तम भाग म्हणजे बाईंची ही वर्षा. बाकी मग धर्मानंदच्या भूमिकेमध्ये शरद तळवलकर आहेत. शशिकांत निकते हेमंत म्हणून उपस्थित आहेत आणि नयनतारा ललिता होऊन वावरते आहे. कुसुम देशपांडे फार दिवसांनी रंगभूमीवर आल्या आहेत. त्या आहेत शकुताई एक हलक्या कानाची बाई त्या छान उभी करतात.

निकते यांनी प्रयोग तसा नीटस बसवला आहे. नेपथ्य प्रयोगाची गरज पूर्ण करणारे आहे. तुरुंगातील हेमंतची व वर्षाची भेट नेपथ्य, प्रकाशयोजना, व कला-कारांचा अभिनय या दृष्टीने छान जमली आहे. हेमंतची कृत्रिम पद्धतीने केलेली सुटका हा या नाटकातील खटकणारा भाग तर सुलभा देशपांडे यांची वर्षाची भूमिका हा सर्वोतम भाग : चार दोष पोटात घालूनही बाईच्या या भूमिकेला दाद देण्यासाठी तरी रसिकांनी प्रयोग आवर्जून पाहिला पाहिजे. ◻

# काका मला वाचवा

## जनता गाडी एक, दोन, तीन

राजा गोसावी हे नाव रजतपटावरून विरून गेले असले, तरी राजाभाऊ रंगभूमीवर उभे आहेत. लग्नाची बेडी, करायला गेलो एक, या बाहेरच्या प्रयोगावरोबरच ते स्वतःच्या रंगश्रीमार्फत नव्या-जुन्या नाटकांचे प्रयोग लावत असतात. नवरा माझ्या मुठीत ग ! हे वऱ्यापैकी चालू असतानाच त्यांनी उधार उसनवार हे जुने नाटक काका मला वाचवा या नावाने रंगभमीवर आणले आहे.

'काका मला वाचना 'ला कथानक असे थोडे, प्रसंगाची गुंतागुंत निर्माण करून त्याची सोडवणूक करत प्रेक्षकांची करमणूक करायची अशा पद्धतीने नाटकाची रचना केली आहे. विलासने चैनीत राहून अनेकांची देणी केलेली आहेत. विलासच्या श्रीमंत बापाची इस्टेट सध्या विश्वस्ताकडे असली तरी अखेर ती त्यालाच मिळणार आहे. त्यामुळे कर्जबाजारी होऊनही त्याची बाजारात पत आहे. विश्वस्त काकांची विलासवर पोटच्या पोराप्रमाणे माया असल्याने पोरगा एवढा खर्च करतो तरी कसा ? त्याची बायको इतकी उधळी कशी ? या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी विश्वस्त काका गडगडे आपण येणार असल्याचे विलासला कळवतात. काकांना गंडवण्यासाठी विलासने केलेला खटाटोप आणि अखेर पत्करावी लागणारी शरणागती हाच नाटकाचा विषय.

## बरी करमणूक

नाटक जुने असले, तरी अजूनही बऱ्यापैकी करमणूक करते. रंगश्री कलाकार मन लावून काम करतात. दुसरा अंक थोडा कंटाळवाणा होतो. तथापि तिसऱ्या अंकामध्ये भीमराव वाघमारे यांच्या प्रवेशानंतर ही कसर भरून निघते. शेवटी २०–२५ मिनिटे प्रयोग छान रंगतो. विलासची मुख्य भूमिका राजा गोसावी त्यांच्या नेहमीच्या ढंगाने प्रेक्षकांच्या पावत्यांची दाद घेत, आणि प्रेक्षकांशी नजरेचे हितगूज करत–सहजतेने साकार करतात. बाळ गोसावी (शाळीग्राम) यशवंत गोसावी (भीमराव वाघमारे), नयना आपटे (शैला), आदी घरची मंडळी राजाभाऊंबरोबर आहेत. शिवाय कुसुम मांजरेकर, गोविंद कुळकर्णी चांगली हजेरी लावतात.

प्रयोग थेट पारंपारिक पद्धतीने करतात. विलासच्या घराचे एक दृश्य लावण, आणि सर्व लाइटस् झळकवले की अखेरपर्यंत बघायला नको.

नेपथ्य प्रकाश योजनेतील ही बचत आणि घरच्या मंडळींचे सहकार्य यामुळेच 'रंगश्री 'ला दराचे बाबतीत आपली एक दोन तीन रुपयांची जनता गाडी चालवता येते. दरांच्या या मर्यादेमध्ये रंगश्रीचा प्रयोग प्रेक्षकांची निश्चितपणे यथोचित परतफेड करतो.



**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649




“ या या या ! आता
आमची सर्व मदार
तुमच्यावरच....




....आहे ! ”